इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - १३७ ▸ गुरूवार,ता.१८ सप्टेंबर २०२५ ▸ पाने १२ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाय करा

**नवी दिल्ली,ता.१७–**

वायु गुणवत्ता व्यवस्थापन आयोग (सीएक्यूएम), केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड (सीपीसीबी) आणि राज्य प्रदूषण नियंत्रण बोर्डांना सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले की,हिवाळ्याच्या सुरुवातीपूर्वी वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपायांचा तपशील तीन आठवड्यांच्या आत तयार करावा. हिवाळ्यात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढते.सरन्यायमूर्ती भूषण गवई आणि न्या.के.विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने प्रदूषण नियंत्रण बोर्डांमधील रिक्त पदांबाबत राज्यांवर नाराजी व्यक्त केली. आणि उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि पंजाब राज्यांना तीन महिन्यांत ही पदे भरावीत, असे आदेश दिले.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

### वैष्णोदेवी यात्रेला पुन्हा सुरूवात

**कटरा,ता.१७–**

जम्मू आणि काश्मिरच्या रियासी जिल्ह्यातील त्रिकुटा टेकड्यांमध्ये असलेल्या माता वैष्णोदेवी मंदिराची यात्रा बुधवारी जल्लोषात पुन्हा सुरू झाली.

अलिकडेच झालेल्या विनाशकारी भूस्खलनामुळे २२ दिवसांसाठी ही यात्रा स्थगित करण्यात आली होती, ज्यामध्ये ३४ जणांचा मृत्यू झाला होता. माता वैष्णोदेवी श्राईन बोर्डने बुधवारी सकाळी अनुकूल हवामान परिस्थितीत तीर्थयात्रा पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली, ज्यामुळे यात्रेकरूंसाठी आधार शिबिर असलेल्या कटरा शहरात मोठ्या संख्येने असलेल्या भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

## भुजबळांच्या मालमत्तेची चौकशी होणार

■ मुंबई,ता.१७–

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन



**भुजबळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या तक्रारीनंतर भुजबळ यांच्या मालकीच्या बेनामी संपत्तीची चौकशी होणार आहे. विशेष सत्र न्यायालयाने याबाबतचे आदेश दिले आहेत. या पूर्वी ही चौकशी तांत्रिक कारणामुळे थांबविली होती. मात्र आता ती पुन्हा सुरू करण्याचे आदेश आहेत.**

अंजली दमानिया म्हणाल्या की, छगन भुजबळ आणि त्यांच्यासारखे असंख्य मंत्री जे अमाप पैसा कमावतात, त्यांच्याविरुद्ध (पान २ वर)

### दमानियांच्या तक्रारीवर न्यायालयाचे आदेश

## जि.प.प्रारूप प्रभाग रचना याचिकेवर आज सुनावणी

■ कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)–

**राज्य निवडणूक आयोगाने १८ जून २०२५ रोजी अधिसूचना काढली होती. या अधिसूचनेनुसार जिल्हा परिषदेच्या प्रभाग रचनेचे अधिकार शासनाला दिले गेले आहेत. याच संदर्भात आज कोल्हापूर सर्किट बेंचसमोर झालेल्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाचे वकील ॲड. अतुल दामले यांनी आपला युक्तिवाद मांडला. या प्रकरणी उद्या गुरुवारी पुन्हा दुपारी चार वाजता सुनावणी होणार आहे.**




जिल्हा परिषदेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत करवीर तालुक्यातील काही गावांची रचना चुकीच्या पद्धतीने करण्यात आली असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. त्याचबरोबर प्रारूप आराखड्यात अनेक गंभीर त्रुटी असल्याचेही निदर्शनास आणले आहे. या सर्व याचिका एकत्र करून त्यावर कोल्हापूर सर्किट बेंचसमोर सुनावणी सुरू आहे.

न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी सुरू असून, याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. श्रीकृष्ण गणबावले आणि ॲड. ऋतुराज पवार हे न्यायालयीन कामकाज पाहत आहेत. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा दावा केला आहे की, राज्य शासन आणि राज्य निवडणूक आयोग हे पूर्णपणे वेगळे आहेत आणि निवडणूक संदर्भातील (पान २ वर)

## मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्राचे वाटप सुरू

### अजितदादांच्या हस्ते पाच मराठा बांधवांना प्रमाणपत्र

■ बीड,ता.१७–

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर सरकारने आज मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यास सुरूवात केली आहे. उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते बुधवारी ५ मराठा बांधवांना हे प्रमाणपत्र दिले गेले. त्यामुळे या प्रमाणपत्रासाठी बलिदान देणाऱ्या अनेकांना न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.**

मनोज जरांगे यांच्या गतवर्षीच्या आंदोलनानंतर राज्यातील अनेकांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले होते. पण मध्येच ही प्रक्रिया मंदावली होती. त्यानंतर जरांगेंनी पुन्हा मुंबईतील आझाद मैदानावर ठाण मांडले. तसेच सरकारला हैदराबाद गॅझेट लागू करून त्यातील नोंदींच्या आधारावर मराठा बांधवांना कुणबीच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्यास भाग पाडले. त्यानंतर राज्यातील विविध जिल्ह्यांतील मराठा बांधवांना पुरावे सादर केल्यानंतर हे प्रमाणपत्र जारी करण्यात आले. त्यानंतर आता बीड जिल्ह्यातही हे प्रमाणपत्र वाटप करण्यास (पान २ वर)

## ईव्हीएमवर आता उमेदवारांचे रंगीत फोटो

■ नवी दिल्ली,ता.१७ –

**भारत निवडणूक आयोगाने आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन वापरण्याबाबत नव्या मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा केली आहे. यानुसार, यंदाच्या निवडणुकीत ईव्हीएमवरील मतपत्रांवर उमेदवारांचे रंगीत फोटो छापले जाणार आहेत. ही प्रणाली देशात प्रथमच बिहारमध्ये अमलात येणार असून, मतदारांना उमेदवारांची ओळख पटवण्यात अधिक सुलभता मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.**

निवडणूक आयोगाने निवडणूक संचालन नियम, १९६१ मधील नियम ४९ बी अंतर्गत सुधारणा करत मतपत्र अधिक स्पष्ट, सुबोध आणि वाचनीय करण्याचा

- निवडणूक आयोगाची नवी मार्गदर्शक तत्वे जाहीर
- देशात प्रथमच बिहारमध्ये प्रणाली अमलात येणार

निर्णय घेतला आहे. या नव्या प्रणालीत खालील महत्त्वाच्या बाबी अंतर्भूत आहेत. ईव्हीएमवरील मतपत्रात (पान २ वर)




## गडचिरोलीत चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार

■ गडचिरोली,ता.१७–

**नक्षलवाद्यांविरोधी अभियानात गडचिरोली पोलीसांना मोठे यश मिळाले आहे. एटापल्ला तालुक्यात जांबिया गटा जंगल परिसरात बुधवारी झालेल्या चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार झाल्या आहेत.**

या चकमकीनंतर घटनास्थळावरून एक अत्याधुनिक एके-४७ रायफल आणि पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. यासंदर्भातील माहितीनुसार गडचिरोली पोलीस दलाला एटापल्ली तालुक्यातील गट्टा जांबिया अंतर्गत येणाऱ्या मौजा मोडस्के (पान २ वर)

## मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर रंग टाकल्याने तणाव

- शिवाजी पार्क परिसरातील घटना
- उबाठा गटाच्या नेत्यांकडून निषेध

■ मुंबई,ता.१७–

**दिवंगत मीनाताई ठाकरे यांच्या शिवाजी पार्क परिसरात असलेल्या पुतळ्यावर अज्ञाताने लाल रंग टाकून पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न केला.**



हा प्रकार उघडकीस येताच एकच खळबळ उडाली.यावेळी शिवाजी पार्क परिसरामध्ये शिवसैनिक आणि ठाकरे गटाचे नेते दाखल झाले होते.त्यानंतर पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. दरम्यान परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

दरम्यान मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांच्यानंतर दुपारी माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी घटनास्थळी दाखल होत संपूर्ण घटनेची माहिती घेतली. मिळालेल्या (पान २ वर)

## इचलकरंजीत प्रभाग रचनेवर आज सुनावणी

■ इचलकरंजी,ता.१७–

**महापालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर प्रशासनाने हरकतींसाठी ठेवलेल्या अंतिम मुदतीपर्यंत २२ हरकती दाखल झाल्या. त्यावर उद्या गुरुवार ता. २३ रोजी दुपारी एक वाजल्यापासून महानगरपालिकेच्या सभागृहात सुनावणी सुरू होणार आहे. दिवसभरात २२ हरकतीवर सुनावणी पूर्ण करण्यात येणार आहेत.**




न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी कामकाजाला सुरुवात झाली आहे. त्यामध्ये आगामी (पान २ वर)

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा निर्घृण खून

■ सातारा,ता.१७(प्रतिनिधी)–

**मौजे कटगुण ता.खटाव येथे चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीच्या डोक्यात रॉड घालून तिला ठार मारले. विनोद विजय जाधव (वय २६) असे पतीचे नाव असून पत्नी पिंकी विनोद जाधव (वय २१) हिचा निर्घृण खून केल्याची कबुली पतीने स्वतः पुसेगाव पोलीस ठाण्यात हजर होऊन दिली.**

याबाबत पुसेगाव पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजीचे दुपारी १ वाजण्याचे सुमारास विनोद जाधव स्वतःहून पुसेगाव पोलीस ठाणेत हजर राहिला. (पान २ वर)

## जरांगे यांचा आता चलो दिल्लीचा नारा

### दिल्लीत समाजाचे अधिवेशन घेणार

■ धाराशिव,ता.१७–

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आता चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे दिल्लीत अधिवेशन घेणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट अंमलबजावणीनंतर हे अधिवेशन होणार असल्याचे जरांगे म्हणाले. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे. धाराशिवमध्ये**



**हैदराबाद गॅझेट संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी मनोज जरांगे पाटलांनी ही घोषणा केली.**

दिल्लीला आम्ही मागण्या घेऊन जाणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| राधानगरी | ८.३६ | ८.२० |
| तुळशी | ३.४७ | ३.४७ |
| वारणा | ३४.४० | ३४.०२ |
| काळम्मावाडी | २५.३९ | २१.४४ |
| कासारी | २.७७ | २.६६ |
| कडवी | २.५२ | २.४५ |
| कुंभी | २.७२ | २.६८ |
| पाटगाव | ३.७२ | ३.७० |
| चिकोत्रा | १.५२ | १.५२ |
| चित्री | १.८९ | १.८७ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.४० |
| जांबरे | ०.८२ | ०.७६ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२४ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६४ |
| धामणी | १.२९ | १.२३ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| ११०२०० रु. | १२८००० रु. |

अंडी ६०० रुपये शेकडा

## अतिवृष्टीचे तत्काळ पंचनामे करा

### अजित पवार यांचे निर्देश

■ छ. संभाजीनगर,ता.१७–

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री जल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड येथे विविध मुद्द्यांना घेऊन महत्त्वपूर्ण बैठका पार पाडल्या. गत तीन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीबाबत झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती आयोजित बैठकीत घेतली. यावेळी तत्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत मिळावी यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.**



याचबरोबर विस्तारित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात बैठक झाली. यावेळी नागरिकांना थेट लाभ मिळावा यासाठी आयुष्मान भारत कार्डचं वाटप करण्यात आलं.

याशिवाय बीड जिल्ह्यातील आरोग्यसेवा मजबूत करण्याच्या दृष्टीने शासकीय रुग्णालय आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या मास्टर प्लॅनचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी रुग्णालयांची उभारणी व विस्तार आराखड्यांचे सादरीकरण झाल्यानंतर आवश्यक त्या सूचना केल्या.

या बैठकांच्या माध्यमातून लोकांच्या अडीअडचणींवर तत्काळ उपाय शोधणे, आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवणे आणि आपत्तीग्रस्तांना न्याय मिळवून देणे आदी विषय मुख्यत्वे हाताळण्यात आले.

## ट्रक-कारचा अपघात सातजणांचा मृत्यू

■ अमरावती,ता.१७–

**आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्यातील संगम मंडळातील पेरामणाजवळ बुधवारी चेन्नई–मुंबई राष्ट्रीय महामार्गावर वाळू वाहून नेणारा ट्रक एका कारला धडकला. या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये चार पुरुष, दोन महिला आणि एका मुलाचा समावेश आहे.**

नेल्लोर जिल्हा मुख्यालयातील मुथुकुर गेटजवळ राहणारे रहिवासी आत्मकुर सरकारी रुग्णालयात नातेवाईकाला भेटण्यासाठी कारने जात असताना सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास वाळूने भरलेल्या एका (पान २ वर)

## शरद पवार महाराष्ट्रातील कटकारस्थानाचा कारखाना

■ मुंबई,ता.१७–

**शरद पवार हे महाराष्ट्रातील कटकारस्थानाचा कारखाना आहे. कारस्थाने कशी रचायची याचा मुख्य कारखाना पवार आहेत, अशी टीका भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली आहे.मारकडवाडीतील भोळ्या जनतेची दिशाभूल करून निवडणूक आयोगासारख्या विश्वासार्ह संस्थेची नाहक बदनामी केल्याबद्दल शरद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.**



मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी मारकडवाडीचे सरपंच रणजित मारकड, उपसरपंच आबाराजे मारकड,

### गोपीचंद पडळकर यांची घणाघाती टीका

ग्रामपंचायत सदस्य शहाजी वाघमोडे, पवार गटाचे कार्यकर्ते दत्तात्रय मारकड, अभिजित देवकाते, भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.विधानसभा निवडणुकीच्या (पान २ वर)

### हास्यतुषार – सुरेंद्र दा स



आमचाच महापौर असेल ! सोबत कोणी आलं नाही आलं तरी सुद्धा ..! असं म्हणण्याचा अर्थ तरी काय ?

## पंतप्रधान व त्यांच्या आईवरील एआय व्हिडिओ हटवा

### पाटणा उच्च न्यायालयाचे बिहार काँग्रेसला आदेश

■ पाटणा,ता.१७–

**काँग्रेसच्या बिहार विभागाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या आईवर कृत्रीम बुद्धीमत्तेच्या माध्यमातून (एआय) बनवलेला व्हिडीओ समाजमाध्यमातून तत्काळ हटवावा असे निर्देश पाटणा उच्च न्यायालयाने बुधवारी दिले.**

कार्यकारी मुख्य न्यायमूर्ती पी.बी.बजंत्री यांच्या न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. काँग्रेसच्या बिहार युनिटने १० सप्टेंबर रोजी ३६ सेकंदाचा एक व्हिडिओ पोस्ट केला होता. या व्हिडिओमध्ये पंतप्रधान मोदी झोपलेले दाखवले आहेत आणि त्यांच्या स्वप्नात त्यांची आई हिराबेन येतात आणि त्यांच्या राजकारणावर नाराजी व्यक्त करतात. या काल्पनिक व्हिडिओमध्ये हिराबेन म्हणतात, अरे बाळा, आधी (पान २ वर)

## महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा

### वडेट्टीवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई,ता.१७–

**राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल ३० जिल्ह्यात नुकसान झाले आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर इतके क्षेत्र या पावसाने बाधित झाले आहे.आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही त्यात शेतातील पीक देखील हातातून गेले आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारने तातडीने मदत करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.**



राज्यात मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. सोयाबीन, मका, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. (पान २ वर)

## उपमुख्यमंत्री पवार यांच्या ताफ्यासमोर दोन युवकांचा आत्मदहनाचा प्रयत्न

■ बीड,ता.१७–

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी बीडमध्ये आलेल्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यासमोरच दोन युवकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली.पोलीसांनी तात्काळ दोन्ही युवकांना ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.**

बीडमधील घटना

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उपमुख्यमंत्री पवार ध्वजारोहण करण्यासाठी बीडमध्ये दाखल झाले होते. त्यांचा ताफा नगर नाका परिसरात येताच दोन युवकांनी त्यांच्या ताफ्यासमोर धाव घेतली आणि अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मिळालेल्या (पान २ वर)

(पान १ वरून)

## दोन महिला नक्षलवादी ठार

जंगल परिसरात गट्टा दलमचे काही नक्षलवादी दबा धरून बसले असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.या माहितीच्या आधारे, तात्काळ कारवाई करत अपर पोलीस अधीक्षक सत्य साई कार्तिक यांच्या नेतृत्वाखाली सी-६० ची ५ पथके अहेरीहून रवाना करण्यात आली. या अभियानामध्ये पोस्टे गट्टा जांबियाचे पोलीस पथक आणि सीआरपीएफ १९१ बटालियनच्या ई कंपनीने जंगलाला बाहेरून वेढा घातला. पोलीस पथकांनी शोधमोहीम सुरू करताच दबा धरून बसलेल्या माओवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. पोलीसांनी या गोळीबाराला जोरदार प्रत्युत्तर दिले. चकमक थांबल्यानंतर पोलीसांनी संपूर्ण परिसरात शोध घेतला. या शोध मोहिमेदरम्यान दोन महिला माओवाद्यांचे मृतदेह आढळून आले. तसेच, घटनास्थळावरून एक स्वयंचलित एके-४७ रायफल, एक अत्याधुनिक पिस्तूल, मोठ्या प्रमाणात जिवंत दारूगोळा आणि माओवादी साहित्य जप्त करण्यात आले. या परिसरामध्ये अजूनही नक्षलविरोधी शोध अभियान सुरू आहे.

## आत्मदहनाचा प्रयत्न

माहितीनुसार, हे दोन्ही युवक केज तालुक्यातील कुंभेफळ येथील आहेत. त्यांच्या गावातील ग्रामपंचायतीच्या कामाच्या चौकशीची मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊनही कार्यवाही झाली नसल्याने त्यांनी हे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. यावेळी युवकांनी न्याय द्या, न्याय द्या अजित दादा न्याय द्या अशा घोषणा दिल्या. या घटनेचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.पालकमंत्री अजित पवार शहरात येणार असल्यामुळे आधीपासूनच सुरक्षेबद्दलची खबरदारी घेण्यात आली होती. पण, अचानक दोन युवकांनी पेटवून घेण्याचा प्रयत्न केल्याने पोलीसांची त्यांना पकडताना दमछाक झाली.

## एआय व्हिडीओ हटवा

मला नोटबंदीच्या रांगेत उभे केलेस, आणि आता बिहारमध्ये माझ्या नावावर राजकारण करत आहेस. माझा अपमान करणारे बॅनर-पोस्टर लावत आहेस. राजकारणासाठी किती खालपर्यंत घसरणार आहेस ? असे आई म्हणत असल्याचे दाखवण्यात आले होते. या व्हिडीओची भाजप आणि एनडीएच्या घटक पक्षांनी तीव्र शब्दांत निंदा केली असून काँग्रेसवर पंतप्रधानांना लक्ष्य करण्यासाठी लज्जास्पद मार्ग अवलंबल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे, काँग्रेसने स्पष्टीकरण दिले की, या व्हिडिओद्वारे पंतप्रधान मोदी किंवा त्यांच्या आईबद्दल कोणताही अनादर करण्यात आलेला नाही.या प्रकरणी भाजप दिल्ली निवडणूक सेलचे संयोजक संकेत गुप्ता यांच्या तक्रारीच्या आधारावर, दिल्ली पोलिसांनी १३ सप्टेंबर रोजी काँग्रेस आणि त्यांच्या आयटी-सेलविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नॉर्थ अव्हेन्यू पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीत,या दृश्यांमुळे केवळ पंतप्रधानांच्या आईचा अपमान होत नाही, तर सर्वसामान्य मातृत्वालाही ठेच पोहोचते, असा दावा करण्यात आला आहे.

गेल्या एक महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या दिवंगत आईला राजकीय वादात ओढण्यात आले आहे. यापूर्वी २७ ऑगस्ट रोजी बिहारच्या दरभंगामध्ये काँग्रेस आणि राजदच्या नेतृत्वाखाली आयोजित 'मतदार अधिकार यात्रा' दरम्यान, पंतप्रधान मोदी आणि हिराबेन यांच्याविरोधात अपशब्द व घोषणाबाजी केली होती. या घटनेवर पंतप्रधान मोदींनी तीव्र प्रतिक्रिया दिली होती आणि सांगितले होते की, ही घटना अकल्पनीय आहे आणि देशातील सर्व माता-महिलांचा अपमान आहे. त्यांनी हेही स्पष्ट केले की त्यांच्या आईचा राजकारणाशी काहीही संबंध नाही.

## रंग टाकल्याने तणाव

माहितीनुसार मुंबईतील, दादर शिवाजी पार्क परिसरामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी आणि शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या मातोश्री दिवंगत मीनाताई ठाकरे यांचा पुतळा आहे. रस्त्यालगत असलेल्या या पुतळ्यावर अज्ञाताकडून लाल रंग फेकून त्याचे विद्रुपीकरण करण्याचा प्रयत्न झाल्याचा प्रकार बुधवारी सकाळी उघडकीस आला. ही बाब लक्षात येताच शिवसैनिक, तसेच स्थानिक खासदार अनिल देसाई आणि आमदार महेश सावंत हे घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, उपस्थित शिवसैनिकांनी पुतळ्याची स्वच्छता करून घेतली. मात्र त्यानंतर शिवाजी पार्क परिसरात शिवसैनिकांनी एकच गर्दी करत निषेध व्यक्त केला. दरम्यान आता परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. या प्रकरणी पोलीसांमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. परिसरात असलेल्या सीसीटीव्हींमधील फुटेजच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेतला जात आहे. प्राथमिक माहितीमध्ये हा प्रकार बुधवारी सकाळी ६ वाजून १० मिनिटांच्या नंतर घडल्याचे समोर आले आहे. तसेच संबंधित चित्रिकरण पोलीसांच्या हाती लागले असून, आरोपीला लवकरच ताब्यात घेतले जाईल असे पोलीसांकडून सांगण्यात आले आहे.

## उमेदवारांचे रंगीत फोटो

उमेदवारांचा फोटो, क्रमांक आणि नावाचे सादरीकरण, मतपत्र चागंल्या दर्जाच्या कागदावर छापले जाणार असून, विधानसभेसाठी खास गुलाबी रंगाच्या कागदाचा वापर केला जाईल. नव्या तंत्रज्ञानाचा वापर बिहारपासून सुरू होत असून, पुढील सर्व निवडणुकांमध्ये हे सुधारित ईव्हीएम मतपत्र वापरण्यात येणार आहे.भारत निवडणूक आयोगाने यापूर्वीही गेल्या ६ महिन्यांत निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुटसुटीत आणि मतदार हितासाठी सुलभ करण्यासाठी एकूण २८ सुधारणा केल्या आहेत. ईव्हीएममधील हे नवे बदल त्याच सुधारणांच्या पुढील टप्प्याचा भाग आहेत.

## चलो दिल्लीचा नारा

म्हणाले. आमचे मराठा बांधव अनेक राज्यामध्ये विखुरले आहेत. कधीकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्यासाठी स्वराज्य निर्माण केले. सगळे बांधव एकत्र आले पाहिजेत अशी भूमिका आहे. महाराष्ट्रातील मराठा बांधव हरियाणाला भेटणार आहेत. हरियाणाचे बांधव महाराष्ट्राला भेटणार आहेत.

तर गुजरातमधील मराठे महाराष्ट्रातील मराठ्यांना कडकडून मिठ्या मारतील. राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, गोवा, दिल्ली या ठिकाणचे मराठे आपल्या महाराष्ट्रातील भावांना मिठ्या मारतील असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आम्ही खूप दिवसांनी ऐकमेकांना भेटणार आहोत असे जरांगे म्हणाले. आम्ही प्रत्यक्ष ऐकमेकांना भेटणार आहोत, तो आनंद सोहळा असणार आहे. तो सुवर्णदिवस असणार आहे असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आमच्या राजाने अटक पासून कटकपर्यंत अफगानिस्तानपर्यंत झेंडा फडकवला आहे, दिल्लीतही झेंडा फडकावला. कुठे कुठे आपल्या राजाचे पवित्र पाय लागले. ती भूमी पवित्र झाली, त्या भूमिला नतमस्क झाले पाहिजे. त्यामुळे आपल्या मराठा बांधवांसाठी, मराठा समाजासाठी मोठे अधिवेशन दिल्लीला घेणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# शरद पवार महाराष्ट्रातील कटकारस्थानाचा कारखाना

(पान १ वरून)

आधी दोन माणसे मला भेटायला आली होती, त्यांनी १६० जागांवर मतांमध्ये फेरफार करून निवडणूक जिंकवण्याची गॅरंटी दिली होती, असा मोठा गौप्यस्फोट शरद पवारांनी केला होता. त्याचा आ.पडळकरांनी समाचार घेतला. तुम्ही निवडणूक आयोगावर शंका निर्माण करण्याचे पाप करत आहात. ज्या मारकडवाडी गावात तुम्ही फेरमतदान घेण्याची मागणी केली, त्या गावातील सरपंच आज समोर येऊन हे पवारांनी केलेले कारस्थान होते असे सांगत असल्याचेही पडळकर यांनी सांगितले. लोकशाहीत निवडणुका अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असते. ज्यावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे.विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर निवडणूक आयोग,ईव्हीएम मशिनवर विरोधकांनी खापर फोडले. लोकसभेला महायुतीला अपयश आले, परंतू कोणावर टीका टिप्पणी न करता महायुतीच्या नेत्यांनी आपले कुठे चुकले आहे हे लक्षात ठेवून चुका दुरुस्त केल्या. विधानसभा निवडणुकीत मविआ नेते हवेत होते.लोकसभेप्रमाणेच विधानसभेला मतदान होईल या भ्रमात होते.लोकसभेला लागलेला निकाल जनतेचा कौल आहे असे ते बोलत होते. मात्र विधानसभेत पराभव झाल्यानंतर ईव्हीएमवर बोलू लागले, असे त्यांनी म्हटले.

देशाच्या विरोधात, लोकशाहीच्या विरोधात विघातक कृत्य करण्यासाठी जर ते दोघे तुमच्याकडे आले होते तेव्हा तुम्ही गृहमंत्र्यांना फोन करून का कळवले नाही? त्या दोघांना अटक करण्याची मागणी तुम्ही का केली नाही. मात्र पवारांनी असे काहीही न करता त्या दोघांना घेऊन ते राहुल गांधींकडे गेले. तेव्हा शरद पवार आणि राहुल गांधी यांनीच मारकडवाडी फेरमतदानाचे कारस्थान रचल्याचा आरोप आ. पडळकर यांनी केला. ज्यांच्या स्मरणशक्तीचे गोडवे गायले जातात त्या पवारांना त्या दोन माणसांची नावे आठवत नाहीत हे सगळेच संशयास्पद आणि हास्यास्पद आहे असेही ते म्हणाले.

मारकडवाडीतील भोळ्या जनतेची दिशाभूल करून निवडणूक आयोगासारख्या विश्वासार्ह संस्थेची नाहक बदनामी केल्याबद्दल शरद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी बुधवारी केली. ज्या मारकडवाडीत फेरमतदानासाठी आंदोलन झाले तेथील आंदोलनाचे कुटील कारस्थान शरद पवार आणि त्यांच्या हस्तकांचे असल्याचे मारकडवाडीच्या सरपंच, उपसरपंचांनी उघड केल्यामुळे या प्रकरणातील पूर्ण सत्य समोर आले असून शरद पवारांचे पितळ उघडे पडले आहे, असा हल्लाबोलही आ. पडळकर यांनी केला.

# भुजबळांच्या मालमत्तेची चौकशी होणार

(पान १ वरून)

कितीही लढलात तरी तुम्ही जिंकणार नाहीत याची त्यांना खात्री असते. छगन भुजबळ यांनी कोविड काळात पिटीशन फाईल केले. तेव्हा महाराष्ट्र सदन घोटाळ्याला चॅलेंज करता येणार नाही असा जीआर काढण्यात आला. त्यानंतर फडणवीस सरकारमध्ये सुद्धा असाच प्रकार झाला. म्हणून छगन भुजबळ यांच्यासारखे मंत्री माझ्यावर अब्रू नुकसानीचे दावे धडधड करतात.मरीन लाईनला भुजबळांच्या नावे अल्जेब्रा कोर्ट नावाची आखखी इमारत आहे अशी तक्रार मी आयकर खात्याकडे केली होती. त्यानंतर हायकोर्टाकडून त्यांना दिलासा मिळाला. सुप्रीम कोर्टामध्ये एक गणेश कॉम नावाची केस होती. त्या ऑर्डरच्या बेसिसवर हायकोर्टात त्यांनी प्रुफ केले आणि त्यांना दिलासा मिळाला.

**सरकार भुजबळांना पाठीशी घालत आहे आपल्या जीवावर राजकारणी स्वतःचे खिसे भरतात, मात्र आपल्याला न्याय मिळत नाही. आता भुजबळांची चौकशी सुरू झाल्यानंतर तरी देवेंद्र फडणवीस हे त्यांची मंत्रिपदावरुन हकालपट्टी करणार की नाही, असा प्रश्न अंजली दमानिया यांनी विचारला आहे.**

छगन भुजबळ यांच्या मालकीच्या कन्स्ट्रक्शन कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, त्याची चौकशी करावी अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली. त्या म्हणाल्या की, भाजपाला एक ओबीसी चेहरा पाहिजे म्हणून त्यांना मंत्री बनवण्यात आले. त्यांना पुन्हा पद देण्यात आले. सुमारे नऊ वर्षे झाली तरी आजही त्यांची चौकशी पूर्ण होत नाही. आयकर विभागाला ताबडतोब त्यावर पुन्हा कारवाई सुरू करावी, असे पत्र मी त्यांना दिले. त्यामुळे आयकर विभागाला ते कायद्याने क्रमप्राप्त होते म्हणून ही कारवाई त्यांना सुरू करावी लागली. विशेष न्यायालयानेही कारवाई सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

# जि.प.प्रारूप प्रभाग रचना याचिकेवर आज सुनावणी

(पान १ वरून)

सर्व अधिकार हे केवळ निवडणूक आयोगालाच आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या प्रभाग रचनेचे अधिकार शासनाला नसल्याचे ते म्हणाले. मंगळवारी झालेल्या सुनावणीत मात्र जिल्हा परिषदेची प्रभाग रचना ही कायद्याच्या चौकटीत राहूनच केली असल्याचा युक्तिवाद राज्य शासन आणि राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने करण्यात आला होता.आज बुधवारी पुन्हा झालेल्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने ॲड. अतुल दामले यांनी अधिसूचनेचा उल्लेख करून प्रभाग रचनेचे अधिकार शासनाला देण्यात आले असल्याचे सांगितले आणि त्यानुसार जिल्हा परिषदेची प्रभाग रचना करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले. आयोगाकडून मांडण्यात आलेली बाजू ऐकल्यानंतर आता यावर उद्या गुरुवारी दुपारी चार वाजता पुन्हा सुनावणी होणार आहे.

# इचलकरंजी प्रभाग रचनेवर आज सुनावणी

(पान १ वरून)

निवडणुकीसाठी प्रारूप रचना आराखडा जाहीर करण्यात आला आहे. त्यावर हरकती सूचना दाखल करण्याची मुदत सोमवार ता.१५ सप्टेंबर पर्यंत होती. या मुदतीमध्ये एकूण २२ हरकती दाखल झाल्या आहेत. तर हरकती दाखल करण्याच्या अंतिम दिवशी तब्बल १५ हरकती दाखल झाल्या.

दाखल झालेल्या हरकतींवर उद्या गुरुवार ता.१८ रोजी महानगरपालिकेच्या सहभागृहामध्ये दुपारी एक वाजल्यापासून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या उपस्थितीत सुनावणीला प्रारंभ होणार आहे.

यावेळी आयुक्त पल्लवी पाटील यांचेसह अन्य अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे उद्या होणाऱ्या सुनावणीकडे तक्रारदारांसह नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# पद्मश्री डॉ.शिवराम भोजे पंचत्वात विलीन

■ क.सांगाव,ता.१७(वार्ताहर)-

**कसबा सांगाव (ता.कागल) येथील सुपुत्र व ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शिवराम बाबुराव भोजे यांच्या पार्थिव देहावर आज त्यांच्या स्वतःच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगळवारी कोल्हापूर येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांचे निधन झाले होते.**

आज सकाळी ११ वाजता त्यांचे पार्थिव त्यांच्या जन्मगावी आणण्यात आले. घराशेजारी मंडपात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलेल्या पार्थिवावर विविध मान्यवर, ग्रामस्थ व नातेवाईकांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

यावेळी झालेल्या शोकसभेत दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या कन्या रजनीताई मगदूम, प्रांताधिकारी प्रसाद चौगुले, तहसीलदार अमरदीप वाकडे, सरपंच विरश्री जाधव, अनिल पाटील, आप्पासाहेब टाकळे, अनुशास्त्रज्ञ बी.एच. पाटील, ॲड. बाळासाहेब देशपांडे, ॲड. बाबासाहेब मगदूम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.फुलांनी सजवलेल्या ट्रॉलीतून काढण्यात आलेल्या अंत्ययात्रेत डीएम हायस्कूलसह विविध शाळांचे विद्यार्थी, भजनी मंडळ, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. मार्गावर ठिकठिकाणी त्यांच्या पार्थिवावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

डॉ. भोजे यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावई, भावजय, पुतणे, बहिणी असा परिवार आहे.

यावेळी रयतसेवा दूध संस्था चेअरमन अमोल माळी, किरण पास्ते, अविनाश मगदूम, मुंबईचे माजी पोलीस उपायुक्त आनंदराव कदम, विक्रमसिंह जाधव, उमेश माळी विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मिरजेत ३३ वर्षानंतर शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव

■ मिरज,ता.१७(प्रतिनिधी)-

**येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा ४५ वा मध्यवर्ती युवा महोत्सव १८ ते २० दरम्यान उत्साहात पार पडणार आहे. महोत्सवात तीन दिवसांत ३६ प्रकारच्या स्पर्धा पार पडणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी दिली.**

ते म्हणाले, या महाविद्यालयाची स्थापना १९६५ मध्ये झाली असून यंदाचे हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. ३३ वर्षांनंतर महाविद्यालयास मध्यवर्ती युवा महोत्सवाचा पुन्हा हा मान मिळत आहे. याआधी १९९२ मध्ये येथे युवा महोत्सवाचे आयोजन झाले होते. या आयोजनामुळे मिरजेच्या सांस्कृतिक परंपरेला नवे पर्व लाभणार आहे.

४५ वा मध्यवर्ती युवा महोत्सव २०२५-२६

या महोत्सवात सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतील २०० हून अधिक महाविद्यालयांतून सुमारे २ हजार २०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ३६ कलाप्रकारांत लोकसंगीत, नृत्य, नाट्य, वक्तृत्व, चित्रकला, छायाचित्रण, हस्तकला, वाद्यवृंद, लघुपट, सुगम व शास्त्रीय संगीत अशा विविध स्पर्धा घेण्यात येतील. शहरातील लक्ष्मी मार्केट, बालगंधर्व नाट्यगृह यांसह महाविद्यालयाचे प्रांगण या स्पर्धांचे साक्षीदार ठरणार आहे.

महोत्सवाचे उदघाटन गुरुवार ता.१८ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. मिरज आमदार सुरेश खाडे हे उदघाटक असून, प्रमुख पाहुणे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, तर अध्यक्ष म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित राहणार आहेत.

शनिवार ता.२० रोजी सकाळी ११.३० वाजता समारोप समारंभ व पारितोषिक वितरण होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे, तर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे अध्यक्षस्थानी असणार आहेत. विद्यार्थ्यांनी व रसिक प्रेक्षकांनी या कलासोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले आहे.

## ओला दुष्काळ जाहीर करा

(पान १ वरून)

तसेच बँकेकडून शेतकऱ्यांची होणारी वसुली थांबवावी, पिक विमा कंपन्यांनी तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात केली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीकडे बळीराजा आस लावून बसला होता की त्याला काही मदत मिळेल पण या बैठकीत देखील शेतकऱ्यांसाठी काही निर्णय झाला नाही.शेतकरी निराश झाला आहे. त्यांना तातडीने मदतीची गरज आहे.

# जलजीवन योजनेच्या जलकुंभाचे काम पुन्हा बंद

■ तारदाळ,ता.१७(वार्ताहर)-

**तारदाळ-खोतवाडी संयुक्त जलजीवन योजनेचे काम पुन्हा एकदा ठप्प झाले आहे. त्यामुळे ग्रामस्थांतून नाराजीचे सुर उमटत आहेत.**

सदर योजनेच्या प्रलंबित कामात संदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक आंदोलने केली. याची दखल घेत १२ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी या योजनेच्या प्रलंबित कामाची पाहणी केली. त्यानंतर मक्तेदार व अधिकाऱ्यांना



तातडीने काम पूर्ण करण्याच्या कठोर सूचना दिल्या होत्या. तरीदेखील फिल्टर हाऊस येथील पाण्याच्या टाकीचे काम संबधित मक्तेदाराने बंद ठेवले आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी सुचना देऊनही मक्तेदाराकडून उघडपणे उल्लंघन केले जात असल्याचा आरोप करीत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**पाहणी दरम्यान काम सुरू होते, मात्र अधिकारी निघताच काम पुन्हा बंद. हा सरळ वेळकाढू पणा असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेत संबंधितावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी ग्रामस्थातून मागणी होत आहे.**

पाहणी दौऱ्यादरम्यान कामे सुरू होती, मात्र अधिकारी निघून गेल्यानंतर पुन्हा वेळकाढूपणा सुरू झाला आहे, अशी ग्रामस्थांतून चर्चा सुरु आहे. प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करून काम वेळेत पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांतून जोर धरू लागली आहे.

## भीषण अपघातात सातजणांचा मृत्यू

(पान १ वरून)

वेगवान ट्रकने चुकीच्या वळणावर येऊन कारला धडक दिली. अनियंत्रित ट्रकने कारला काही अंतरापर्यंत ढकलत पुढे नेले. या अपघातात कारमधील सात जणांचा जागीच मृत्यू झाला.

माहिती मिळताच जिल्हा पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. सर्व मृत हे नेल्लोर जिल्हा मुख्यालयातील मुथुकुर गेटजवळील रहिवासी आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि अपघाताचा तपास सुरू आहे.

## प्रमाणपत्रांचे वापट सुरू

(पान १ वरून)

सुरूवात झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज बीड जिल्ह्यातील ५ मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यात आले. हे प्रमाणपत्र हाती पडताच संबंधितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. उपविभागीय अधिकाऱ्यांनी जारी केलेले हे प्रमाणपत्र हैदराबाद गॅझेटमधील नोंदीच्या आधारावर जारी करण्यात आले आहे. अजित पवार यांच्या हस्ते मराठा आंदोलनात बलिदान देणाऱ्या कवडे नामक व्यक्तीच्या कुटुंबियांनाही यावेळी १० लाखांची मदत देण्यात आली. यावेळी धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, नारायण गडाचे प्रमुख शिवाजी महाराज व्यासपीठावर उपस्थित होते.

# मुरगूडात चोरट्यांचा धुमाकूळ;पाच घरे फोडली

■ मुरगूड,ता.१७(प्रतिनिधी)-

**मुरगूड शहरात बंद घरे हेरून फोडण्याचे चोरट्यांचे सत्र सुरूच आहे. काल रात्री शहरातील मगदूम कॉलनी, चौगले गल्ली, तुकाराम चौक आदि ठिकाणची पाच बंद घरे फोडली आहेत. यामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरी झालेल्या घर मालकांपैकी एकानेही मुरगूड पोलिसात फिर्याद दिली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**

गत आठवड्यापूर्वी मुरगूड शहराच्या भरवस्तीमध्ये असणाऱ्या महालक्ष्मी नगर येथे बंद घरांमध्ये चोरी झाली होती. पुन्हा आठवडा होण्याच्या आत मुरगूड शहरांमध्ये पुन्हा एकदा चोरट्याने धुमाकूळ घातला आहे. मुरगूड शहरांमधील मगदूम कॉलनी येथे दोन घरांमध्ये घरफोडी झाली. त्याचबरोबर चौगुले गल्ली, तुकाराम चौक आणि भोसले कॉलनी या ठिकाणी चोरीचा प्रयत्न झाला. यासोबतच चौगुले गल्ली येथील एक दुचाकी चोरून नेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मात्र ती गाडी चोरून नेताना वाटेतच बंद पडल्याने तिथेच ठेवून चोरट्यांनी पळ काढल्याचे दिसून आले. या चोरट्यांच्या शोधासाठी परिसरातील सीसीटीव्ही तपासण्याचे काम पोलीस करीत आहेत.

मुरगुड शहर पोलीस स्टेशन पासून अवघ्या काही अंतरावर असणाऱ्या भोसले कॉलनीमध्ये देखील एक घर फोडण्यात आले आहे. शहरांमध्ये गेल्या अनेक महिन्यापासून घरफोडीचे प्रमाण वाढले आहे. यातच आता शहरांमध्ये चौथ्यांदा चोरी झाल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

चोरटे बंद घरे लक्ष करत असल्यामुळे नागरिक घर सोडून कुठे जाण्याच्या मनस्थितीमध्ये नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान एका घराच्या सीसीटीव्ही मध्ये चोरटे दिसून आल्याचे सांगण्यात येत असून पोलीसाना या चोरट्यांचा शोध लावण्यात यश मिळणार का? पोलिसांनी रात्रीची गस्त आणखी वाढवण्याची मागणी नागरीकातून होत आहे.

## चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा खून

(पान १ वरून)

मी काही वेळापूर्वी माझी पत्नी पिंकी हिचा चारित्र्याच्या संशयावरुन डोक्यात लोखंडी रॉड मारल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली तेव्हा पिंकी जाधव रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. नातेवाईकांनी तिला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पुसेगाव येथे आणले. परंतू ती उपचारापुर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मयत पिंकी जाधव हिस तीन मुले आहेत. पती विनोद जाधव याला अटक केली आहे.


|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



कै.सौ.माधुरी शिवदीप बंडगर

आमचे मित्र शिवदीप बंडगर यांच्या सुविद्य पत्नी सौ. माधुरी शिवदीप बंडगर यांचे बुधवार, दि. १७/९/२०२५ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो,हीच प्रार्थना!

किरणकुमार डिग्रजे
यश पेटस् शॉप
लखन केसरकर

रक्षाविसर्जन : आज गुरुवार, दि. १८/९/२५ रोजी सकाळी ९.०० वाजता पंचगंगा नदीतिरी.

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



श्री. मारुती मंगल नेमिष्टे

आमचे परममित्र, इचलकरंजी शहर इस्टेट ब्रोकर वेलफेअर असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष श्री. मारुती मंगल नेमिष्टे यांचे मंगळवार,दि.९/९/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

बाळासाहेब दत्तू निपाणे
निपाणे परिवार, इचलकरंजी.

उत्तरकार्य - उद्या शुक्रवार,दि.१९/९/२०२५ रोजी रहाते घरी आहे.

# प्रारुप प्रभाग रचनेवरील प्राप्त हरकतींची शुक्रवारी सुनावणी

कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी) –

**प्रारुप प्रभाग रचनेवरील प्राप्त हरकतीची सुनावणी शुक्रवार, दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होणार आहे. हि सुनावणी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी प्राधिकृत केलेले अप्पर जिल्हाधिकारी घेणार आहेत.**

त्यानुसार महापालिकेने प्रसिध्द केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेबाबत हरकत/सूचना उपस्थित केलेल्या सर्वांना सुनावणीस हजर राहण्यास लेखी कळविले आहे. हि सुनावणी जिल्हाधिकारी कार्यालयातील अप्पर जिल्हाधिकारी यांचे दालनामध्ये घेण्यात येणार आहे. या सुनावणीस हरकत दारांनी दिलेल्या वेळेतच उपस्थित राहावे. वेळेत उपस्थित न राहिल्यास पुन्हा सुनावणीस वेळ देण्यात येणार नाही. सुनावणीस येताना आपले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. यावेळी कोणतेही लेखी निवेदन स्विकृत केले जाणार नाही. लेखी हरकत/सूचनेमध्ये जे आक्षेप असतील त्या संबंधी सुनावणी होणार आहे. सुनावणी झाल्यानंतर कोणतेही लेखी उत्तर दिले जाणार नाही. एखाद्या आक्षेपावर एका पेक्षा जास्त हरकतदारांच्या सह्या असतील तर दोन व्यक्तिंनाचा सुनावणीसाठी घेतले जाणार आहे. तरी हरकतदारांनी या सुनावणीस उपस्थित राहावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



आम्ही खवय्ये आणि दोस्ती ग्रुप तर्फ प्रांत कार्यालयातील अधिकाऱ्यांना निवेदन देताना घेतलेले छायाचित्र.

# मटण दरवाढ मागे घ्यावी

## प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

इचलकरंजी,ता.१७–

**१२ सप्टेंबरपासून मटणाचा दर अचानकपणे ४० रुपयांनी वाढवून ७६० रुपये किलो करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मटण दरवाढ मागे घेण्याबाबत मध्यस्थी करावी, मनमानी वाढ थांबवावी, या मागणीचे निवेदन बुधवारी आम्ही खवय्ये आणि दोस्ती ग्रुप तर्फ प्रांत कार्यालयात देण्यात आले. निवेदन वरिष्ठ लिपीक विनीद वस्त्रे यांनी स्वीकारले.**

निवेदनात म्हटले आहे की, श्रावण महिना आणि गणेशोत्सव संपताच दरवाढ करण्यात आल्याने ती जाणीवपूर्वक व नियोजित असल्याचा संशय आहे. सणानंतर दरवाढ करणे अन्यायकारक असून, यामुळे ग्राहक आणि विक्रेत्यांमध्ये वाद निर्माण होत आहेत. आधीच महागाईने त्रस्त झालेल्या नागरिकांवर ही अचानक दरवाढ अन्यायकारक ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

याप्रसंगी प्रमोद इदाते, कपिल ढवळे, किरण बुचडे, आनंदा मुसळे, नेताजी बिरंजे, कैलास म्हेतर, श्रीकांत पांडव, सचिन कांबळे, रमेश धोत्रे, जाफर जिडगे, भीमराव कोकणे, हरिदास सोनटक्के आदीसह अनेक खवय्ये उपस्थित होते.

# बेवारस वाहनांमुळे कचऱ्याच्या समस्येत भरच

## डासांच्या प्रमाणात वाढ ; साथींच्या रोगाची भीती

इचलकरंजी,ता.१७ –

**शहरातील मुख्य रस्त्याबरोबरच लहान मोठ्या गल्लीमधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात लहान मोठी वाहने वर्षानुवर्षे बेवारस स्थितीत पडून आहेत. त्या बेवारस वाहनांमध्ये पाणी साचून डासांचे प्रमाण वाढत आहे. अशा बेवारस वाहनांवर महानगरपालिकेच्यावतीने योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.**

शहरामध्ये गल्लोगल्ली डेंगू, मलेरियाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील मुख्य रस्त्याबरोबरच गल्लोगल्ली तसेच चौकाच्या ठिकाणी दुचाकी आणि चार चाकी वाहने बंद अवस्थेत वर्षानुवर्षे बेवारस स्थितीत पडून आहेत. या वाहनांना वास्तविक भंगारात घालने गरजेचे असताना वाहन मालक आपल्या दारासमोर, आपल्या घराशेजारी तसेच मोकळ्या जागेत वाहने पार्किंग करून ठेवली आहेत. ही वाहने बंद अवस्थेत पडून आहेत. या वाहनांच्या छतावर तसेच इतर ठिकाणी पावसाचे पाणी साचले आहे. त्यामध्ये माती,धुरळा पडून त्या गाड्यांच्या मध्ये गवत ही उगवली आहे.पावसाचे पाणी साचल्यामुळे डासांची पैदास होत असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे. अनेक नागरिक डास चावल्यामुळे आजारी पडत आहेत. ज्या ठिकाणी हि वाहने बंद अवस्थेत आहेत. त्या ठिकाणी नागरिक कचरा टाकत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी कचरा कोंडावळे बनले आहेत. कचरा टाकल्यामुळे महापालिकेचे कर्मचारी जरी लोटण्यास आले तरी त्या गाडीखालचा कचरा काढणे मुश्किल बनले आहे तसेच अनेक गाड्यांच्या खाली गवत हे उगवले आहे. लाखो रुपयांची वाहने भंगार अवस्थेत रस्त्याकडेला सडत आहेत. नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या अशा वाहनांवर आता महापालिकेने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



बेवारस वाहनावर टाकलेला कचरा व उगवलेली झुडपे. (छाया.– मयूर चिंदे)

### संयुक्त मोहीम राबवण्याची गरज

बेवारस वाहनांवर कारवाई करण्यासाठी महापालिका आणि शहर वाहतूक शाखा यांनी संयुक्त मोहीम हाती घेण्याची गरज आहे.दोघांनी एकावेळीच मोहीम उघडल्यास त्याला वजन प्राप्त होईल आणि चांगल्या पद्धतीने कारवाई करणे शक्य होईल. हे माझे काम नाही म्हणून कोणीही हात झटकू शकणार नाहीत.

महानगरपालिकेच्यावतीने यापूर्वी बेवारस वाहनांच्यावर कारवाई करताना संबंधित मालकांना नोटीस पाठवून दंडाची कारवाई करण्यात आली होती. मात्र, ही कारवाई जुजबी ठरली. तेव्हा महानगरपालिकेने बेवारस वाहनांवर कारवाई करताना सदरचे वाहन जप्त करावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# कोल्हापूर जिल्हा डॉल्बीमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्या

## गणराया ॲवॉर्ड वितरणप्रसंगी पोलिस अधिक्षक योगशकुमार गुप्ता यांचे आवाहन

इचलकरंजी,ता.१७–

**पुढील वर्षी कोल्हापूर जिल्ह्यात डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वच मंडळांनी पुढाकार घ्यावा व आपल्या जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर पोहचवावे, असे आवाहन पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी केले. तर गणेशोत्सव व पैगंबर जयंतीच्या पार्श्वभूमीवर इचलकरंजीकरांनी जे जातीय सलोख्याचे दर्शन घडविले ते खरोखरच गौरवास्पद आहे, असेही त्यांनी नमुद केले.**

उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, इचलकरंजी विभागात समाविष्ट इचलकरंजीतील गावभाग, शिवाजीनगर, शहापूर तसेच कुरूंदवाड, हुपरी अंतर्गत येणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना गणराया ॲवॉर्ड– २०२५ पुरस्कार वितरण सोहळा येथील श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृहात पार पडले. त्याप्रसंगी पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता बोलत होते. ते पुढे म्हणाले, गणेशोत्सवामध्ये जे सामाजिक उपक्रम, प्रदूषणमुक्त पारंपारिक पध्दतीने गणेशोत्सव साजरा करतात. त्या मंडळांचे कौतुक करणेसाठी गणराया ॲवॉर्ड पुन्हा सुरू केल्याचे नमुद केले. नुकताच गणेशोत्सव कोल्हापूर जिल्ह्यात उत्साहात साजरा झाला. जिल्ह्यात सुमारे ८,५०० हून अधिक मंडळांनी सहभाग घेतला होता. काही मंडळे वगळता सर्वच मंडळांनी पारंपारिक पध्दतीने उत्सव साजरा केला. मात्र, काही मंडळांनी कायदा मोडला, त्यांचावर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच विसर्जन मिरवणुकी दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पारंपारीक पद्धतीने विसर्जन मिरवणूक निघते त्यानंतर मिरवणुकीची पध्दतच बदलते. तेव्हा शेवटपर्यंत मिरवणूक पारंपारीक पध्दतीने कशी काढता येईल, यासाठी प्रबोधन करावे, असेही आवाहन केले.

प्रारंभी पोलिस उपअधिक्षक विक्रांत गायकवाड यांनी स्वागत करून प्रास्ताविकात इचलकरंजीचा गणेशोत्सव अतिशय उत्साहाच्या वातावरणात साजरा झाला. सर्वच अधिकारी शहरात नवखे असताना शहरवासियांनी चांगलाच प्रतिसाद दिला. त्यामुळे अधिकारी वर्गाला एक वेगळा अनुभव मिळाला. मात्र, काही मंडळांनी कायदा मोडला त्याचेवर कारवाई होणार असल्याचे सांगितले. विसर्जन मिरवणुकीत महिलांचा सहभाग, पारंपारीक वाद्यांचा सहभाग त्याबद्दल कौतुक केले.

आभार गावभाग पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक महेश चव्हाण यांनी मानले. व्यासपीठावर पो.नि. सचिन सुर्यवंशी, शरद वायदंडे, प्रशांत निशानदार, रविराज फडणीस, एन.आर. चौखंडे आदी अधिकारी वर्ग उपस्थित होते.



पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता, डीवायएसपी विक्रांत गायकवाड यांच्या हस्ते शेळके गल्ली परिसरातील सोलगे बोळ येथील श्री छत्रपती गणेशोत्सव मंडळाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक वितरणप्रसंगी घेतलेले छायाचित्र. (छाया.– मयूर चिंदे)

# शाहूवाडी एमआयडीसीबाबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

कोल्हापूर, ता.१७ (प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील औद्योगिक विकासाचा नवा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शाहूवाडीत सुमारे ३५० हेक्टर क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) उभारणी करण्याबाबत आज मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शाहूवाडी तालुक्यातील अरुळ, आंबर्डे, करंजोशी, सावे, बजागेवाडी व शित्तुर तर्फ मलकापूर या गावांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.**

पन्हाळा तालुक्यातील आवळी येथे एमआयडीसी मंजूर झाली असून, तथापि कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योजकांची मागणी पाहता, अरुळ, आंबर्डे, करंजोशी, सावे, बजागेवाडी व शित्तुर तर्फ मलकापूर या पाच गावातील सुमारे ३५० हेक्टर जागा उपलब्ध आहे. सदर जमीन देण्याबाबत ग्रामस्थांनीही सकरात्मकता दर्शवली असल्याचे खास. धैर्यशील माने आणि आम.विनय कोरे यांनी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे या ठिकाणी आयटी पार्क, चर्म उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग अशा विविध उद्योगांची निर्मिती होऊ शकते. यामुळे शाहूवाडी व पन्हाळा तालुक्यातील युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीचा मार्ग खुला होईल, असे मत बैठकीत मांडण्यात आले. उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, सहाय्यक व्यवस्थापक डॉ. विनय राठोड, डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, किरण जाधव, संतोष भिंगे व उमेश देशमुख , जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती सर्जेराव पाटील (पेरीडकर) आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उद्योगमंत्री सामंत यांनी अधिकाऱ्यांना पुढील पंधरा दिवसांत शाहूवाडी तालुक्यातील उपलब्ध जागेची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

# इचलकरंजीच्या विकासात बिल्डर्स असोसिएशन व क्रेडाईचा वाटा

## आयुक्त पल्लवी पाटील

इचलकरंजी,ता.१७–

**इचलकरंजी शहराच्या सर्वांगीण विकासात बिल्डर्स असोसिएशन व क्रेडाई इचलकरंजी यांचा मोलाचा वाटा आहे. शहराचे वेगळेपण आणि सुंदरता जोपासण्यासह हरित इचलकरंजी व रेनवॉटर हार्वेस्टींगच्या कामात महापालिका आवश्यक ते सहकार्य करेल, अशी ग्वाही आयुक्त तथा प्रशासक पल्लवी पाटील यांनी दिली.**



जागतिक अभियंता दिनाचे औचित्य साधत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इचलकरंजी, क्रेडाई इचलकरंजी आणि अल्ट्राटेक सिमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम क्षेत्रात कार्यरत शासकीय व निमशासकीय गुणवंत अभियंता (इंजिनीअर) यांच्या गौरव सोहळ्यात आयुक्त पाटील बोलत होत्या. यावेळी अभियंता संदेश कुळवमोडे, रामप्रसाद पाटील, डॉ. बाजीराव कांबळे, प्रशांत भोसले आणि अभियंता शाहीन विजाली या अभियंत्यांचा शाल, श्रीफळ व गौरव चिन्ह देऊन आयुक्त पल्लवी पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

आयुक्त पल्लवी पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना क्रेडाई, बिल्डर्स असोसिएशन व अल्ट्राटेक सिमेंट यांच्या वतीने इचलकरंजी शहर ग्रीन सिटी करण्यासाठी शहरवासियांना घरफाळा व पाणीपट्टीत काही सवलत देता येईल का या मागणीचा महापालिका प्रशासन सकारात्मक विचार करेल. क्रेडाई व बिल्डर्स असोशिएशन यांचे शहराच्या विकासात योगदान असून त्यांच्या प्रत्येक चांगल्या कामात महापालिका सहकार्य करेल अशी ग्वाही दिली.

प्रारंभी भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेशरैय्या यांच्या प्रतिमेचे पुजन इंजिनिअर रमेश मर्दा आणि राजेंद्र खंडेराजुरी यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत बिल्डर्स असोशिएशन इचलकरंजीचे अध्यक्ष फैय्याज गैबान यांनी केले. प्रास्ताविकात अल्ट्राटेक सिमेंटचे डिलर नितीन धुत यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा परिचय करून देताना बिल्डर्स असोशिएशन आणि क्रेडाई इचलकरंजीच्या कार्याचा विस्तृत आढावा घेतला. अल्ट्राटेक सिमेंटचे रिजनल टेक्निकल हेड शितलराज सिंदखेडे यांनी, घर बांधणीसाठी उपयुक्त अल्ट्राटेक सिमेंटच्या विविध उत्पादनांची विस्तृत माहिती देत अल्ट्राटेक सिमेंटच्या वतीने १५०० फुटापासून पुढे सर्वच घरांसाठी आयजीबीएस प्रमाणपत्र दिले जाईल. इचलकरंजी शहर हरित आणि रेनवॉटर हार्वेस्टिंगने परिपूर्ण होण्याची संकल्पना पूर्णत्वास नेण्यास अल्ट्राटेक सिमेंट संपूर्ण सहकार्य करेल, असे सांगितले.

क्रेडाई इचलकरंजीचे अध्यक्ष रणजित लायकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुर शहा यांनी केले. याप्रसंगी अल्ट्राटेक सिमेंटचे टेरिटरी सेल्स हेड अविनाश जेऊरकर, विभागीय तांत्रिक प्रबंधक सागर छागाणी, राजू पाटील, राजेंद्र शिंत्रे, शितल काजवे, पुंडलिक जाधव, प्रितेश शहा तसेच क्रेडाई आणि बिल्डर्स असोशिएशनच्या मेंबर्ससह १५० पेक्षा अधिक उपस्थित होते.

# कोल्हापूरच्या शाही दसरा महोत्सवाचा २२ सप्टेंबरला शुभारंभ

कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्ह्यास अनेक शतकांची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभली असून, राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून कोल्हापूरात शाही दसरा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी कोल्हापूर जिल्हा प्रशासनातर्फे शाही दसरा महोत्सव नवरात्र कालावधीदरम्यान आयोजित करण्यात येतो, ज्यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असतो. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाने यावर्षी कोल्हापूर शाही दसरा महोत्सवास प्रमुख राज्य महोत्सवाचा दर्जा प्रदान केला आहे. ही बाब कोल्हापूरकरांसाठी अभिमानाची व आनंदाची असून, हा उत्सव कोल्हापूरच्या संस्कृती आणि परंपरांचा महोत्सव असेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. ते जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात पत्रकार परिषदेत बोलत होते.**

यावेळी त्यांनी २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात येत असलेल्या शाही दसरा महोत्सवातील कार्यक्रमांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, नवरात्र कालावधीदरम्यान कोल्हापूर शहरात अंदाजे ३० ते ४० लाख भाविक व पर्यटक भेट देत असल्याने शाही दसरा महोत्सव देशभर व जगभर प्रसिद्ध करण्यासाठी यावर्षी जिल्हा प्रशासनाने अत्यंत भव्यदिव्य व आकर्षक स्वरूपात कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. कोल्हापुरी संस्कृती व परंपरांचे जतन करण्यासाठी मंगळवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सर्व जिल्हाभर पारंपरिक वेशभूषा दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या महोत्सवांतर्गत २२ सप्टेंबर रोजी दसरा महोत्सवाचे उद्घाटन ऐतिहासिक दसरा चौक मैदानात होणार असून, एकूण ५ दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन भव्य अशा मंचावर होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग व भारत सरकारच्या दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील दहा राज्यांमधील प्रसिद्ध लोककला व लोकनृत्यांचे सादरीकरण करण्यासाठी प्रसिद्ध कलाकारांचे समूह कोल्हापूरात येणार आहेत. प्रसिद्ध कलाकार व शाहिर रामानंद उगले यांचा 'पंचगंगातीरी आम्ही कोल्हापूरी' हा सांस्कृतिक कार्यक्रम तसेच यावर्षी कोल्हापूर संस्थानच्या संस्थापिका व स्वराज्य रक्षिता छत्रपती महाराणी ताराराणी यांचे ३५० वे जयंती वर्ष असल्याने त्यांच्या जीवनावर व कर्तृत्वावर आधारित भव्य असे 'भद्रकाली ताराराणी' महानाट्य २४ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील नागरिकांनी तसेच देशभरातून येणाऱ्या भाविक व पर्यटकांनी या कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

# मटका घेणाऱ्यावर कारवाई

जयसिंगपुर,ता.१७(प्रतिनिधी)–

**जयसिंगपूर शहरातील मच्छी मार्केट येथे हॉटेल मधुरा शेजारी आडोशाला उघड्यावर मटका घेणाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाई मध्ये दत्ता यामनाप्पा कलगुटगी (वय ६४ रा. समडोळेमळा शाहूनगर जयसिंगपूर) आणि बुक्की मालक सुनील काळे (रा. सांगली) यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.**

१७ सप्टेंबर रोजी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास संशयित आरोपी हे आपल्या ताब्यात असलेल्या आयटेल कंपनीच्या मोबाईलवर मटका मालक सुनील काळे यांचे फायदा करिता १० टक्के कमिशनवर बेकायदेशीररित्या लोकांची कडून पैसे घेऊन कल्याण बाजार मटका आकड्यावर पैसे लावून जुगार खेळ चालवत असताना मिळून आले आहेत. यावेळी रोकड सव्वातीन हजार रुपये, पंधरा हजार रुपये किमतीचा मोबाईल व मटकाचे साहित्य मिळून आले आहे.त्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

# चित्रनगरीसंदर्भात आज कोल्हापुरात चर्चासत्र

कोल्हापूर, ता.१७ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्यावतीने गुरुवारी (दि. १८ सप्टेंबर) चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते दुपारी बारा वाजता हॉटेल सयाजी येथे चर्चासत्राचे उद्घाटन होईल.**

कोल्हापूर चित्रनगरीच्या माध्यमातून कोल्हापूरच्या विकासाला चालना मिळू शकते, या मध्यवर्ती संकल्पनेवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रनगरीः कोल्हापूरच्या विकासाचे महाद्वार असा चर्चासत्राचा विषय आहे. खासदार सत्यजित देशमुख आदी उपस्थित राहणार आहेत. अभिनेते किशोर कदम, अभिनेते सागर तळाशीकर, ईटीव्हीच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉ. उदय नारकर, चित्रपट अभ्यासक डॉ. कविता गगराणी आणि दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी चर्चासत्रात सहभागी होणार आहेत. हॉटेल सयाजी येथे मेघ–मल्हार सभागृहात चर्चासत्र होणार असून कला क्षेत्रातील लोकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन चित्रनगरी महामंडळाचे कार्यकारी संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

# सोने पॉलिशच्या बहाण्याने पावणेतीन लाखाचे दागिने लंपास

सांगली,ता.१७ (प्रतिनिधी)–

**सोने पॉलिश करून देण्याच्या बहाण्याने दोन लाख ८० हजार रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे दुपारी घडली. याप्रकरणी चिंचणी – वांगी पोलिसात तिघा संशयितांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. दुर्गेश किसनकुमार गुप्ता (रा. म्हैसूर बाजार, जमालपूर, जि. खगडिया) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याचे साथीदार योगेश यादव व विकास सहा हे दोघे फरार आहेत.**

मोहिते वडगाव येथे सुलोचना भिकाजी मोहिते (वय ७०) या दुपारी घरामध्ये एकट्याच होत्या. तिघे संशयित त्यांच्या घरी आले. त्यांनी सुलोचना यांना सोने पॉलिश करून देतो, असे सांगितले. सुलोचना यांनी त्यांना सोन्याच्या बांगड्या, पाटल्या असे ५६ ग्रॅमचे दागिने काढून दिले. संशयितांनी ते त्यांच्याकडे असलेल्या लिक्कीडमध्ये घालण्याचा बहाणा केला व सोन्याच्या बदल्यात बनावट सोने देऊन ते पसार झाले.

ते निघून गेल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे सुलोचना यांच्या लक्षात आले. त्यानंतर पोलिसात धाव घेतली. त्यानंतर तपास सुरू केला. रात्री उशिरा संशयित दुर्गेश गुप्ता हा मोहिते वडगाव परिसरात सापडला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. इतर दोघे फरार झाले आहेत. चिंचणी–वांगी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल घुगे व पोलिस उपनिरीक्षक योगेश शेलार करीत आहेत.

# सांगलीत घरातून ३३ हजाराचा मुद्देमाल लंपास

सांगली,ता.१७ (प्रतिनिधी)–

**सांगली शहरातील गुलमोहर कॉलनीतील घरातून चोरट्याने ३३ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी सागर गणपती गायकवाड (रा. राजमती निवास, माळी चित्रमंदिर नजीक, अजब कॉर्नर, गुलमोहर कॉलनी ) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुलमोहर कॉलनीत सागर गायकवाड यांचे घर आहे. सोमवारी सायंकाळ ते मंगळवार सकाळ या कालावधीत चोरट्याने गायकवाड यांच्या घरात शिरुन आतील लाकडी कपाटात ठेवलेली रोख रक्कम, सोन्याची अंगठी आणि तांबे – पितळेची भांडी असा मुद्देमाल लंपास केला. पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**CHANGE OF NAME**

I am changing My name from **MRS. INDU DEVI ALOKE KUMAR CHOUDHARY** to **MRS. INDUDEVI ALOKE CHOUDHARY** for Passport Issuance

Affidavit No.:18/35/25
Date : 17/09/2025

**CHANGE OF NAME**

I am changing My name from **MR. ALOKE KUMAR HIRALAL CHOUDHARY** to **MR. ALOKE HIRALAL CHOUDHARY** for Passport Issuance

Affidavit No.:18/36/25
Date : 17/09/2025

**■ संपादकीय ■**

# तेजस्वींच्या दाव्याचा अन्वयार्थ

२०२५ च्या निवडणुकीच्या राजकारणामध्ये सर्वात जास्त चर्चा होणायाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा अद्याप झाली नसली, तरी वातावरण मात्र चांगलेच गरम झाले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि मुख्यमंत्री पदाचे प्रबळ दावेदार तेजस्वी यादव यांनी बिहारमध्ये सर्व २४३ जागांवर राष्ट्रीय जनता दल निवडणूक लढवू शकतो, अशी घोषणा केल्यामुळे बहुचर्चित महागठबंधनच्या अस्तित्वाबाबत काही शंका निर्माण होत आहेत. अर्थात, बिहारमधील मुझफ्फरपूर येथे एका महत्त्वाच्या राजकीय सभेमध्ये बोलताना तेजस्वी यादव यांनी ज्या प्रकारे सर्व २४३ जागांवर तेजस्वी यादव उभा आहे,असे गृहीत धरूनच मतदारांनी पाठिंबा द्यावा असे वक्तव्य केले, त्याला एक वेगळा अर्थही आहे. राष्ट्रीय जनता दलाला सर्व २४३ जागा लढायच्या आहेत हा त्याचा वरवरचा अर्थ असला, तरी महागठबंधनच्या राजकारणामध्ये उमेदवार कोणीही असला तरी माझा चेहरा समोर ठेवूनच सर्व मतदारसंघांमध्ये मतदान करावे, असे अप्रत्यक्षपणे तेजस्वी यादव यांनी मतदारांना सुचित केले आहे. बिहारमधील गेल्या पंधरा वर्षांच्या राजकारणामध्ये तेजस्वी यादव यांचा राजकीय प्रभाव वाढत चालला आहे हे नाकारण्याचे कारण नाही. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा खरा राजकीय वारसा सांभाळणाऱ्या तेजस्वी यादव यांनी आपल्या पक्षालाही चांगली प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय जनता दलाने चांगली कामगिरीही आतापर्यंत केली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये १४३ जागा लढवून राष्ट्रीय जनता दराने ७५ म्हणजे सर्वात जास्त जिंकल्या होत्या. तेजस्वी यादव यांच्या चेहऱ्याची आणि त्यांच्या शैलीची बिहारमध्ये क्रेझ आहे हे नाकारता येत नाही.पण गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि इतर नेते ज्या प्रकारे बिहारमध्ये कॅम्पेनिंग करत आहेत ते पाहता मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून तेजस्वी यादव यांची घोषणा त्यांना मान्य असेल का, हेसुद्धा पहावे लागेल. बिहारमधील काँग्रेसच्या नेत्यांच्या म्हणण्याप्रमाणे, काँग्रेसने निवडणूक आयोगाला लक्ष्य करून मतचोरीचा जो विषय समोर आणला आणि बिहारमध्ये ज्या विविध प्रकारच्या रॅली काढल्या त्यामुळे सरकार विरोधी वातावरण तयार झाले आहे. महागठबंधनमध्ये काँग्रेसचा सुद्धा वाटा महत्त्वाचा असावा अशी बिहारमधील काँग्रेस नेत्यांचीही अपेक्षा आहे.गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने फक्त ७० जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी १९ जागांवरच काँग्रेसला विजय मिळवता आला होता. बिहारमध्ये काँग्रेसचा तेथील स्थानिक नेता राज्याचा चेहरा म्हणून समोर येत नसला तरी राहुल गांधी यांचा चेहरा या निवडणुकीसाठी वापरण्याचे धोरण काँग्रेसने पत्करले आहे. गेल्या आठवड्यात बिहारमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये राहुल गांधी यांना जेव्हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, असा प्रश्न विचारला असता त्यांनी त्या प्रश्नाचे उत्तर टाळले होते. याच पार्श्वभूमीवर आता तेजस्वी यादव यांनी आपल्या ताज्या राजकीय सभेमध्ये बिहारमध्ये सर्व जागांवर तेजस्वी यादवच उभे आहेत असे गृहीत धरून मतदान करा, हे जे आवाहन केले आहे त्याचा अर्थ मुख्यमंत्रिपदाचा चेहरा मीच आहे हे गृहीत धरा हाच होऊ शकतो. बिहारमध्ये प्रादेशिक पातळीवर इतर कोणताही नेता सध्या तेजस्वी यादव यांच्या एवढा लोकप्रिय किंवा चर्चेत नसल्यामुळे महागठबंधनच्या घटक पक्षांना तेजस्वी यादव यांचे नेतृत्व मान्य होण्यासही हरकत नाही. यानिमित्ताने महागठबंधनमध्ये कोणता पक्ष किती जागा लढवतो हा विषयसुद्धा महत्त्वाचा ठरणार आहे. गेल्या वेळेपेक्षा आपल्याला जास्त जागा मिळाव्यात अशी अपेक्षा काँग्रेसने आधीच व्यक्त केली आहे. पण गेल्या वेळेपेक्षा कमी जागा घेण्यास राष्ट्रीय जनता दलालाही इच्छा नाही.महागठबंधनमधील सर्वच पक्ष नितीशकुमार यांना विरोध करण्यासाठी एकत्र आले असल्यामुळे जागा वाटपाबाबत वादविवाद जरी झाले तरी एखाद्या तोडग्यापर्यंत पोहोचून ही आघाडी नितीशकुमार यांना आव्हान देण्यासाठी मैदानात उतरेल हे निश्चित आहे.या आघाडीचा चेहरा म्हणून तेजस्वी यादवच समोर येत आहेत हे वास्तवही या निमित्ताने नाकारता येत नाही.तेजस्वी यादव यांनी आतापर्यंत दोनवेळा बिहारचे उपमुख्यमंत्रिपद भूषवले असल्यामुळे आणि बिहारमधील तरुण मतदारांमध्ये त्यांची मोठी क्रेझ असल्यामुळे यावेळी निश्चितच तेजस्वी यादव यांचा चेहरा मतदारांना नितीशकुमार यांच्या सत्ताधारी चेहऱ्यापेक्षा जास्त आश्वासक वाटला,तर बिहारची ही निवडणूक निश्चितच रंगतदार होणार आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने मतचोरीच्या मुद्यावर मोठ्या प्रमाणात वातावरण निर्मिती केली असली, तरी जागावाटपाच्या चर्चेमध्ये काँग्रेसला नेहमी सारखीच तडजोड करावी लागेल असे दिसते. तेजस्वी यादव यांनी नव्याने केलेल्या नेतृत्वाच्या या विधानावरून काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांची काय भूमिका आहे हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे.

# वक्फ सुधारणा कायद्यावर 'सर्वोच्च' निर्णय

**वक्फ (सुधारणा) कायदा-२०२५ च्या घटनात्मक वैधतेवर अखेर सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांनंतर अंतरिम निकाल दिला. या कायद्यात करण्यात आलेल्या दोन वादग्रस्त सुधारणा न्यायालयाने स्थगित केल्या. तसेच वक्फ बोर्डावर मुस्लिमांचेच वर्चस्व राहील असा निर्णय दिला.वक्फ बोर्डात गेली किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचे पालन केलेल्या व्यक्तीच्या नियुक्ती संदर्भातील तरतुदीचा समावेश आहे. घटनात्मकतेची रूपरेषा सांगणारा संपूर्ण कायदा स्थगित करण्यास न्यायालयाने नकार दिला.**

वक्फ बोर्डाला आपली मालमत्ता ज्या व्यक्तीला दान करायची आहे ती व्यक्ती त्या आधीची पाच वर्षे इस्लाम धर्माचे पालन करणारी असावी, अशी सुधारणा वक्फ कायद्यात सरकारने केली होती.त्याचबरोबर वक्फ मालमत्तेची मालकी ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे ही सुधारणा वक्फ कायद्यात सरकारने केली होती. न्यायालयाने या दोन्ही सुधारणांना स्थागिती दिली. मात्र वक्फ मालमत्तांची नोंदणी आणि वक्फ बोर्डावर पदसिद्ध सदस्याची नेमणूक याबाबत केलेल्या सुधारणांना स्थगिती दिली नाही.सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या.ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने २२ मे २०२५ रोजी वक्फ सुधारणा कायद्याच्या घटनात्मक वैधतेवरील सुनावणी पूर्ण करून निकाल राखून ठेवला होता.

वक्फ सुधारणा कायद्यातील कलम ३ (आर),३(डी) ७ आणि ८ या तरतुदींवर प्रामुख्याने आक्षेप घेण्यात आला होता. यापैकी कलम ३ (आर) नुसार वक्फ बोर्डाला आपली मालमत्ता दान करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने मागील किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचे पालन करणे अनिवार्य असल्याची अट होती.या अटीला स्थगिती देताना न्यायालयाने म्हटले की,जोपर्यंत या संदर्भात सरकार ठोस नियम तयार करत नाही तोपर्यंत ही तरतूद लागू करता येणार नाही. तसे करणे मनमानीपणाचे ठरेल. वक्फ सुधारणा कायद्यातील कलम ३ (७४) संबंधित महसुली नोंदीची तरतूद न्यायालयाने स्थगित केली. जोपर्यंत वक्फ मालमत्तेच्या मालकी हक्काचा वक्फ लवाद आणि उच्च न्यायालयात अंतिम निकाल होत नाही तोपर्यंत वक्फ बोर्डाला संबंधित



मालमत्तेतून बेदखल करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.पुढे न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, मालमत्तेच्या मालकी हक्काशी संबंधित मालमत्तेमध्ये कोणाही तिसऱ्या पक्षकाराचा मालकी हक्क मान्य केला जाणार नाही.जिल्हाधिकारी किंवा सरकारला मालमत्तेची मालकी ठरवण्याचा अधिकार देता येणार नाही. तसे करणे अधिकारांच्या समन्यायी विभागणीच्या विरोधी ठरेल.

वक्फ मालमत्तांचे नियमन करण्यासंबंधीचा वक्फ कायदा-१९९५ मध्ये काही सुधारणा करून वक्फ सुधारणा कायदा-२०२५ केंद्र सरकारकडून तयार करण्यात आला. या कायद्याला काँग्रेस खासदार महंमद जावेद आणि ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लमिन (एआयएमआयएम) या पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी सर्वोच्च न्यायालयात सर्वप्रथम आव्हान दिले. त्यानंतर आणखी काही याचिका या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या.

वक्फ (सुधारणा) कायदा - २०२५ हा हेतुपुरस्सर मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना लक्ष्य करणारा आहे.

**दैनंदिनी**

मुस्लिमांना आपले धार्मिक निर्णय घेण्याचा अधिकार भारताच्या राज्यघटनेने दिला असून, या अधिकारांवर हा कायदा अधिक्षेप करणारा आहे, असा युक्तिवाद मुस्लिम याचिकाकर्त्यांनी केला होता.तर दुसरीकडे या कायद्याच्या बाजूने महाराष्ट्र,हरियाणा,मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि आसाम या भाजपशासित सहा राज्यांनी याचिका दाखल केल्या होत्या. जुन्या वक्फ कायद्यातील वहिवाटीने वक्फ या तरतुदीला या राज्यांनी प्रामुख्याने आक्षेप घेतला होता. ही तरतूद रद्द करण्यास मुस्लिम याचिकाकर्त्यांचा कडाडून विरोध होता.वहिवाटीने वक्फ ही तरतूद रद्द केल्यास अनेक ऐतिहासिक मस्जिदी, दफनभूमी आणि धर्मादाय मालमत्ता यापैकी काही मालमत्ता काही शतकांपासून कोणत्याही लेखी कराराशिवाय अस्तित्वात आहेत.त्यांच्यावरील वक्फचा मालकी हक्क संपुष्टात येईल, असे मुस्लिम याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. यावर सोमवारी निर्णय देण्यात आला नाही.सोमवारी दिलेली स्थगिती ही प्रथमदर्शनी निरीक्षणातून दिलेली असून,या कायद्याच्या वैधतेबद्दल हा अंतिम निकाल नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.वक्फ मध्यवर्ती बोर्डावरील एकूण २२ सदस्यांपैकी ४ पेक्षा जास्त सदस्य गैरमुस्लिम असू नयेत. तसेच राज्य वक्फ बोर्डाच्या ११ सदस्यांपैकी तीनहून अधिक सदस्य गैरमुस्लिम असता कामा नयेत. म्हणजेच वक्फ बोर्डावर बहुमत हे मुस्लिम सदस्यांचे असले पाहिजे.त्याचबरोबर वक्फ बोर्डाचा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)शक्यतो मुस्लिमच असला पाहिजे, असे मत न्यायालयाने स्पष्ट केले.

# कुमकुवत देशातील अराजकता

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे.श्रीलंका आणि बांगलादेशात जे घडले तेच नेपाळमध्ये घडत आहे. नेपाळच्या के पी शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यावर तेथील तरुणाईने (जेन झी) मोठा उठाव केला. हा उठाव इतका मोठा होता की नेपाळचे पंतप्रधान के.पी.शर्मा ओली यांना पदावरून पाय उतार व्हावे लागले. त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळू पळू मारले. त्यांची धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले. राजकीय नेत्यांची घरे जाळली.

सरकारी कार्यालयाला आगी लावल्या. नेपाळची संसद आणि सर्वोच्च न्यायालय जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मरण पावले तर १३०० हून अधिक नागरिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच श्रीलंकेमध्ये तीन वर्षापूर्वी घडले.बांग्लादेशातही मागीलवर्षी तेच घडले. श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला.त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली.

नेपाळचे पंतप्रधान के पी शर्मा ओली हेही देश सोडून पळून गेले त्यामुळे नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी नेपाळच्या हंगामी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली.बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात आश्रय घेतल्यावर तिथे राजकारणाबाहेरील व्यक्ती असलेल्या मोहम्मद युनूस यांच्याकडे बांगलादेशचे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. मोहम्मद युनूस हे नोबेल पुरस्कार विजेते व्यक्ती आहेत.त्यांनी बांगलादेशची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वत्र त्याचे स्वागत करण्यात आले.भारतानेही त्याचे स्वागत केले त्यांच्या कार्यकाळात बांगलादेश आणि भारताचे संबंध दृढ होतील, असा विश्वास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता मात्र झाले उलटेच. मोहम्मद युनूस लष्कर आणि मुलतत्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले.चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपी लागून ते भारताच्या खोड्या काढू लागले.नेपाळची सूत्रेही राजकारणा बाहेरील व्यक्तीकडे गेली आहेत त्यामुळे नेपाळमध्येही बांगलादेशची पुनरावृत्ती होते की काय अशी शंका येते.

राजकीय छक्के पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहित नसलेल्या नेपाळच्या या नव्या पंतप्रधानांना तेथील लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून? बांग्लादेशात आपण हे पाहिले आहे.नेपाळमधील या अराजकतेमागे बाह्य शक्तीचा हात आहे हे लपून राहिले नाही. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर कोण? असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काही जण याचे उत्तर भारत असे देत आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळप्रमाणे भारत ही अराजकतेच्या वाटेवर आहे असे बिंबवण्याचे प्रयत्न चालू आहे.जे श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळमध्ये घडले तेच भारतातही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी,अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. जागतिक पटलावर भारताचे वाढते वर्चस्व सहन न होणाऱ्या हित शत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत.

भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही. संविधान हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही आपला देश एकसंध आहे तो केवळ आपल्या संविधानामुळे. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या शेजारील देशात अनेकदा उठाव, बंड झाले. काही देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही आली. आपल्या देशात मात्र अजूनही लोकशाही आहे म्हणजेच लोकांचे राज्य आहे.जोवर या देशात भारतीय संविधान आहे आणि जोवर आपल्या देशात लोकशाही आहे.तोवर या देशात अराजकता मानणार नाही.

**■ श्याम ठाणेदार**



९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते. त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला, असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण पानिपत,महानायक आणि झाडाझडतीसारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत. त्यामुळे साहित्यिक म्हणून त्यांचा दरारा कायम आहे.

# मराठी साहित्याचा विश्वास...

## सातारा साहित्य संमेलन अध्यक्षपदी विश्वास पाटील यांची निवड सर्वोत्कृष्ट

यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलनं चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे.

साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही.कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता.सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे.दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत.विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका.याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.

विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे,परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे.

विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

**■ शिवाजी चौगुले**

## वाचकांचा पत्रव्यवहार

# काळाची आणि बाळाची गरज

भारताच्या रजिस्ट्रार जनरलच्या २०२३ च्या नमुना नोंदणी प्रणाली (एसआरएस) अहवालानुसार, देशभरातील २.५ टक्के महिलांच्या सहा लाख महिलांची प्रसूती कोणतेही प्रशिक्षण नसलेल्या महिलांकडून किंवा वैद्यकीय मदतीशिवाय होत असल्याचे समोर आले आहे. कोणतेही प्रशिक्षण नसलेल्या महिला किंवा इतरांकडून प्रसूती करून घेण्याचे प्रमाण ग्रामीण भागात २.३ टक्के असून, शहरात प्रमाण १.१ टक्के इतके आहे. तसेच कोणत्याही वैद्यकीय मदतीशिवाय प्रसूतीचे प्रमाण ग्रामीण भागात ०.७ तर शहरात ०.१ टक्के इतके आहे. अहवालानुसार,भारतात एकूण ७२.५ टक्के प्रसूती सरकारी रुग्णालयांत झाल्या.तर २३.४ टक्के खासगी रुग्णालयात झाल्या.

उर्वरित २.७ टक्के प्रसूती पात्र डॉक्टरांकडे तर २ टक्के प्रसूती प्रशिक्षित महिलांकडे झाल्या आहेत. ग्रामीण भागात ७६.४ टक्के प्रसूती सरकारी रुग्णालयांत तर शहरी भागात ५६.७ टक्के



प्रसूती सरकारी रुग्णालयात झाल्या आहेत. म्हणजेच ग्रामीण भागातील महिलांचा सरकारी रुग्णालयांवर अधिक विश्वास दिसत आहे. तर शहरातील महिलांचा खासगी रुग्णालयांवर विश्वास दिसत आहे. तरीही देशभरात महिलाची प्रसूती कोणतेही प्रशिक्षण नसलेल्या महिलांकडून होत आहे.

देशात हे प्रमाण सर्वाधिक असून,त्यामुळे मातामृत्यू व बालमृत्यूचे धोके वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.माते करिता प्रसूती काळ हा पुनर्जन्माचा काळ समजला जातो.त्यामुळे या असुरक्षित प्रसूती टाळण्याकरिता विशेष जागृती आरोग्य विभागाने करण्याची काळाची आणि होणाऱ्या बाळाची गरज आहे.

**■ दत्तप्रसाद शिरोडकर**

# विश्वास पाटील यांच्या निवडीने कोल्हापुरच्या शिरपेचात मानाचा तुरा

सातारा येथे १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या ९९ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मराठी साहित्य परंपरेला समृद्ध करणारे ज्येष्ठ लेखक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड करण्यात आल्याचे वृत्त आहे. त्यामुळे कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विश्वास पाटील हे मुळचे कोल्हापूर जिल्ह्याच्या शाहुवाडी तालुक्यातील नेर्ली येथील रहिवासी असून त्यांची पानिपत हि ऐतिहासिक कांदबरी साहित्य विश्वातील मराठीत मैलाचा दगड ठरली आहे. त्याचबरोबर झाडाझडती, नागकेशर, मृगजळ, चंद्रमुखी अशा कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनावर छाप पडली आहे. विश्वास पाटील हे साहित्य विश्वाबरोबर कार्यकुशल, प्रशासकीय अधिकारी म्हणून उत्कृष्ट काम पाहिले आहे.साताऱ्याचे ते पुनर्वसन अधिकारी होते. तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी केवळ चौदा महिन्यात शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम पूर्ण केले आहे.संमेलनाचे अध्यक्षपद हि अत्यंत प्रतिष्ठेची जबाबदारी असते. किंबहुना,त्यांच्या या निवडीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पदाचा मान कोल्हापूरला मिळाले आहे. ग्रामीण भागांतील कथनशैली,सामाजिक वास्तव आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा संगम असलेल्या त्यांच्या लेखनाला मिळालेली हि दादच ठरते छत्रपती शाहु महाराजांची समाजसुधारणेची परंपरा, लोकनाट्य, तमाशा, किर्तन, भजन यासारख्या लोककला आणि त्यातून आलेले साहित्य हि कोल्हापूरची ओळख आहे.अशा भूमीतून घडलेले विश्वास पाटील आज मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले हि कोल्हापूरकरांसह या भागांतील सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या निवडीमुळे मराठी साहित्यविश्वात मानाचा तुरा रोवला गेला आहे. साहित्यप्रेमी, अभ्यासक, युवा लेखक यांच्यासाठी विश्वास पाटील यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी आहे.अभ्यासू दृष्टिकोन, तपशीलवार लेखनशैली आणि ऐतिहासिक घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन साहित्यप्रेमींना मार्गदर्शक ठरणारं आहे !

**■ राजू जाधव, मांगूर**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**गुरूवार ता.१८.९.२०२५,** विक्रमसंवत २०८१, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सरे दक्षिणायणे, वर्षा ऋतो, भाद्रपद मासे, कृष्ण पक्षे, द्वादशी तिथी,२३.२५ नंतर त्रयोदशी तिथी, पुष्य नक्षत्र, ६.३३ नंतर आश्लेषा नक्षत्र, कर्क रास, शिवयोग, २१.३६ नंतर सिद्ध योग, कौलव करण,११.२९ नंतर तैतिल करण २३.२५ पर्यंत, दिनमान १२.०५, सुर्योदय ६.२५, सुर्यास्त १८.३०,(कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी. १.३० ते ३, गुरुपुष्यामृत,६.३३ पर्यंत, धान्य कापणी, केळी लागवड, द्वादशी श्राद्ध, सन्यासिनां महा

**ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष–**कुटूंबियांसोबत फिरायला जाण्याचा बेत आखाल.सरकारी कामांमध्ये सावधगिरी बाळगा.व्यापारी येणी वसूल होतील. वाद–विवाद टाळा.

**वृषभ–**आर्थिक स्थितीतील बदलही सकारात्मक राहतील. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे.कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.स्वत:ला क्रिएटिव्ह कामात गुंतवून घ्या.

**मिथून–**सहकार्यांचे सहकार्य मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. एखाद्या सहलीचे आयोजन करू शकता. व्यावसायिकांशी संबंधित समस्यांकडे लक्ष द्या.

**कर्क–**नोकरीत आर्थिक प्राप्ती होण्याची शक्यता आहे. संततीकडून लाभ होण्याची संभावना आहे.आजचा दिवस फलदायी आहे. चुका सुधारण्याचा प्रयत्न करा.

**सिंह–**व्यवसायात भागीदारी करणे फायदेशीर ठरेल. इतरांवर तुमचा प्रभाव राहील. संततीकडून चांगली बातमी मिळेल.वाद–विवाद टाळा.

**कन्या–**तुमचे अथक प्रयत्न आणि कुटुंबातील सदस्यांचा वेळीच मिळालेला पाठिंबा यामुळे अपेक्षित निकाल तुम्हाला मिळतील. नवीन करार लाभदायक वाटण्याची शक्यता आहे.

**तुळ–**पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. कुटुंबियांसमवेत शांत आणि स्थिर दिवसाचा आनंद घ्या.खरेदीमध्ये उधळेपणा टाळा.

**वृश्चिक–**तुमचे ज्ञान आणि विनोदबुद्धी यामुळे तुमच्या अवतीभवतीचे लोक प्रभावित होतील. भूतकाळातील आनंदी क्षणांमध्ये तुम्ही गुंतून जाल.

**धनु–**आर्थिक रूपात आज तुम्ही बरेच मजबूत असाल, ग्रह नक्षत्रांच्या चालीने तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल त्यामुळे तुमच्या काही आर्थिक समस्या दूर होतील.

**मकर–**सकारात्मकपणे विचार करण्याची सवय लावा. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा

**कुंभ–**ठामपणाने,धाडसी आणि जलद निर्णय घेऊन परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा. अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा.

**मीन–** यश मिळविण्यासाठी वेळकाळ पाहून तुमच्या संकल्पनांमध्ये बदल करा. त्यामुळे तुमचा दृष्टिकोन विस्तारेल, तुमचे क्षितीज व्यापक बनेल,तुमचे व्यक्तीमत्व वृद्धिंगत होईल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई-दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री.दि.पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# ढोणेवाडी ग्रा.पं.च्या भोंगळ कारभाराने नागरिक त्रस्त

## गावात नागरी सुविधांचा अभाव;सत्ताधारी, विरोधी गटाचे अक्षम्य दुर्लक्ष

ढोणेवाडी,ता.१७(प्रतिनिधी)-

**ढोणेवाडी ग्रामपंचायतमधील खुद्द सत्ताधारी गट व विरोधी गटाच्या निष्काळजीपणामुळे ग्रामपंचायतीमध्ये भोंगळ कारभार सुरू झाला आहे. ग्रामपंचायतमध्ये कोणाचा ताळमेळ कोणाला नसल्यामुळे अनेक समस्या घेऊन येणाऱ्या नागरिकांना ग्रामपंचायत मधून रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.**



सतू खोत विहीरजवळ रस्त्यावर पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे.

गावात नागरी सुविधांचा अभाव दिसून येत आहे. पीडीओ, सेक्रेटरी व कर्मचारी वेळेवर येत नसल्याने व गेल्या नऊ महिन्यापासून मासिक मीटिंग झाली नसल्याने अनेकांची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे गावच्या विकासासाठी विकासाचे गाजर दाखवून निवडून आलेले अध्यक्ष व सदस्य यांनीच खुद्द गावच्या विकासासाठी नामुष्की दाखवल्याने गावांमधून संताप व्यक्त केला जात आहे.ढोणेवाडी बोरगाववाडी ग्रामपंचायतमध्ये चौदा सदस्य संख्या असून गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना ग्रामपंचायतीच्या आंधळ्या कारभाराबद्दल अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सत्ताधारी व विरोधी गट निष्क्रिय बनल्याने ग्रामपंचायत फक्त आता शोभेची वस्तू बनली आहे. घरकुल योजनेत

अर्थ पूर्ण वाटाघाटी व कामांत ग्रामपंचायत अध्यक्ष यांच्या नातेवाईकांचा हस्तक्षेप आणि ढवळाढवळ वाढल्याने सत्ताधारी गटात फुट पडून गेल्या अनेक महिन्यांपासून गावचा विकास ठप्प झाला आहे.त्यातच विरोधी गटही सक्षम नसल्याने ढोणेवाडी गावचे भवितव्य काय?असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक समस्या आवासून उभ्या राहिल्या आहेत.मासिक मीटिंग होत नसल्याने घर नोंदणी व डिजिटल उतारा कामे रखडली आहेत.या नऊ महिन्यात तीन पीडिओ आले आणि गेले कधी हे समजत नाही. सेक्रेटरीही नाहीत.त्यामुळे समस्या मांडायची कोणापुढे.?

गावात घाणीचे साम्राज्य वाढल्याने रोगराई व अनेक साथीच्या रोगांचा फैलाव होत आहे.

ग्रामपंचायतीतील अनेक साहित्य, विद्युत मोटर, काहींनी परस्पर नेवून लंपास केल्याचे ऐकावयास मिळत आहे. प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना अद्यापही शौचालयाची सोय नसल्याने पुन्हा एखाद्याचा जीव गेल्यावरच ग्रामपंचायतीला जाग येणार काय ? असा पालकांतून प्रश्न विचारला जात आहे. रिंग रोडवरील गटारी व रस्त्यावर काटेरी झुडपे यांचे आच्छादन वाढून गटारी तुंबून दुर्गंधी पसरली आहे.गावचा विकास म्हणून मुरुम विकून तलावाचे रुंदीकरण केले पण त्याच तलावासभोवती आता घाणीचे साम्राज्य वाढले आहे.हजारो रुपयांची लावलेली झाडे पाणीपाणी म्हणून वाळून जात आहेत. दलित स्मशानभूमीत उभारण्यात आलेले पाण्याची टाकी उद्‌ध्वस्त करण्यात आली आहे.

विकास म्हणून गावातील चक्क पोस्ट ऑफिस पाण्याच्या टाकीमध्ये बसवून नागरिकांना त्रास देणाऱ्या सत्ताधारी गटातील काही सदस्यांना विचारणार कोण? गणेश उत्सव अंधारात गेला आता दसरा दिवाळी आली तरीही गावामध्ये तसेच नवग्राम कॉलनी, गणेश नगर व अन्य भागात विद्युत खांबावर बल्ब नसल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. आडीगुडी माळ भागात पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने पाण्यासाठी तेथील नागरिकांना भटकावे लागत आहे. सतू खोत विहीरीजवळ पाणी साचून राहिल्याने शालेय विद्यार्थी, महिला यांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागत आहे.ढोणेवाडीची स्वतंत्र ग्रामपंचायत असताना गावची दयनीय अवस्था झाली असतानाही कोणीही गावच्या समस्या कडे सत्ताधारी व विरोधी गटाचे सदस्य लक्ष द्यायला तयार नाहीत त्यामुळे ग्रामपंचायतीच्या या भोंगळ कारभाराबद्दल ग्रामस्थांमधून असंतोष व्यक्त होत आहे.

> ग्रामपंचायत सत्ताधारी व विरोधी गटाकडून गावच्या विकासासाठी कोणतीच पावले उचलली जात नाही त्यामुळे गावात समस्या आहेत. सणासुदीत सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. मीटिंग होत नसल्याने गेल्या नऊ महिन्यापासून घरकुलच्या नोंदी व डायरीची कामे रखडली आहेत. अधिकारी व कामगार वेळेवर येत नाहीत. तसेच घरासाठी व विहिरीसाठी पैसे घेतले जात आहेत.त्यामुळे संबंधित जिल्हा पंचायत सेक्रेटरी व जिल्हा अधिकारी यांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे.
>
> **- आण्णासाहेब नागराळे**

### नऊ महिन्यांपासून मिटींग झाली नसल्याने कामे खोळंबली

> मासिक मीटिंग होत नसल्याने अनेक कामे खोळंबली आहेत तसेच गावात समस्यांचा डोंगर उभा आहे त्याचबरोबर कर्मचाऱ्यांचा पगार देखील थकीत आहे त्यामुळे एकंदरीत ढोणेवाडी ग्रामपंचायतचा कारभार हा भोंगळ प्रकारे चालला आहे. त्यामुळे ग्रामस्थ विकासाच्या प्रतिक्षेत आहेत.
>
> **-दयानंद पाटील**

### ग्रामपंचायतीचे कर्मचारी बनले सदस्य ...

ग्रामपंचायतीकडे सत्ताधारी व विरोधी गटातील सदस्य फिरकत नसल्याने ग्रामपंचायतमध्ये फक्त कर्मचारीच हजर असतात.त्यामुळे समस्या घेऊन येणाऱ्या ग्रामस्थांना कर्मचाऱ्यांना भेटून आपली कैफियत मांडावी लागत आहे. त्यामुळे कर्मचारीच आता सदस्य बनल्याचे पहावयास मिळत आहे. सदस्यांच्यात एकमत नसल्याने कर्मचारी देखील यांचा फायदा उठवत पंचायतमध्ये सतत गैरहजर असतात. जन्म मृत्यूची नोंदी करण्यासाठी सेक्रेटरी नाहीत तर पीडीओ कधी येतात आणि जातात हेच समजायला तयार नाही तर क्लार्क देखील वारंवार गैरहजर असतो बाकीचे मोबाईलमध्ये मग्न असतात त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.



## कुर्ली हायस्कूलच्या व्हॉलीबॉल संघाची जिल्हा स्पर्धेसाठी निवड

यमगर्णी,ता.१७(वार्ताहर)-

**गटशिक्षणाधिकारी कार्यालय निपाणी यांचेमार्फत १७ वर्षाखालील तालुका पातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कुर्ली येथील सिद्धेश्वर विद्यालयाच्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. त्यांची सलग दहाव्या वर्षी जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

बेडकीहाळ येथे झालेल्या या स्पर्धेमध्ये निपाणी तालुक्यातील विविध झोनमधून नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत कुर्ली संघाने बोरगाव संघाचा एकतर्फी पराभव करीत विजेतेपद पटकाविले.निपाणी प्रभारी क्रीडाशिक्षणाधिकारी सुनील पडलिहाळे यांचेहस्ते पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले. विजयी संघातील खेळाडूना क्रीडा शिक्षक, स्कूल कमिटी व बेटरमेन्ट कमिटी सदस्य,पालक व ग्रामस्थ यांचे प्रोत्साहन मिळाले.

## शैक्षणिक बाबतीत राजकारण झाले हे दुर्दैवी

### आम.शशिकला जोल्ले

निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)-

**मौलाना आझाद पब्लिक स्कूल उद्‌घाटनाचे विरोधकांकडून राजकारण करण्यात आले. अधिकारी वर्गावर मोठा दबाव आणण्यात आला म्हणून उद्‌घाटनप्रसंगी एकही शासकिय अधिकारी उपस्थित राहिले नाहीत.**



निपाणीः मौलाना आझाद पब्लिक शाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना आम.शशिकला जोल्ले व्यासपीठावर इतर मान्यवर.

शैक्षणिक बाबतीत राजकारण झाले,हे दुर्दैवी आहे.मुस्लिम समाजातील ऊर्दू शाळा, हायस्कूल, पदवीपूर्व विद्यालय आणले.आता मौलाना आझाद पब्लिक स्कूल आणले असून त्याचा लाभ संपूर्ण मुस्लिम समाजाला होईल,असे प्रतिपादन आम. शशिकला जोल्ले यांनी केले.

अल्पसंख्यांक कल्याण खात्याच्यावतीने निपाणी येथे सुरू करण्यात आलेल्या कर्नाटक मौलाना आझाद पब्लिक शाळेचा शुभारंभ आम.सौ.शशिकला जोल्ले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्ष संतोष सांगावकर, अरुणा मुदकडे, जास्मीन बागवान, राजू गुंदेशा,सुनिल पाटील, महालिंगेश कोठीवाले, करीम बागवान, इम्तियाज चावलवाले, सईद जमखानेवाले यांची उपस्थिती होती.जुबेर बागवान म्हणाले, आपल्या समाजाची शैक्षणिक प्रगती साधावी, याकरिता सतत जोल्ले दाम्पत्यांचे कार्य राहिले आहे. समाजासाठी १० कोटींहून अधिक विकास कामे केली आहेत.

यावेळी शकील चावलवाले, मुफ्ती शोएब, हाफिज सलाउद्दिन, हाफिज इनामुल हसन, इम्रान आलम बागवान, सोहेल इरफान बागवान, समीर सातारे, यासीन सातारी, इम्रान मारवाडी, बालूभाई बागवान, जपीर बागवान, मुदस्सर बागवान, अश्फाक आदम, योगीता घोरपडे,प्रणव मानवी, प्रशांत केस्ती,बंडा घोरपडे यांच्यासह मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन गंगा गलबी यांनी केले.आभार जास्मीन बागवान यांनी मानले.

## थोडक्यात

### बेडकिहाळ परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत

बेडकिहाळ,ता.१७(वार्ताहर)-

**येथील सिद्धार्थनगर, पाण्याची टाकी रस्ता, व मुल्लानगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून नागरीकांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

लहान मुले,महिला तसेच मॉर्निंग वॉकला जाणारे नागरिक भटक्या कुत्र्यांचा कळप पाहूनच घाबरत आहेत.बाहेरील गावातून कुत्री आणून या परिसरात सोडण्यात आल्याने या भागात भटक्या कुत्र्यांचा कळप वाढला आहे.याबाबत माजी ग्राम पंचायत सदस्य सज्जाद मुल्ला, मुरलीधर शास्त्री यांनी या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

### आडी डोंगराजवळील जीवघेणे खड्डे मुजविण्याची मागणी

कोगनोळी,ता.१७(प्रतिनिधी)-

**आडी डोंगराजवळील रस्त्यावर अनेक लहान-मोठे जीवघेणे खड्डे पडले आहेत.त्यामुळे अनेक लहान-मोठे अपघातांसह वाहने खराब होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांसह वाहनधारकांतून संताप व्यक्त होत आहे.**



आडी येथील रस्त्यावरुन निपाणी-हुपरी मार्गावरील बस सेवेसह इतर वाहनांची नेहमी वर्दळ असते. याशिवाय मल्लिकार्जुन डोंगर आणि दत्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. अशा रस्त्यातील मोठे खड्डे वाहन धारकांसाठी जीवघेणे ठरत आहेत. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना खड्ड्यांचा अंदाज न आल्याने ते थेट खड्ड्यात पडून जखमी होत आहेत. सतत अपघात घडत असून रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास कधीही मोठा जीवघेणा अपघात होऊ शकतो.या परिसरात कोणताही अपघात झाल्यास रुग्णवाहिकेतून निपाणीला यावे लागते.मात्र खड्डेमय रस्ता रुग्णवाहिकांसाठी धोकादायक ठरत असून वेळेवर रुग्णालयात न पोहोचल्यास जीव धोक्यात येऊ शकतो. तरी या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग खात्याने गांभीर्याने लक्ष देऊन खड्डे मुजवावेत,अशी मागणी वाहनधारकांतून होत आहे.



मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना आरती शिंदे, युवराज शिंदे, प्रा. शंकरराव संकपाळ,शाखेरा शेख व इतर.

### आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्काराने आरती शिंदे सन्मानित

कागल,ता.१७(प्रतिनिधी)

**करनूर (तालुका कागल )येथील अंगणवाडी सेविका आरती युवराज शिंदे यांना आदर्श अंगणवाडी सेविका म्हणून नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे .हा सन्मान हसन मुश्रीफ फाउंडेशन कागलच्यावतीने करण्यात आला.राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या शुभ हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.**

गोकुळचे चेअरमन नवीद मुश्रीफ ,गोकुळचे संचालक युवराज पाटील, भैय्या माने, गटशिक्षणाधिकारी सारिका कासोटे, पंचायत समिती सभापती रमेश तोडकर,माजी नगराध्यक्ष सुनील माळी, करनुरच्या सरपंच सौ.संगीता जगदाळे, राष्ट्रवादी शिक्षक सेलचे अध्यक्ष शंकरराव संकपाळ, विलास पवार,करनूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शाखेरा शेख- मुजावर, युवराज शिंदे, राज महंमद शेख,श्रीमती चिंगुबाई शिंदे,पूर्वा शिंदे, राजकुमार बाळासाहेब शिंदे,राजवर्धन शिंदे व परिवार उपस्थित होते.

## अंकले पीकेपीएसच्या सात संचालकांचा जोल्ले -जारकीहोळींना पाठींबा

संकेश्वर,ता.१७(वार्ताहर)-

**अंकले प्राथमिक कृषी पत्तीन सहकारी संघावर अखेर जोल्ले-जारकीहोळी गटाने वर्चस्व प्रस्थापित केले आहे.येथील ७ संचालकांनी जोल्ले-जारकीहोळी गटाला पाठींबा दर्शवून मतदानाचा अधिकार अंकले पीकेपीएसचे व्हाईस चेअरमन महादेव बळीराम किल्लेदार यांना दिला आहे.त्यामुळे येथे ए.बी-कत्ती गटाला धक्का बसलेला दिसत आहे.**



अंकलेःजोल्ले-जारकीहोळी गटास पाठींबा व्यक्त करताना सदस्य.

हुक्केरी तालुक्यात बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक निवडणुकीसाठी जोल्ले-जारकीहोळी विरोधात ए.बी-कत्ती गट टक्कर देताना दिसत आहे. अंकले पीकेपीएस मतदानाचा अधिकार प्राप्त केलेनंतर जिल्हा बँक निवडणुकीचे जोल्ले-जारकीहोळी गटाचे अधिकृत उमेदवार राजेंद्र पाटील म्हणाले, अंकले पीकेपीएसच्या ७ संचालकांनी जोल्ले जारकीहोळी यांच्या विकास कार्याला पाठींबा दर्शविला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक अमर नलवडे, संजय शिरकोळी, विद्युत संघाचे संचालक शशिराजे पाटील, अभिजित कुरणकर, सुरेश हुण्शाळी, बसवराज कोळी, किरण रजपूत, पवन पाटील, अंकलेचे नेताजी मगदूम, अरुण सुर्यवंशी,महेश बाडकर,अरुण किंवडा,पिंटू हुणश्याळी,राजू करमे आदी मान्यवर उपस्थित होते. कोणताहीअनुचित प्रकार घडू नये म्हणून संकेश्वर पोलीस निरीक्षक शिवशरण अवजी यांनी पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

## शिवसमर्थ व शिवशाहू संस्थेची वार्षिक सभा संपन्न

बारवाड,ता.१७(वार्ताहर)-

**कारदगा येथील शिवसमर्थ को. ऑप क्रेडिट सोसायटीची २४ वी व शिवशाहू विविध्योद्देश प्राथमिक ग्रामीण कृषी संघाची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सी. टी. सुतार यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.**



शिवसमर्थ व शिवशाहू संस्थेच्या सभेत दीपप्रज्वलन करताना अरविंद खराडे व इतर.

प्रारंभी भिकाजी बावडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दीपप्रज्वलन अरविंद खराडे व संचालकांच्या हस्ते करण्यात आले.मान्यवरांचा सत्कार संघाचे चेअरमन भाऊसाहेब चिंदके, विजयकुमार बुडके व संचालकांच्या हस्ते करण्यात आला. शिवसमर्थ को ऑप सोसायटीचा अहवाल वाचन करताना सेक्रेटरी विलास मुंगळे म्हणाले की,अहवाल सालात सभासद ५७७ असून शेअर भांडवल ३१ लाख ९७ हजार ६०० रू.,निधी २ कोटी ९ लाख ३१ हजार ५०५ रू.,ठेवी १२ कोटी २३ लाख ८८ हजार ४०९ रू., कर्जे ६ कोटी ९३ लाख ४१ हजार २६१ रू.इतकी असून संस्थेस २८ लाख २९ हजार ३९१ रू.नफा झाल्याचे सांगून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याचे सांगितले.शिवशाहू विविध्योद्देश कृषी संघाचे अहवाल वाचन करताना मुख्य कार्यनिर्वाहक रामू वडेयर म्हणाले की,संघाचे २५९ सभासद असून शेअर भांडवल २१ लाख ४८ हजार ६०० रू.,निधी २५ लाख २० हजार १६३ रू.,ठेवी ६ लाख ७६ हजार ३७० रू., कर्जे १ कोटी ४७ लाख ४२ हजार रुपये इतकी असून संघास ३ लाख ३७ हजार ३३६ रू.नफा झाल्याचे सांगितले.

यावेळी शंकर पोवार, अंकुश चौगुले, लक्ष्मण पसारे,सूचित बुडके,सुकुमार खोत,भिकाजी बावडे, धनपाल चव्हाण, रंगराव बन्ने, शाहू दुगाणे,सरिता कदम, पूजा बूडके,सदाशिव खोत,रावसाहेब भागाजे, पोपट गावडे, पुंडलिक खोत, रामचंद्र बुडके, तेजस ढेंगे,आण्णाप्पा मुरकुंडे,राहुल कलावंत,सदाशिव वडर, कल्लाप्पा खोत,अंजना जाधव, रोहिणी खोत, यांच्यासह सभासद, ठेवीदार, उपस्थित होते. सूत्रसंचालन कुमार हेगडे यांनी तर आभार सूचित बुडके यांनी मानले.



## कुर्ली-भाटनांगनूरला जादा बसेस सोडण्यासाठी निपाणी आगाराला निवेदन

कोगनोळी,ता.१७(प्रतिनिधी)-

**कुर्ली, आप्पाचीवाडी व भाटनांगनूर या भागातील विद्यार्थी निपाणीला उच्च शिक्षण घेण्यासाठी जात असतात. परंतु केवळ दोनच बसेस असल्याने आणि विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड असल्याने गैरसोय निर्माण झाली आहे. त्यासाठी कॉलेजच्या सकाळच्या वेळेत निपाणी-भाटनांगनूर व्हाया कुर्ली जादा बस सोडण्याची मागणी निपाणी आगार प्रमुखांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.**

याकरिता अण्णासाहेब जोल्ले व आम. शशिकला जोल्ले यांनी चिकोडीचे डीसी व निपाणीच्या आगार व्यवस्थापकांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून कुर्ली व भाटनांगनूरसाठी जादा बस सोडण्याची मागणी केली आहे. जादा बस चालू केल्यास ही गैरसोय दूर होणार आहे. निपाणीच्या आगार प्रमुखांनी सदरचे निवेदन स्वीकारुन सर्व्हे करुन जादा बस सोडण्यासाठी कार्यवाही करणार असल्याचे सांगितले.

## हुक्केरी तालुक्यात गोकाक नेत्यांची दहशत

### आम.निखिल कत्ती

संकेश्वर,ता.१७(प्रतिनिधी)-

**हुक्केरी तालुक्यात जिल्हा बँक आणि विद्युत संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोकाकच्या नेत्यांची गुंडगिरी चालू झाल्याचे आमदार निखिल कत्ती यांनी सांगितले.ते साई भवन येथे आयोजित सभेला उद्देशून बोलत होते.स्वागत राजू हुक्केरी यांनी केले. प्रास्ताविक नगरसेवक सुनील पर्वतराव यांनी केले.**



साई भवन येथे आयोजित सभेत बोलताना आम. निखिल कत्ती व व्यासपीठावर प्रमुख मान्यवर.

आमदार कत्ती पुढे म्हणाले, जिल्हा पालकमंत्रींचा पीए विद्युत संघ एमडीच्या खुर्चीवर विराजमान झालेला दिसत आहे.बेळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि हुक्केरी ग्रामीण विद्युत सहकारी संघ निवडणुकीत गोकाकचे नेते तालुक्याचे वातावरण बिघडविणेचे कार्य करीत आहेत.गेल्या ३० वर्षांत जे कत्तींना जमले नाही ते ३० दिवसांत करुन दाखविल्याची फुशारकी मारणाऱ्या त्या संचालकांने खोटेनाटे सांगणे बंद करावे.विद्युत संघात गेल्या ४ वर्षांपासून आम्ही सरकारकडे निरंतर ज्योती योजनेचा सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. सरकारने सदर योजनेसाठी ४८ कोटी रुपये मंजूर करणेबरोबर त्याला अद्याप परवानगी दिलेली नाही. लोकाकडून पैसे वसूल करुन निरंतर ज्योती योजनेचा डांगोरा पिटण्यात अर्थ नसल्याचे सांगितले.

विनयगौडा पाटील म्हणाले, कत्तींच्या पाठबळावर संचालकपद मिळवून आज कत्तीं विरोधात बोलणारा तो संचालक इतके वर्षे झोपला होता काय ?त्यांने २५ वर्षे कोणते दिवे लावले ते प्रथम सांगावे. गजानन क्वळी, नगरसेवक सुनील पर्वतराव, रोहण नेसरी, संदीप दवडते यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

सभेला उपनगराध्यक्ष सचिन भोपळे, सभापती प्रमोद होसमनी, नगरसेवक चिदानंद कर्देण्णावर,नंदू मुडशी, कुमार बस्तवाडी, माजी नगरसेवक दिपक भिसे, पिंटू परीट, मुबारक कमते,सुभाष कासारकर, प्रदीप माणगांवी, दिनेश कोळेकर, डॉ.ओंकार गरडी,चेतन बशेट्टी, सागर जकाते, मुस्तफा मकानदार, नेताजी आगम, बंडू सुर्यवंशी, कुमार कब्बूरी, नागेश क्वळी, रियाज फणीबंद, अल्ताफ शाहेण्णावर, निडसोसी अंकले यांच्यासह भागातील नागरिक उपस्थित होते.सूत्रसंचालन ॲड. जी. आर.पाटील यांनी केले.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देऊ तसेच नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देऊ. संपर्क-८२६१०८९५९०

**विकणे आहे.** कडबा कुट्टी मशिन व म्हैशीचे धार काढणे मशीन मॅटिंग-२. संपर्क-९३२६००८२९५

**न्यू फासे बंगला विकणे आहे.** दोन गुंठे जागा एनए प्लॉट संजय फौंड्रीसमोर, ९५५२४२३२६२

**एअरजेटलूम शर्टींगचे** ग्रे कापड व फिनीश प्रिटींग फ्रेश आणि सेकंड कटपीस विकत घेणारा दलाल व पार्टी पाहिजे. पैसे मोजण्याची मशीन किंमतीवर ८०% डिस्काऊंटवर देणे आहे. संपर्क-'राजमहल' आवाडेनगर. ९३२६०३९०८७

**विकणे आहे.** निडल लुम ९- दिड इंची ४ मशिन, १''इंची-५ मशिन, वार्पिंग मशिन-१, रोलिंग मशिन-२ चालू स्थितीत. संपर्क क्र.-९९२११३२१५

**संगमनगर येथे** २० फूट व १५ फूट रोड असलेला ३ गुंठे प्लॉट विकणे आहे. संपर्क-७७५६८४४६६६, ९६०४११७७५२

**आरसीसी २ मजली घर** विकणे आहे. कबनूर. फोन-८४२१२९७८१२, ९५२९८९१२७४

**चांगल्या हॉस्पिटल कॅम्पसमधील** औषध दुकान फर्निचरसह विकत देणे आहे. संपर्क-९९२१६९७६९१, ८४८५८८७९४९

**लूम विकणे आहेत.** डोडीया पॅटर्न (क्रॉस गियर, ऑईल सिस्टीम) ६८ इंची आणि ५६ इंची, डायनॅमिक कंपनीचे, इचलकरंजी येथील चालू कंडीशनमधील पॉवरलूम्स. संपर्क-९४२२०४३६७१

**विकणे आहे.** हॉटेल रिलॅक्स गार्डन परमिट रूम, बिअरबार लायसन्ससहीत विकणे आहे. (संपूर्ण हॉटेल किंवा पार्टनरशिपमध्ये) संपर्क-९३२५६०९७०९ (भारत डांगे) कोरोची-तिळवणी रोड.

**कपडे वाळवण्यासाठी** स्टेनलेस स्टिल पाईपचे हँगींग स्टॅन्ड आपल्या जागेच्या मापानुसार बसवून मिळेल. स्पेससेव्हिंग ड्रायर-९६२३३३५१३१, ९३७०३२८४२४

**४ बीएचके फ्लॅट** विथ फर्निचर विकणे आहे. पत्ता- संभव रेसिडेन्सी, सांगली नाका, यड्राव टिव्हीएस शोरूमच्या मागे. मो. ८८३०००८३१३.

**जुने व नवीन** पॉवरलूम घेऊ व देऊ तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देवू. संपर्क-८३१७२९१००८

**सेल ५०० रू.** ५ शर्ट व ५००-३ शर्ट अजून बरेच काही. पत्ता-सारडा गारमेंट खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेट, पेट्रोल पंपाजवळ-शहापूर, इचलकरंजी. संपर्क-९०२१०२७४९९

### आरोग्य विषयक

**मानसिक आजार-** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

### * नोकरी विषयक *

**शॉपवर कामासाठी** गरजू मुले व मुली पाहिजेत. वेळ-सकाळी १० ते ८, पत्ता-जनता चौक, इचलकरंजी. सन्मित्र शॉपी. ९०९६९६००६०

**फिनीश कापड** गोडाऊनच्या कामासाठी अर्जंट मुले/लेडीज पाहिजेत. लक्ष्मीनगर, शहापूर, तारदाळ रोड. संपर्क-९९३०७६९०९९

**कामगार पाहिजे.** कापड पेढीवर दिवाणजी कामासाठी कामगार पाहिजे. पगार-८ ते १२ हजार. संपर्क-९४२२४२५९२६. १/२०, मदनलाल बोहरा मार्केट, इचलकरंजी.

**ऑफिस कामासाठी** मुलगा पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. होगाडे ड्रायव्हिंग स्कूल. संभाजी चौक, इचलकरंजी. ९८९०८३४६२७

**रेडिमेड स्पेअरसाठी** टेलर कॅशियर, सेल्समन, हेल्पर अर्जंट पाहिजेत. आकर्षक पगार. PF+ESIC + कमिशन. संपर्क-९८६०८०८६८६, ८४८४८९०१३६

**सेल्समन नेमणे-** लेडीज कपडे शोरूमकरीता जेंटस सेल्समन नेमणे आहे. आकर्षक पगार. मैत्रिण. मो. ८००७४७९९०२

**गाळ्यासाहेब पॅसेज,** पोर्च, पायरी, साफसफाईसाठी पुरूष व स्त्री कामगार पाहिजे. काजवे हॉस्पिटलजवळ, संपर्क-८७९६५०९६३१, ८८५७९४०५९५

**टू व्हिलर शोरूमकरीता** टू व्हिलर मेकॅनिकल शिकाऊ मेकॅनिक साफसफाईकरीता कामगार पाहिजेत. अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**अमृततुल्य चहा** दुकानमध्ये कामगार पाहिजे. वेळ-सकाळी ७ ते १, दुपारी ४ ते ८.३०. पंचगंगा साखर कारखानाजवळ, इचलकरंजी. संपर्क-७५५८५७११७१

**एका नामांकित शैक्षणिक** संस्थेत BA/B.Sc/MA/MSc. प्राप्त पदवीधारकांना वर्क फ्रॉम होम व पूर्णवेळ काम करण्याची सुवर्णसंधी. संपर्क क्र. ९१७५०२५३१६

**एका नामांकित** शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखाली असलेल्या हॉस्टेलवर पुरूष/महिला रेक्टर नेमणे आहेत. अनुभवी उमेदवारांनी खालील क्रमांकावर त्वरीत संपर्क साधावा. संपर्क क्रं. ८७९६२५२००६

**इचलकरंजी-यड्राव** फाटा येथे नामांकित शोरूममध्ये टू व्हिलर वॉशिंगकरिता मुले पाहिजेत. आकर्षक पगार-१००००. संपर्क-९०९६३७२०८३

**बझारमध्ये लेडीज** कामगार पाहिजे. फूलटाईम/पार्टटाईम संपर्क-९०११५४९८०८, राजेश्वर सुपर बझार, डेक्कण चौक.

**रिशेप्सनिस्ट पाहिजे.** डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कामासाठी रिशेप्सनिस्ट पाहिजे. संपर्क -९०७५६५७४६१, ९९२१२६७१७६

**ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये** कामासाठी लेडीज/जेंटस पाहिजेत. कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक. संपर्क-सम्मेक ट्रान्सपोर्ट, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-८८८८७०३१०१

**ऑफिस कामासाठी** पाहिजेत. स्त्री/पुरूष, १२ वी पास, स्थानिक, संगणकीय ज्ञान. भेटा-आनंदी एजन्सीज, मंगलमुर्ती टॉकीजसमोर, इचलकरंजी.

**इचलकरंजी येथे** परमिटरूम बिअरबारसाठी अनुभवी/शिकाऊ वेटर पाहिजेत. संपर्क-८८३०९८३४०१

**ग्राफिक डिझायनिंगसाठी** कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. फ्रेशर/अनुभवी. पत्ता-लक्ष्मीदत्त मंडप इंडस्ट्रिज प्रा.लि. इंडस्ट्रियल इस्टेट, आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. फोन-७३०११३६४६४

**कामगार पाहिजेत.** ऑफिसबॉय आणि डिजीटल प्रिटींग मशिन ऑपरेटर. संपर्क-डी.एस. आर्टस, ९८९०५७८६८२, ९२७२३२६५३१. इंटरव्यु वेळ-सकाळी १० ते १२.

**कामगार पाहिजे.** ताबडतोब अनुभवी-११ हजार, शिकावू-९ हजार. समक्ष भेटा- पंचगंगा सर्व्हिसिंग सेंटर, स्टेशन रोड, माणिक स्टिलसमोर.

**पाहिजेत.** इचलकरंजीतील नामवंत अकॅडमीमध्ये, क्लार्क-०१, शिपाई-०२, फ्लोवर इनचार्ज-०१. संपर्क-९०७५६५०९९६

**कामगार पाहिजे.** सर्व्हिससाठी कामगार पाहिजे. वेळ-सायं. ६ ते १०.३०, पगार-७५०० रू. संपर्क-डिलक्स चिकन ६५, महासत्ता चौक, इचलकरंजी. ९५०३३००६०२

**मॅनेजर पाहिजेत.** विजय सहकारी पतसंस्था लि. इचलकरंजीमध्ये मॅनेजर नेमणे आहे. पदवीधारक, संगणकीय ज्ञान आवश्यक. सहकार व बॅकींगचा अनुभव जी डी सी ए असल्यास प्राधान्य. इच्छुकांनी संपूर्ण माहिती व पगाराच्या अपेक्षेसह खालील पत्त्यावर स्व हस्ताक्षरात अर्ज करावेत. फक्त अनुभवी उमेदवारांनीच अर्ज करावेत. ५/२५३, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. फोन-(०२३०) २४२११३५, ८५३०२०१९७२

**Required-** Finance Executive * Education: B.Com/MBA. Experience: 5 to 7 years. *Loc.- Parvati Industrial Estate. Job Description: Preparation of Cost. Audit Data (Production, Consumption, Purchase & Sales) Order-wise Cost Analysis. Inventory Analysis. Recovery Anylysis Quartely Internal Audit. Cont. hrdstmpl@gmail.com +917720018406

**पार्वती इस्टेट** जवळील टेक्स्टाईल मिलमध्ये ४ ते ५ वर्षे अनुभवी. बॅक सायजर-०४ जागा व हेल्पर-०४ जागा. इएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क-7720018406

**Required-** Jr. Accounts Exe. *Data Entry and Record Keeping. * Banking-Payments/Receipts. * Knowledge of Tally Prime and MS Office. *B.Com/M.Com. Loc-Parvati Industrial Estate. Cont. 7720018406

**बस ड्रायव्हर पाहिजे.** एरिया-इचलकरंजी. संपर्क-९१५८८८७१७८

**लेडीज पाहिजेत.** हॉस्पिटल कामासाठी शिकाऊ/अनुभवी मुली व मावशी पाहिजे. आकर्षक पगार. पत्ता-तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९३७०८७९०५०

**तारदाळ हातकणंगलेमध्ये** एका नामांकित कंपनीमध्ये हाऊसकिपींग हेल्पर भरती चालू आहे.-कायम जनरल शिफ्ट, आकर्षक पगार. PF+ESIC कॅंटींग फॅसिलीटी. संपर्क-८८८८६६१२७०

**MIDC यड्राव** मधील नामवंत कंपनीसाठी कामगार पाहिजेत. *ITI/Diploma-Fresher. * १० वी/१२ वी अनुभवी. CNC, VMC ऑपरेटर. किमान-४० जागा त्वरीत भरणे आहे. वेतन-१५०००/-. संपर्क-९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८

**पार्टटाईम नाष्टा सेंटरमध्ये** जेंटस कामगार पाहिजे. कामाची वेळ-सकाळी ७.३० ते २, पगार-६५००/- संपर्क-९८८१९८२२९५

**गॅस एजन्सी** ऑफिसमध्ये ऑफिस स्टाफ पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. शहापूर-९५४५२२०१८९

**पाहिजेत.** नामांकित अॅडव्हर्टायझिंग कंपनीमध्ये अकाऊंटींगसाठी अनुभवी लेडीज पाहिजे. मंगलधामसमोर, गणपती मंदिरशेजारी, इचलकरंजी. मो. ८६५७१८१८१९, ७७०९६९६२५५

**प्रोसेसमध्ये** आयटीआय झालेले वायरमन पाहिजेत. संपर्क-८६६८३४०७९४

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- बालाजी बेकरी, एएससी कॉलेजजवळ, संपर्क-९९६००२८२८९

**Required** 1 Person for Accountant Position in Textiles Company. Must Have Knowledge of TDS, GST and Accounting. Contact-9421614391

**किराणा मालाच्या दुकानात** जेंटस कामगार पाहिजे. संपर्क-संदिप किराणा, विक्रमनगर, इचलकरंजी. ९७६३३११५५५, ७०२०१७९२३२

**ऑफिस कामासाठी** मुली पाहिजेत. अकाऊंटींगचे ज्ञान आवश्यक. संपर्क-सहारा एन्टरप्राईजेस. मो. ९५९५२५७०७०, ९५९५०५७०७०

**Workers Required-** For Machine Shop. CNC-VMC Operator-1, Job Inspector-3. Helper (Gents)-1. Production Supervisor-1. Casting Inspector-1. For Foundry. Coreshooter Operator-1. फौंड्रीमध्ये (Pouring) वरकामासाठी जेंटस पाहिजेत. (कायम नाईट शिफ्ट) १२ तास (आकर्षक पगार मिळेल.) Contact-9158434345. Shri Padmavati Auto Components, Korochi.

**डॉ. बडबडे** हॉस्पिटलमध्ये साफसफाईसाठी त्वरीत मावशी व रिशेप्सनिस्ट पाहिजेत. संपर्क-८२६२९२७६१२

**कॉम्प्युटर सेल्स सर्व्हिस** ऑफिसमध्ये मुली पाहिजेत. ग्रॅज्युएशन, कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क-९७६७४९६९२२, इचलकरंजी.

**लेडीज पार्लरमध्ये** बेसिक-अॅडव्हॉन्स शिकलेली मुलगी, लेडीज हवी आहे. सानिया स्पा आणि सलून. संपर्क-९८३४८४५४७८

**Req. Candidate** with basic knowledge of App script, Java script & advance excel etc. Meet between 3 pm to 6 pm at. Sea Som Carbon, C-10/3, BJP Market, Ichalkaranji.

**आपला जॉब व व्यवसाय** सांभाळून आमच्या शैक्षणिक संस्थेत काम करा (आपल्या वेळेत) पगार-१२००० ते २४०००/- संपर्क-९९२२३१४३०९

**सायझिंग व प्रोसेस** युनिटकरीता सेकंड क्लास बॉयलर अटेंडंट, फिटर, वायरमन पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-९०४९६२७१४८

**सर्वांसाठी संधी!** वेटर, हेल्पर ९ ते १५ हजार पगार, राहणे + जेवणाची + अॅडव्हान्सची सोय. हॉटेल धनश्री-९७६३१३०४२१, ८१४९५३६४६५

**हॉटेल तलब येथे** नाष्टा बनवणेसाठी कुक (आचारी) पाहिजे. संपर्क-८९५६१०११४४

**इचलकरंजीमधील** नामांकित लॅबसाठी लॅब टेक्निशियन आणि मेडिकलसाठी फार्मासिस्ट हवे आहेत. अनुभवींना प्राधान्य. संपर्क-९५९५०७६११७, ९११९११९१८७

**फ्लिपकार्ट मध्ये** इचलकरंजी व जवळपास भागात डिलीव्हरीसाठी मुले, मुली पाहिजेत. संपर्क-९९६०४९११५८७, ९९७०८१८४३०

**मंगळवार पेठ येथे** घरकामासाठी मावशी किंवा ताई हव्या आहेत. संपर्क-८४४६९५८३८१, ८८३०१५४९६३

**इचलकरंजी एसटी** स्टॅन्डमध्ये टू व्हिलर पार्किंग स्टॅन्डसाठी कामगार पाहिजे. संपर्क-८२३७७४४४४४.

**अर्जंट पाहिजे.** ग्रॅन्ड फोर्च्युन मॉलमध्ये हाऊसकिपींग कामासाठी मुलगा-१, पगार-१५०००/-, सिक्युरिटी ऑफिसर-१ व अनुभवी ड्रायव्हर-१ हवा आहे. संपर्क-८४८३८८७४२९

**पाहिजे.** लायन्स ब्लड बँक दाते मळा इचलकरंजी येथे कॉम्प्युटर ऑपरेटर कम क्लार्क नेमणे आहे. इंग्रजी व मराठी टायपिंग कामाचा अनुभव आवश्यक. इच्छुकांनी स्वहस्ताक्षरात अर्ज करावा.

**कामगार पाहिजेत.** दिवाळीपर्यंत दुकानात काम करणेसाठी तरूण कामगार (पार्ट टाईम/फुल टाईम) पाहिजेत. संपर्क-९४२०५८५८०५, ९१३०१३८३१७

**सेल्स एक्झीक्युटिव्ह** पाहिजेत- टु व्हिलर शोरूम सेल्स एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. (जेंटस्) शिकाऊ किंवा अनुभवी अर्जासहीत. समक्ष भेटा-बोरगावे टिव्हीएस शाहु पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे-** हुशार, प्रामाणिक संपर्क- मे. बाळासाहेब पु. वडगावे, सुतार मळा चौक, सोनपावली. मारूती मंदिरजवळ, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत-** कॅप्टन व अनुभवी वेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क- हॉटेल मुनस्टार. संपर्क-९८२३५८७१२२, ८८३०१६०५५०.

**नामांकीत शैक्षणिक** संस्थेमध्ये हातकणंगले येथे त्वरीत सिक्युरिटी गार्ड नेमणे आहेत. आकर्षक पगार/जेवणाची व रहाणेची सोय. संपर्क-८००३०९३७७१.

**त्वरीत पाहिजेत.** हातकणंगले/इचलकरंजी/यड्राव १० वी/१२ वी/आयटीआय शिकाऊ मुले-१०० पाहिजेत. सुरूवातीपासून पीएफ+ईएसआयसी. संपर्क-८८३०२६७३३०

**नामवंत कंपनीमध्ये** कामगार पाहिजेत. १) सेल्स-५ महिला. २) अकौटींग-४ (टॅली येणे आवश्यक). ३) ऑफिसकाम-३. ४) स्टोअर-३. ५) हेल्पर-४. संपर्क-९२७०३३७९५५, इचलकरंजी.

**पाहिजेत.** अकौंटंट व सुपरवायझर, ड्युटी १२ तास, पगार १५ ते १८ हजार. संपर्क-मातोश्री प्रोडक्शन, हुपरी. फोन-८००७०६२५७७

### * भाड्याने देणे *

**१ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. छोट्या सुशिक्षित फॅमिलीकरीता सर्व सोयीनियुक्त शहापूर नवीन पोलिस स्टेशनलगत मेन रोडटच. संपर्क-९३२६९१३७०१

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. जैन कुटूंबियांसाठी आदिनाथ सोसायटी, इचलकरंजी. मो. ९३२६००८२९५

**गाळा भाड्याने देणे-** PNG गाडगीळच्या बाजूस फोनवाला शॉपसमोर 1 St फ्लोअर, 2 nd फ्लोअर ऑफिस, पार्लरसाठी उपयुक्त. ९५५२८१४१९८

**१२०० स्क्वे. फूट** आरसीसी गाळा २१X१६ भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, होलसेल मेडिकल, अकॅडमी, क्लासेस, ऑफिससाठी उपयुक्त. पत्ता- कोल्हापूर रोड, भोने माळ. ९८५०३७४०७६

**भाड्याने देणे-** ३ खोल्यांचे घर सर्व सोयीनियुक्त भोने माळ, पहिली गल्ली, गणेश ऑईलमिल जवळ, इचलकरंजी. फोन-८८८८८०२५८८

**गाळे भाड्याने देणे.** रोडटच १५X२०, १०X२५ फूट पोटमाळा संडास, बाथरूम. संपर्क-थोरात चौकच्या पुढे, शहापूर रस्ता, विक्रमनगर, चैतन्य दवाखाना. मो. ९४२००१०१५०, ७२१९४१४९४१

**१ बीएचके**/२ बीएचके सर्व सोयीनियुक्त ग्राऊंड फ्लोअर बोअरसह भाड्याने देणे. गुरू कन्नननगर, इचलकरंजी. फोन-९४२०७७६२६८

**भाड्याने देणे-** १०X३० दुकानगाळा स्वामी मळा येथे व कोरोची येथे १५००० स्क्वे. फूट जागा ११००० स्क्वे. फूट बांधकामासहीत विकणे आहे. संपर्क-९४२२५११४५९

**भाड्याने देणे-** छोट्या शाकाहारी कुटूंबासाठी १ बीएचके देणे आहे. संपर्क-अरिहंत निवास, तिरंगा कॉलनी, गल्ली नं.१, कबनूर. फोन-८३२९१२४५७६, ९००४४९२७१५

**एएससी कॉलेजसमोर** इं. इस्टेटमध्ये १२X१३ चे आरसीसी ऑफिस भाड्याने देणे आहे. पुनम झेरॉक्सजवळ, दत्त वडासमोर. ९७६६६३३२९२

**गहाणवट/भाड्याने देणे.** शहापूरमध्ये पहिल्या मजल्यावर सर्व सोईनियुक्त स्वतंत्र वन बीएचके, बोरींग छोट्या फॅमिलीकरीता मो. ८३९०९२८०११

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे. पत्ता- स्वामी अपार्टमेंटजवळ, इंदिरा कॉलनी, इचलकरंजी. फोन-९८८१२२२२४३, ७०५८७२५७०१

**२ बीएचके** भाड्याने देणे आहे. विकासनगर, इचलकरंजी. मो. ९८६०८८८७०६

**भाडे तत्वावर**/विकत देणे. इचलकरंजीमध्ये मोक्याच्या ठिकाणी १,२,३,४ मजले १५०० स्क्वे. फूट हॉल, बँका, पतसंस्था, एजन्सी ऑटोमोबाईल, सोनार शोरूम, मेडिकल परपजसाठी उपलब्ध. संपर्क-८४५४०४०००७, ९९२३५०४१९९, पीएनजीजवळ.

**गोडाऊन भाड्याने देणे.** २००० स्क्वे. फूट आरसीसी सर्व सोयीनियुक्त मोकळ्या जागेसह २० फूटी रोडटच रूई येथे संपर्क-विवेक कमलाकर-९८८१२९१४९८३, ८४८५८०४८९६

**१ बीएचके रूम** भाड्याने देणे-स्वामी मळा, साई मंदिरच्या पाठीमागे, इचलकरंजी. फोन-९८६०५०८५५७

**विद्यार्थ्यांसाठी कॉट** बेसीसवर रुम भाड्याने मिळतील. अभय दूध डेअरी पाठीमागे, सांगली नाका, इचलकरंजी. मो. ९८२३०८१६८१, ७८४१८२२१७२.

**हॉटेल चालू** कंडिशनमध्ये भाड्याने देणे आहे. ३००० स्क्वे. फूट सुसज्ज १००-१२० लोकांचे बैठक व्यवस्था आहे. पत्ता - लिंबू चौक, वसंत कॉलनी समोर, इचलकरंजी. मो. ९८२३७९६०००, ९४२२४१२३४४.

**एअरजेट लुमसाठी** शेड भाड्याने पाहिजे. इचलकरंजी व शहर परिसरातील. संपर्क-९०११०९९०२६

**एअरजेट लूमसाठी** शेड भाड्याने पाहिजे. खंजिरे इंडस्ट्रिज, प्राईड इंडिया परिसरात. संपर्क-८१०७२७२३२९, ९१६८४९६८८८

**फक्त मुलींकरीता** कॉट बेसिसवर रूम्स भाड्याने मिळतील. फोर्च्युन सिटी कॉलनी, शरद इंजि. कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९७४०९६१८०२

### बांधकाम विषयक

**१४०० रू. -** प्रति स्क्वे. फूटप्रमाणे उत्तम दर्जाचे मटेरियल वापरून बांधकाम करून देवू. संपर्क-८६९८३८९८२२

**सेंट्रींग मिस्त्री पाहिजे.** स्वत:चे मटेरियल असणारा संस्थेच्या इमारतीमधील स्लॅबचे काम करण्यासाठी. संपर्क-९३४२५२७१६९

### वधुवर विषयक

**वधू पाहिजे-** मुलाचे वय ३२, मराठा, शरीरावर पांढरे डाग, मुंबई मंत्रालय येथे सरकारी नोकरी, अपेक्षा-अनुरूप व सुशिक्षित. मो. ९८५०९०२९४१. एजंट क्षमस्व.

### इतर

**पेस्ट कंट्रोल** ढेकूण, झुरळ, पाली, मुंग्या, वाळवीपासून १००% नायनाट झुरळासाठी हर्बल पेस्ट वास नाही. पर रूम ४५०/- संपर्क-९७६२८१५७५७

**जन्म दाखला-** मृत्यू दाखला, असेसमेंट, घरफाळा, नाव लावणे, पाणी कनेक्शन, विवाह नोंदणी, बांधकाम परवाना, गुंठेवारी, आधारकार्ड, पॅनकार्ड इतर शासकीय कामे करून मिळतील. पत्ता- श्रावण झेरॉक्स, नवीन महानगरपालिके समोर, इचलकरंजी. मो. ९०२१३३९८१०, ९७६६०९३५०६

### बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळतील. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**वाचकांसाठी निवेदन**

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**



## मिरज लोक न्यायालयात सव्वादोन हजार प्रकरणे निकाली

### सुमारे सव्वा कोटी रक्कम वसूल

**मिरज, ता. १७ (प्रतिनिधी)**

**मिरज न्यायालयात झालेल्या राष्ट्रीय लोकअदालती मध्ये २२१ प्रलंबित दिवाणी व फौजदारी तडजोड पात्र प्रकरणे तसेच २ हजार ४२ दावापूर्व प्रकरणे निकाली करण्यात आली.**

यामधून एकूण एक कोटी १७ लाख ३९ हजार ८८३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सांगलीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सेवा समिती मिरजचे अध्यक्ष ए. एस. राणे यांनी लोकअदालतीचे नियोजन केले. या लोक अदालतीमध्ये विधिज्ञ व पक्षकारांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या लोक अदलतीमध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याखाली दाखल केलेल्या प्रलंबित फौजदारी प्रकरणामधील दीड वर्षांपासून विभक्त राहत असलेल्या पती-पत्नीमध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणून एक दुभंगलेला संसारही पुन्हा जुळला गेला. या लोकअदालतीमध्ये न्यायाधीश पी. यू. कुलकर्णी यांनी पॅनेल प्रमुख म्हणून तर पॅनेल सदस्य म्हणून अॅड. तौफिक पीरखान यांनी काम पाहिले.




श्री शिवाजीराजे पतसंस्थेच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन अजयदादा थोरात

## शिवाजीराजे पतसंस्था १३ टक्के लांभाश देणार

**पेठवडगाव,ता.१७ (वार्ताहर)**

**सभासदांनी संस्थेच्या कारभारावर दाखविलेला विश्वास व सहकार्यामुळे शिवाजीराजे पतसंस्थेला २० लाखाचा नफा झाला. तब्बल १३ टक्के डिव्हीडंड देणार अशी घोषणा संस्था चेअरमन तथा माजी उपनगराध्यक्ष अजय थोरात यांनी केली.**

थोरात पुढे म्हणाले, गतवर्षी पेक्षा अहवाल सालात १ कोटी ९४ लाख ६० हजार इतक्या ठेवीत वाढ होऊन संस्थेच्या ठेवी २३ कोटी ०४ लाख ३४ हजार १९० तर कर्जे १२ कोटी ९९ लाख ४३ हजार ६५५ , गुंतवणूक १० कोटी ६४ लाख १४ हजार ६३६ इतक्या असलेचे सांगितले. डॉ. अभय यादव यांचे भाषण झाले. नोटीस व विषय वाचन मुख्य व्यवस्थापक संतोष नांगरे यांनी केले. कु. सुमती लड्डे, अर्चित मकोटे, सना शिकलगार, प्रमोद पाटील, श्रेयश देवकर, राजस्व हिरवे, कु. श्वेता पोळ, अँड उपासना भोपळे यांचा सत्कार झाला. सभेस व्हा. चेअरमन संजय कदम, संचालक बाळासोा पाटील, सुरेंद्र जंगम, सतीश ताटे, देवेंद्र राणे, अॅड. रमेश पाटील, अभिताभ सणगर, पुष्पराज भोपळे यांचेसह शरद गुरव, मोहन पाटील, हेमंत पाटील, डॉ. रवींद्र जंगम, शरद पाटील, शरद जाधव, सुनील माने, सचिन तुरंबेकर, बाजीराव धनगर व संस्था कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## स्वस्थ नारी, सशक्त परिवारांतर्गत व्याख्यान संपन्न

**गारगोटी ता. १७(प्रतिनिधी)**

**स्वस्थ नारी सशक्त नारी या अभियानांतर्गत गारगोटी उपजिल्हा रुग्णालयाच्या नोडल ऑफिसर डॉ. स्नेहल कुलकर्णी यांनी आज राधानगरी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय येथे ''निरोगी जीवनशैली व पोषण तसेच किशोरवयीन मुलींच्या समस्या'' या विषयावर व्याख्यान दिले.**

तसेच त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्याला समाधानकारक उत्तरे दिली. मासिक पाळीच्या वेळी घ्यावयाची काळजी व स्वच्छता याबद्दलही मुलींना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी राधानगरी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. एस. बी. गायकवाड व गारगोटी उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. पल्लवी तारळकर यांचे सहकार्य लाभले.

## विद्यार्थ्यांनी काळाच्या प्रवाहात बदल स्वीकारावा-डॉ. एकल

**वाई,ता.१७(वार्ताहर)**

**सध्याचे युग झपाट्याने बदलत असून, तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अनेक नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या बदलांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला सज्ज राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन इन्स्टा व्हिजन लॅबोरेटरीचे संचालक डॉ. अजित एकल यांनी व्यक्त केले.**

जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'अॅडव्हान्स्ड अॅनॅलाटिकल टेक्निक्स' या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. या प्रसंगी रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) ज्ञानदेव झांबरे, सौ. दीपाली पाटील, डॉ. संदीप वाटेगावकर व आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. एकल पुढे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष इंडस्ट्रीमध्ये जाऊन अनुभव घेणे अनिवार्य आहे. सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची मानसिकता, नव्या गोष्टी शिकण्याची तयारी आणि लवचिकता हेच यशाचे रहस्य आहे.''

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाचे सखोल ज्ञान घेतले पाहिजे आणि ते व्यावहारिक जीवनात वापरले पाहिजे. प्राप्त ज्ञानाला कौशल्याची जोड दिली तर विद्यार्थी रोजगारक्षम व उद्योजक बनू शकतो.

प्रा. (डॉ.) झांबरे यांनी




प्रास्ताविक केले. डॉ. वाटेगावकर यांनी ऑन जॉब ट्रेनिंग बद्दल माहिती दिली.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सौ.दीपाली पाटील आणि डॉ. संदीप वाटेगावकर, प्रियांका जाधव, ऋतुजा भोईटे, निकिता सुर्वे, अजित पांढरे, मयुरी सावंत तसेच अनिल सावंत, अनिल लाखे, अनिल बोडरे, चेतन तावरे, शुभम पिसाळ, शिवम सूर्यवंशी, नवनाथ ठोंबरे आणि सचिन इथापे यांनी परिश्रम घेतले.



## शिरोलीतील नागरिकांतर्फे खास. माने यांना विविध मागण्यांचे निवेदन

**हेरले,ता.१७(प्रतिनिधी)**

**पुलाची शिरोली येथील समता परिसरातील बौद्ध समाजाच्यावतीने खास. धैर्यशील माने यांना निवेदन देण्यात आले.**

या निवेदनाद्वारे गावातील समाजाच्या मालकीची मटण मार्केट शेजारी असलेली तळी एक एकर जागेत आहे. ती मुजविण्याची मागणी करण्यात आली. या जागेला हद्दी प्रमाणे साईट कंपाउंड बांधणेसाठी खासदार फंडातून निधी मिळावा.तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ पात्र लोकांची नियुक्ती पत्र २०० जणांना खासदारांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी सुजित समुद्रे, रणजित केळुस्कर, बाबासाहेब कांबळे, श्रीकांत कांबळे, दिनकर कांबळे, मधुकर कांबळे, अनिल सांगावकर, मोशे कुरणे, निवास कांबळे,सखाराम कांबळे,चिमण कांबळे, संतोष कांबळे, रणजित शिंदे, उत्तम कांबळे संध्याराणी कुरणे,आशा सांगावकर, मंगल बनगे,सरोजिनी कांबळे, गौतमी कांबळे , संगिता समुद्रे, शैलजा देशमुख ,पुनम संनदे, सारिका शिंदे, स्नेहा शिंदे आदी उपस्थित होते.

# जनगणना सर्वेक्षणात मराठा बांधवांनी 'मराठा कुणबी'नोंद करावी:आम.मुळे

**निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–**

**येत्या २२ सप्टेंबरपासून ते ७ ऑक्टोबरपर्यंत कर्नाटक राज्यामध्ये मागासवर्गीय आयोगातर्फे जातीनिहाय जनगणना होणार आहे .त्यामध्ये सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षण केले जात आहे. मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी या सर्वेक्षणामध्ये मराठा समाजाने सहभागी होऊन नमुना फॉर्ममध्ये धर्माच्या कॉलममध्ये 'हिंदू', जातीच्या कॉलममध्ये 'मराठा', पोटजातीच्या कॉलममध्ये 'कुणबी' तसेच मातृभाषेच्या कॉलममध्ये 'मराठी' अशी नोंद करावी, असे आवाहन विधान परिषद सदस्य तसेच मराठा समाजाचे नेते एम. जी. मुळे यांनी केले आहे.**



**निपाणी:मराठा मंडळ सांस्कृतीक भवनात आयोजीत कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आम.एम.जी. मुळे, बाजूस शामसुंदर गायकवाड,प्रविण सडोलकर व उपस्थीत समाज बांधव.(छाया:घाटगे फोटो).**

येथील मराठा मंडळ सांस्कृतीक भवनात निपाणी सकल मराठा समाजातर्फे २२ सप्टेंबर ते ७ ऑक्टोंबर दरम्यान होणाऱ्या जनगणेच्या पार्श्वभुमिवर आयोजीत बैठकीत मराठा समाजाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष प्रविण सडोलकर होते. पुढे बोलताना ते म्हणाले, या सर्वेक्षणामध्ये आमच्या मराठा समाज बांधवांनी सहभागी होऊन नोंदणी करावी जेणेकरून मराठा समाजाची राज्यात संख्या किती आहे हे स्पष्ट होईल. त्यामुळे सरकारला देखील भविष्यात मराठा समाजाला सोयी, सवलती देणे सोपे होईल.

क्षत्रिय मराठा परिषदेचें अध्यक्ष श्यामसुंदर गायकवाड बोलताना म्हणाले, कर्नाटकातील सर्वच जिल्ह्यात मराठा समाज विखुरलेला आहे. ४५ वर्षात मराठा समाजाने इतर समाजातील आमदार, खासदार केले पण मराठा समाजाला न्याय मिळाला नाही. त्यामुळे या जनगणनेत मराठा समाजाने एकत्रीत ताकद निर्माण केल्यास भविष्यात समाजाला मोठे यश मिळू शकते.आरक्षणामुळे समाजाची आर्थीक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती होवू शकेल असे सांगितले.

स्वागत विनोद साळुंखे यांनी केले.क्षत्रिय मराठा परिषदेच्या उपाध्यक्ष सुमित्रा उगळे यांनी प्रास्ताविक बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी रोहन साळवे, राजेश कदम, रवींद्र शिंदे, सुजय पाटील, सुप्रिया पाटील, गोपाळ नाईक, शंकरदादा पाटील, निरंजन पाटील, डॉ.विनय निर्मळे, नारायण पठाडे, प्रदीप जाधव, रमेश जाधव, जयराम मिरजकर, दादाराजे देसाई, विठ्ठल वाघमोडे, अरुण आवळेकर,किरण पाटोळे, सिताराम पाटील,वर्षा चव्हाण,अनिता पठाडे,राजश्री चव्हाण,मंगल घोरपडे यांच्यासह तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते. बंडा घोरपडे यांनी आभार मानले.

**हुतात्मा स्मारकासाठी ५ लाखाचा निधी**

दरम्यान आम. मुळे व शामसुंदर गायकवाड यांनी शहराबाहेरील आंदोलननगरातील हुतात्मा स्मारकाला भेट देऊन स्मारकासाठी आपल्या फंडातून पाच लाखाचा निधी जाहीर केला.

# स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ

**कोल्हापूर ता. १७ (प्रतिनिधी)–**

**कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्त देशामध्ये ''स्वस्थ नारी, सशक्त परिवार'' या अभियान राबविण्यात येत आहे. आयुष्यमान आरोग्य मंदिर राशीवडे येथे खासदार धनंजय महाडीक यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कार्यक्रमामध्ये कोल्हापुर मध्यवर्ती बँकेचे संचालक अर्जुन आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ८१ आरोग्य वर्धीनी केंद्र, नगरपालिका सर्व आरोग्य नागरी केंद्रे व ४१३ उपकेंद्र ठिकाणी २० प्रकारचे उपक्रम बुधवारपासुन सुरू करण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द पिंपळे यांनी दिली.**



यावेळी बोलतांना खास.धनंजय महाडिक म्हणाले की, पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकाराने स्वस्थ नारी, सशक्त परिवार'' अभियान कोल्हापूर जिल्हयात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येईल, या अभियाना अंतर्गत जिल्ह्यातील महिलांमध्ये आरोग्या विषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी २ ऑक्टोबर पर्यंत हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानामुळे महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याविषयी प्रोत्साहन मिळेल आणि गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होईल, यामुळे स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल. असेही डॉ. पिंपळे यांनी सांगितले.या अभियानामध्ये उपसंचालक डॉ. दिलीप माने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, डॉ. हर्षला वेदक, सरपंच संजीवनी अशोक पाटील, उपसरपंच अजिंक्य गोनुगडे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, खाजगी संस्थाचे विषेश तज्ञ डॉक्टर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# हालसिध्दनाथच्या जादा सारखरेचा तपास न्यायालयाच्या आदेशाने सुरू

## ॲड. दादासाहेब लंबे यांची माहिती

**निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–**

**श्री.हालसिद्धानाथ सहकारी साखर कारखान्याने २०२४–२०२५ मध्ये गाळप झालेल्या साखरेपैकी साखर ५ हजार पोत्यांचा गोलमाल केला.कमी रिकव्हरी दाखवून केंद्र सरकारच्या निर्देशनानुसार शेतकरी व ऊस पुरवठादार यांना ऊस दर कमी दिला. त्यामुळे शेतकऱ्यांची व कारखान्याची फसवणूक केली आहे. याप्रकरणी दत्तात्रय लाटकर व इतर तीन जणांनी कागदपत्रासह माहिती देऊन निपाणी फौजदारी न्यायालयामध्ये संचालक मंडळ व इतर अधिकारी यांचे विरुद्ध फौजदारी स्वरूपाचा खटला ता.१३ऑगष्ट रोजी दाखल केला असल्याची माहिती तक्रारदाराचे वकील दादासाहेब लंबे यांनी त्यांच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**



ते म्हणाले, सदर फौजदारी खटला दाखल केले नंतर प्रथम युक्तिवाद होऊन कोर्टाने खाजगी फिर्याद नं. ७०३/२०२५ दाखल करून घेतली. या खटल्याची सविस्तर युक्तिवाद दिनांक १४,१६, १८,व १९ ऑगष्ट रोजी कोर्टासमोर झाला.कोर्टाने तक्रारदार यांच्यावतीने मी केलेला युक्तिवादाप्रमाणे सर्व कागदपत्रे पडताळून आम्ही केलेली तक्रारीत व युक्तिवादात संकृत दर्शनी तथ्य आढळल्यामुळे कोर्टाने २०–०८–२०२५ रोजी सर्कल इंस्पेक्टर निपाणी यांना आम्ही केलेली तक्रार ही संबंधित पोलिस स्टेशनमध्ये तक्रारमधील गुन्हा रजिस्टर करावा असा आदेश दिला आहे. तसेच कारखान्याच्या गोडावून व कार्यालयामध्ये शोध घेऊन गुन्ह्याचा तपास करावा.

जीएसटी तपासात जादा मिळालेल्या साखरेचा ९८ लाख दंड रकमेच्याच्या संदर्भात कागदोपत्री तपास करून कारखान्याचे संचालक,अधिकारी यांच्यावरती खटले दाखल करून अहवाल सादर करावा असा न्यायालयाने आदेश दिला आहे. त्याप्रमाणे अहवाल सादर झाल्यावर पुढील प्रकिया सुरू होईल असेही ॲड. लंबे यांनी सांगितले. यावेळी दत्तात्रय लाटकर यांची उपस्थिती होती.

# शासकीय नोकरी करत असाल तर कार्यालयाचे ओळखपत्र दर्शनी भागात लावा

## अन्यथा शिस्तभंगाची कारवाई

**कोल्हापूर, ता.१७ (प्रतिनिधी)–**

**जे शासकीय अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयाचे ओळखपत्र वापरणार नाहीत. त्यांचेवर आता शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत बाहेर फिरून वेळ काढू पणा करत असतात. मात्र, शासनाने काढलेल्या परिपत्रकामुळे अशा, वेळ काढून कर्मचाऱ्यांना चाप बसण्याची शक्यता आहे.**

ज्या ठिकाणी नोकरी करत आहेत, त्या कार्यालयाचे ओळखपत्र संबधीत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. पण अनेक कर्मचारी आणि अधिकारी ओळखपत्र न लावता स्वतःची ओळख लपवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कामासाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची अडचण होते. ही अडचण ओळखून शासनाने १० सप्टेंबर २०२५ रोजी एक परिपत्रक काढून कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागात लावण्यात यावेत अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला.

दरम्यान शासन परिपत्रका नुसार, अधिकारी आणि कर्मचारी ओळखपत्र दर्शनी भागात लावतात की नाही. हे पाहिले असता, काही कार्यालयामध्ये कर्मचारी नियमितपणे आपले ओळखपत्र दर्शनी भागात लावत असल्याचे दिसून आले. तर काही ठिकाणी, कार्यालयीन प्रमुखच ओळखपत्र वापरत नसल्याचे दिसून आले. यामध्ये, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपक कदम यांनी देखील ओळख पत्र दर्शनी भागात लावले नसल्याचे दिसून आले. मात्र, जे अधिकारी कर्मचारी ओळखपत्र दर्शनी भागात लावणार नसतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश असल्याने आता त्यांचेवर त्यांचे वरिष्ठ काय कारवाई करणार. हे देखील पहावे लागणार आहे.


## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. २९८ पैकी समजुतीचे नकाशाप्रमाणे प्लॉट नं.३७ चे क्षेत्र १६७.२८ चौ.मी.ची मिळकत यासी चतु:सिमा– पुर्वेस– १५ फुट रस्ता, पश्चिमेस – गट नं. २९४, दक्षिणेस – प्लॉट नं.३८, उत्तरेस – प्लॉट नं.३६, सदरची मिळकत ही फरदीन पिरसाो मुजावर रा. शहापूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री. किरण शिवाजी शिंदे रा. तारदाळ यांना करून दिलेले असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात विश्वमित्र नागरी सहकारी पतसंस्था मर्या., इचलकरंजी यांचे कर्जाव्यतिरीक्त अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. १६/०९/२०२५.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. ९३ पैकी प्लॉट नं. ६ पैकी पश्चिमबाजूचे व ७ चे एकत्रित क्षेत्र हे . ० . १३ . ७६ आर खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – प्लॉट नं. ६पैकी मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. ८ ची मिळकत, दक्षिणेस– प्लॉट नं .२,३ व ४ची मिळकत, उत्तरेस – २० फुट रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही अंकुश मारुती कदम व गजानन अंकुश कदम रा. कोल्हापूर यांचे कब्जेमालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे . तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी . म्हणुन दिली नोटीस. सही

ता. १७/०९/२०२५

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**

पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी,
राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो .७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ५३५ पैकी क्षेत्र ५५०–०० चौरस मीटरची खुली जागा मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस – सनदी यांची मिळकत, पश्चिमेस – पटेल यांची मिळकत, दक्षिणेस – कांबळे यांची मिळकत, उत्तरेस – सरकारी रस्ता. सदरची मिळकत ही नुरमोहम्मद मोहम्मदहाद्दीस खान रा सांगली यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीची संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा, कोर्ट केस, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १७/०९/२०२५

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा,
टाकवडे वेस, राणाप्रताप चौक,
इचलकरंजी.
मो. ९८८१०१४७२५.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना कळणेकरीता,

इचलकरंजी शहर महानगरपालिका हद्दीतील शहापूर येथील गट नं. ४७० /अ, ७५१, ७५३ ते ७७३, ७८१ ते ७८५, ७८९ ते ८०४, क्षेत्र हे. ४०.८५ आर यामधील गट नं.७८५, ८०० व ८०४ मधील बिगरशेती प्लॉट नं.१५५ चा पूर्ण भाग क्षेत्र ४८४२.०० चौ. फूट, याचे चौ.मि. ४५० ची मिळकत, यासी चतु:सीमा – पूर्वेस– सरकारी रस्ता,पश्चिमेस– प्लॉट नं. १६८, दक्षिणेस– प्लॉट नं.१५६ व उत्तरेस–प्लॉट नं.१५४.

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत ही दि इचलकरंजी इंडस्ट्रियल को–ऑपरेटिव्ह इस्टेट लि., इचलकरंजी यांच्या मालकीची असून सदर मिळकत श्री. रामराज गोपिकिशन भांगडिया यांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने दिलेली आहे. सदर मिळकतीमधील लीजहक्क आमचे अशिलांना हस्तांतर करणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची हमी वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री, करार, दावा, कब्जा, कूळ, तारणगहाण, बक्षीस, वाटणी, वारसा, वहिवाट, पोटगी, आरक्षण, संपादन, अन्य कोणाचा कर्ज, देणी अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काच्या कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर द्यावी. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही तारीख १७/०९/२०२५ इ. रोजी.

**ॲड. सुनिल जे. विभुते**

१३/११२७/२, महर्षि वाल्मिकी सोसायटी, इचलकरंजी.
मो. ९८८१७०३८३८.

**वादी तर्फे वकील– ॲड. एम. एस. कुलकर्णी**

## जाहीर समन्स

**(मे. रोकडसो कोर्ट)**

**सह दिवाणी न्यायाधीशसो व. स्तर इचलकरंजी यांचे न्यायालयात**

**विशेष दिवाणी दावा ८४/२०२४**
निशाण नंबर २१/ड

**श्री. चंद्रकांत पुरुषोत्तमदास जालान**
रा. ६/११२, मदनलाल बोहरा मार्केट,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — **वादी**

**विरुध्द**

**श्रध्दा स्टेशनर्स तर्फे प्रोप्रा.**
रा. रॉयल गंगा माऊली कॉम्प्लेक्स, फलॅट नं. २०, टिळक रोड, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर — **प्रतिवादी**

प्रति,
प्रतिवादी यास,

ज्याअर्थी वादी सदर राहणार यांनी **प्र. वादी विरुध्द रक्कम वसुली करीता या** न्यायालयात दावा दाखल केला आहे, त्यासंबधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १७/१०/२०२५ रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्य रित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याव्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ किंवा प्रतिवादी कांउटर क्लेम ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या दाव्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही बचावाचा किंवा उलट वादाचा सेट ऑफ किंवा प्रतिवादीच्या काउंटर पुष्टयार्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल व अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी किंवा तत्पुर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल .म्हणून जाहिरनोटीस प्रसिध्द केली असे.

आज दिनांक १७/०९/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**हुकूमावरून**

**सही/–** **क. लिपीक** (शिक्का) **सही/–** **सहा. अधिक्षक,** **दिवाणी न्यायालय,व. स्तर इचलकरंजी.**

सूचना– १) तुमचे साक्षीदार स्वतः होउन उपस्थित राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असलेल तर वर न्यायालयाकडे अर्ज केल्यास व आवश्यक तो खर्च भरल्यास कोणत्याही साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयाकडुन समन्स मिळू शकेल.

२) वादीचे मागणी तुम्हांला मान्य असल्यास, हुकूमनाम्याची बजावणी टाळण्यासाठी तुम्ही वादाची रक्कम खर्चासह न्यायालयात भरावी. हुकूमनाम्याची बजावणी तुमच्यावर किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा दोन्हीवर होऊ शकेल. ३) दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम नुसार प्रतिवादीने समन्स लागू झाले पासून ३० दिवसांत लेखी कैफियत /म्हणणे दाखल करणे आवश्यक आहे.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन:– जि.कोल्हापुर, ता.हातकणंगले, पैकी मुळची शहापूर येथील व सध्या का। इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या मिळकतीचा क.ग.नं. ३८ क्षेत्र हे. ३–०३ आर आकार रु.२–८० पैसे यापैकी बिगरशेती प्लॉट नं. २८ क्षेत्र ९०.२४ चौ.मी. याचे ९७०.९८ चौ. फुटाची खुली जागा याचा सि.स.नं. १८६२५ असून यांसी चतु:सिमा पुर्वेस – २० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस – सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. २५ ची मिळकत, दक्षिणेस – सदर गट नंबर पैकी प्लॉट नं.२९ ची मिळकत, उत्तरेस– सदर गट नंबर पैकी प्लॉट नं. २७ ची श्री अनिल कोळी यांची मिळकत

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री नामदेव रामचंद्र कोरवी, रा. बोहरा मार्केट इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून सदर मिळकत करारपत्राने देवू केलेली आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज,आरक्षण,तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १७/०९/२०२५ इ.रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

रा.१७/२९४, पुजारी मळा,
राजमाता नगर, इचलकरंजी
मो.नं. ९३२६०२२३८५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६१५ पैकी प्लॉट नंबर ४ चे क्षेत्र १०३.५७ चौरस मिटर ची मिळकत यासि चतुः सिमा– पुर्वेस – २० फुट रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं. ९, दक्षिणेस – प्लॉट नं. ५, उत्तरेस– श्री.नितीन चौगुले यांची मिळकत. सदरची मिळकत श्री. अनुष्का भुपाल चौगुले व अनुकल्प भुपाल चौगुले तर्फे अ.पा.क म्हणुन आई सरीता भुपाल चौगुले. रा. तारदाळ यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री. मुस्ताक शरीफ बेपारी. रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिल यांचे कडुन संचकार रक्कम स्विकारून संचकारपत्र करुन दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट, बोजा, इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १६/०९/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन : इचलकरंजी येथील महानगरपालिका हद्दीतील गट नं. ८२१ पैकी बिगरशेती प्लॉट नं. १ ची खुली जागा याची मोजमापे दक्षिणोत्तर पुर्व बाजु १०२ फुट, पश्चिम बाजु १०१ फुट, पुर्व पश्चिम दक्षिण बाजु ५२ फुट, उत्तर बाजु ५२ फुट, याची ७/१२ उताऱ्या प्रमाणे क्षेत्र ५३०४ चौ.फुट. याचे ४९२.९६ चौ.मी. व प्रॉपर्टी कार्ड सिटी सर्व्हे नं. २२०७७ चे क्षेत्र ४८३ चौ.मी. ची खुली मिळकत यासि चतु:सिमा, पुर्वेस – प्लॉट नं. १५ ची मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. १३ ची सौ.अनुसया दिनेश पित्रोडा यांची मिळकत, दक्षिणेस – ३० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस गट नं. ८१८ ची मिळकत येणे प्रमाणे चतु:सिमेतील खुली मिळकत सर्व.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही अशोक सिदलिंग बेनाडी, रा. कबनूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत असुन त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायम खुश खरेदी देणेचे ठरवून संचकार दाखल भरीव रक्कम स्विकारून खरेदी पुर्व करारपत्र लिहून दिले आहे. आमचे अशिलांना सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असल्याचा देखील निर्वाळा त्यांनी दिला आहे. सबब सदर मिळकतीवर श्रीराम फायनान्स कंपनीच्या कर्जा व्यतिरिक्त कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, हितसंबंध वगैरे काही असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही, कसलीही तक्रार न आलेस तर सदर मिळकतीबाबत कोणाचीही तक्रार नाही असे गृहित धरून आमचे अशिल सदरची मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील याची आपण नोंद घ्यावी म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. १७/०९/२०२५.

**ॲड. मुजीबुरेहमान कुट्टी**

६/५४३, मंगळवार पेठ, इचलकरंजी ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर. मो. ९९२३०१२५००.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन–जि.कोल्हापुर, ता. हातकणंगले, पैकी मौ. खोतवाडी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतीचा क.ग.नं. ११८ क्षेत्र हे.१–१८ आर आकार रु. १–८० पैसे यापैकी गुंठेवारी बिगरशेती भुखंड नं. ५१ क्षेत्र १२०० चौ. फुट याचे १११.५२ चौ.मी.ची खुली जागा ऑनलाईन सातबाराप्रमाणे क्षेत्र हे. ०–०१.११ आर यांसी चतु:सिमा पुर्वेस – सदर गट नंबर पैकी भुखंड नं.५२ ची मिळकत, पश्चिमेस – सदर गट नंबर पैकी भुखंड नं. ५० ची मिळकत, दक्षिणेस– २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस–सदर गट नंबर पैकी भुखंड नं. ४० ची मिळकत.

२) वर नमुद मिळकत ही श्री अरुण विश्वंभर पतंगे, रा. सहकारनगर इचलकरंजी यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा श्री अमोल हणमंता कालतिप्पी, रा. खोतवाडी यांना देवून मिळकत विक्रीचे खरेदीपूर्व करारपत्र करुन दिले आहे. सदरची मिळकत खरेदी घेणेसाठी श्री अमोल कालतिप्पी यांनी आमचे अशिल श्री आर्यचाणक्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या. इचलकरंजी यांचेकडून स्थावर तारण कर्ज घेत आहेत.सबब वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही दावा, पोटगी अर्ज, मनाई दावा, बँक तारण, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, अथवा रजिस्टर करारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. १७/०९/२०२५ इ. रोजीचे

**ॲड. सुनिल सु. धुपदाळे**

रा. १७/२९४, पुजारी मळा, इचलकरंजी.
मो. ९३२६०२२३८५.



सरस्वती हायस्कूलमध्ये हिंदी दिन कार्यक्रमप्रसंगी उपस्थित सौ.आर.एन.जाधव, शिक्षक वृंद व विद्यार्थी.

## सरस्वती हायस्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा

इचलकरंजी,ता.१७–

**सरस्वती हायस्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. आर.एन.जाधव यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सौ.आर.एन.जाधव यांनी मनोगतात विद्यार्थ्यांना हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.**

संगीत शिक्षक जितेंद्र कुलकर्णी व सर्व विद्यार्थ्यांनी 'ए मेरी प्यारी सी हिंदी' हे गीत सुरेल स्वरात सादर केले.हिंदी विभाग प्रमुख सौ.एस.आर.भाटे यांनी हिंदी भाषेचे महत्व सांगितले.हिंदी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी हिंदी राष्ट्रभाषा का महत्व,स्वच्छता का महत्व,'अज्ञान पर करे मात रोबोट' देगा साथ हे नाटक सादर केले. इयत्ता दहावी क च्या विद्यार्थ्यांनी हिंदी राष्ट्रभाषा या शीर्षकाला अनुसरून सुंदर भित्तिपत्रिका तयार केली. या विद्यार्थ्यांना भित्तिपत्रिका विभाग प्रमुख सौ.एस.आर.भाटे व वर्गशिक्षक एस.आर.दिवटणकर यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सौ.एस.एस.शिंदे यांनी केले.आभार सौ.एस.आर.भाटे यांनी मानले. कार्यक्रमास अरुण मोरे,महावीर कांबळे, संजय परीट, संदीप हिरेमठ,सोनाली यादव,विद्यार्थी,विद्यार्थीनी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

## आयडियल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

इचलकरंजी,ता.१७–

**इचलकरंजी महानगरपालिका शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत येथील आयडियल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.**

या स्पर्धेत दिव्यांशी जांगीड हिने तायक्वाँदोमध्ये विभागीय स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवले. रसिका माळी व मानस माळी यांनी जिल्हास्तरीय रोप मल्लखांब व मल्लखांबमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तर नील सोनटक्के याने रायफल शूटिंगमध्ये जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळविला.विजयी स्पर्धकांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष किरण माळी यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालिका माधवी होसमणी व मुख्याध्यापिका राधिका भिसे उपस्थित होते.



जयवंत महाविद्यालय येथे आसिया तेलसंगे हिचा सत्कार करताना प्रा.दिलावर जमादार.

## जयवंत महाविद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा

तारदाळ,ता.१७(वार्ताहर)–

**भारतीय जीवनामध्ये हिंदी भाषेचे मोलाचे योगदान आहे. विविधतेतून एकता हे सूत्र आचरणात आणायचे असेल तर हिंदी भाषेला प्राधान्य दिले पाहिजे. भाषिक व्यवहारांमध्ये हिंदीचे उपयोजन जास्तीत जास्त प्रमाणात केले पाहिजे, असे मत प्राध्यापक डॉ. सुरज मुल्ला यांनी केले.**

ते जयवंत महाविद्यालयात आयोजित केलेल्या हिंदी दिन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या हिंदी विभागाची विद्यार्थिनी आसिया तेलसंगे हिचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलावर जमादार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य दिलावर जमादार यांनी हिंदी भाषा ही इतर भाषेच्या तुलनेत सोपी आणि आकलनास सुटसुटीत आहे. भारत देशात हिंदी बोलणाऱ्यांची संख्या तुलनेने अधिक आहे त्यामुळे हिंदी भाषेचा प्रसार झाला पाहिजे, असे मत मांडले. यावेळी हिंदी पोस्टर प्रदर्शन व ग्रंथालयाच्यावतीने हिंदीतील महत्वाच्या साहित्यकृतीचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले.प्रास्ताविक प्रा. विजयकुमार साठे तर सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ यांनी केले.

# ढेबेवाडीतील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

### रेशनिंग दुकानातून सडलेला गहू, आळ्या झालेल्या तांदळाचे वितरण; नागरिक संतप्त

ढेबेवाडी,ता.१७(प्रतिनिधी)

**पाटण तालुक्यातील रेशनिंग दुकानांतून नागरिकांना सडलेला गहू आणि आळ्या झालेला तांदूळ वितरित झाल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी होत असलेल्या या थेट खेळामुळे सर्वसामान्यांमध्ये संताप उसळला असून, हे धान्य तालुका पुरवठा अधिकारी व गोडाऊन कीपर यांनी आधी खाऊन दाखवावे, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.**

सध्या नागरिकांना तीन महिन्यांतून एकदा रेशनिंग मिळते. गेल्या चार दिवसांत तालुक्यातील बहुतांशा गावांत धान्याचे वाटप झाले. ढेबेवाडीसह अनेक गावांमध्ये नागरिकांच्या हातात पोचलेले धान्य पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे असल्याचे उघड झाले आहे. गव्हामध्ये कुज, सड व तांदळात सर्रास आळ्या निघाल्या. हे धान्य खाल्ल्यास



**शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून मिळालेले तांदूळ व त्यामध्ये फिरणारे किडे.**

गंभीर आजार होण्याचा धोका नाकारता येणार नाही. तरीसुद्धा पुरवठा विभागाकडून या गंभीर विषयाकडे संपूर्ण दुर्लक्ष होत असून जबाबदारी टाळण्याची भूमिका घेतली जात आहे.ढेबेवाडी मंद्रूळकोळे येथील सामाजिक कार्यकर्ते अजित मोहिते यांनी सडलेला गहू, व आळ्यानी भरलेला तांदूळ यावरती प्रतिक्रिया व्यक्त करत नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ केला जात असल्याचा आरोप केला. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, असे धान्य आमच्यावर लादण्यापेक्षा ते तालुका पुरवठा अधिकारी व गोडाऊन कीपर यांनी आधी खाऊन दाखवावे.या प्रकारामुळे ढेबेवाडीसह गावातील नागरिक संतप्त झाले आहेत.

महागाई आणि बेरोजगारीच्या संकटात सापडलेल्या सर्वसामान्य कुटुंबांना जगण्यासाठी आधार मिळावा म्हणून सरकारकडून दिले जाणारे रेशनिंग धान्य जर खाण्यायोग्य नसेल तर ती योजना नसून मृत्यू योजना आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया लाभार्थ्यांमधून व्यक्त केल्या जात आहेत. हा प्रकार थेट जिवावरचा प्रश्न ठरत असल्याने तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

## मेन राजाराम हायस्कूलमध्ये रानभाज्या महोत्सव उत्साहात

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)–

**येथील जिल्हा परिषद कोल्हापूर संचलित मेन राजाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोल्हापूर या प्रशालेतील कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.**

सध्याच्या जंकफूड, फास्टफुडच्या जमान्यात औषधी रानभाज्या, पालेभाज्यांचा वापर दैनंदिन आहारात कमी होताना दिसत आहे. वेगवेगळ्या असणाऱ्या या पालेभाज्या, त्यांचे नित्य जीवनातील महत्व काय आहे याची माहिती उद्घाटक प्राचार्य डॉ. गजानन खाडे यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. प्रशालेत आयोजित केलेल्या रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.खाडे बोलत होते. हिरव्या पालेभाज्यांचा वापर आहारात करणे हितावह आहे याविषयी माहिती वर्गशिक्षक प्रा.सुषमा पाटील यांनी सांगितली. श्रुतिका कोंडा या विद्यार्थिनीने आणलेल्या सर्व भाज्याची माहिती विस्ताराने सांगितली. स्वागत प्रा.अनिल लाड, प्रास्ताविक प्रा.बाबासाहेब माळवे, आभार प्रा. बी. टी. यादव यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्या प्रा.वनिता खडके, प्रा.राहूल देशमुख, प्रा.अयोध्या धुमाळ, प्रा.दिपा लोहार, प्रा.रेश्मा पाटील, प्रा. प्रमिला मळगे, प्रा. एस. वाय. कुंभार, प्रा. एच. एम. काटकर, प्रा.विकास पाटील, प्रा. भाऊसाहेब धराडे, डॉ.संतोष माने, प्रा. सृष्टी तांदळे, शिक्षक वृंद तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## संदीप सुतार यांची निवड

शिरगाव,ता.१७(प्रतिनिधी)–

**आवळी बुद्रुक (ता. राधानगरी) येथील कॉम्रेड संदीप सुतार यांची महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार फेडरेशनच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.**



फेडरेशनचे ३ रे अधिवेशन नाशिक येथे संपन्न झाले. या अधिवेशनात कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अनेक निवडी झाल्या आहेत. या निवडीसाठी त्यांना जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड भरमा कांबळे, जिल्हा सचिव शिवाजी मगदूम यांचे सहकार्य लाभले.या अधिवेशानाला राज्याच्या १७ जिल्ह्यातील १८४ प्रतिनिधी उपस्थित होते.

# रोटरी प्रोबस क्लबच्यावतीने गणराया अॅवॉर्डचे वितरण

इचलकरंजी,ता.१७–

**रोटरी सेंट्रल एक्झिक्यूटिव्ह प्रोबस क्लबच्यावतीने २०२५च्या सामाजिक, धार्मिक किंवा वैज्ञानिक समाज प्रबोधनपर विशेष देखावा सादरीकरण करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व घरगुती–गौरी गणपती सजावट स्पर्धेतील विजेत्यांना गणराया अॅवॉर्डचे वितरण करण्यात आले.**

शहरातील कै.दत्तोबा सातपुते चौक सुतार मळा येथील साई गणेश उत्सव मंडळ (अष्टसिद्दी समवेत चंद्रकोरावर बसलेला गणेश), सरस्वती गणेश उत्सव



**रोटरी प्रोबस क्लबतर्फे आयोजित गणराया अॅवॉर्ड वितरणप्रसंगी पो.नि.महेश चव्हाण,प्रकाश सातपुते,शंकरराव पोवार आदी.**

मंडळ, सरस्वती मार्केट यांचा आदिशक्तीचा जागर हा यांत्रिक हालता देखावा व वस्त्रनगरीचा महाराजा गणेश उत्सव मंडळ, शांतीनगर, थोरात चौक यांनी अक्षरधाम मंदिराची भव्य प्रतिकृती उभारली होती.

या तीनही मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे घरगुती गौरी गणपती सजावटीमध्ये विना सुनील श्रेष्ठी यांनी केलेल्या शेगावचे गजानन महाराज यांच्या देखाव्याला गणराया अॅवॉर्ड देण्यात आला.

पोलिस निरीक्षक महेश चव्हाण, छ.शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक शंकरराव पोवार यांच्या हस्ते गणेश मंडळांना गणराया अॅवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रोबस क्लबचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सदरचा कार्यक्रम संपन्न झाला. स्वागत सौ.संगीता लडगे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सौ.निर्मला मोरे व सदाशिव काजवे यांनी करुन दिली. प्रास्ताविक अध्यक्ष सुनिल कोष्टी यांनी केले. किरण कटके यांनी निरीक्षण समितीने केलेले कामकाज व अॅवॉर्डसाठी निवडलेल्या कारणाची मिसांसा विवेचन केले. गणराया अॅवॉर्ड कोअर कमिटीचे चेअरमन जुगल किशोर तिवारी यांनी निवड समितीने केलेल्या कामकाजाविषयीची माहिती दिली.

याप्रसंगी सदाशिव काजवे, हेमंत कवठे,जयश्री चौगुले, शिवबसू खोत,निर्मला मोरे, अलका काटकर, नीता दोड्डणावर, माधवी कुलकर्णी, दिपाली कोळी, अशोक पाटील, शीला बुबनाळे,कैलास तिवारी, विजय हावळे, वैभव डोंगरे, मंगल डोंगरे, विना श्रेष्ठी, मंडळाचे कार्यकर्ते व क्लब सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ.शारदा कवठे यांनी तर आभार सौ.माया होगाडे यांनी मानले.

# इचलकरंजीत कृत्रिम अवयव वितरण शिबीर संपन्न

इचलकरंजी,ता.१७–

**रोटरी परिवार इचलकरंजी डिस्ट्रिक्ट ३१७०, श्री अग्रसेन सेवा ट्रस्ट, इनरव्हील क्लब ऑफ इचलकरंजी, मारवाडी युवा मंच, मारवाडी युवा मंच मिड टाउन, साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या सहकार्याने अग्रसेन भवन दाते मळा इचलकरंजी या ठिकाणी मोफत कृत्रिम हात पाय अवयव प्रदान शिबिर घेण्यात आले.**

या शिबिरात एक महिन्यापूर्वी दिव्यांग व्यक्तीची मापे, मेजरमेंट घेण्यात आले होते. ३५० लोकांना कृत्रिम हात पाय बसविण्यात आले. अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारा फायबरपासून निर्मित केलेले अत्यंत



**इचलकरंजीत आयोजित मोफत कृत्रिम अवयव वितरणप्रसंगी रोटरीचे गव्हर्नर अरुण भंडारे,सौ.माधवी भंडारे,पन्नालाल डाळ्या, सतीश राठी, रोटरीचे व संघटनेचे पदाधिकारी.**

हलके व मजबूत असे अवयव दिव्यांगांना देण्यात आले.

हा अवयव वितरण कार्यक्रम रोटरी डिस्ट्रिक्ट ३१७० चे गव्हर्नर अरुण भंडारे व सौ.माधवी भंडारे तसेच साधू वासवानी मिशन, पुणेचे ट्रस्टी सुंदर वासवानी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिव्यांगाना कृत्रिम अवयव मोफत प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रोजेक्ट चेअरमन पन्नालाल डाळ्या, सतीश राठी, सौ.वैशाली लोखंडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय घायतिडक, घनश्याम सावलानी,निवेद धांडानिया, रोटरी टेक्स्टाईल सिटीचे अध्यक्ष प्रशांत लाहोटी, योगेश मालू, संतोष साधले, सौ.विभा जैन, मुरलीधर गोयंका, अमित राठोड, मारवाडी युवा मंच मिड टाऊनच्या अध्यक्षा अनिता जैन उपस्थित होत्या.

**सकल दिगंबर जैन समाज, इचलकरंजी लायन्स क्लब ऑफ इचलकरंजी व रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**अरिहंत व्याख्यानमाला २०२५** (वर्ष ८ वे)

**सस्नेह निमंत्रण**

| वार | दिनांक | वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|---|---|
| गुरूवार | १८/०९/२०२५ | डॉ. सौ. मनीषा भोजकर (रेंदाळ) | आनंदी आणि तणावमुक्त जीवन |
| शुक्रवार | १९/०९/२०२५ | श्री. महेंद्र कुलकर्णी (पन्हाळा) | संवाद हरवलेले कुटुंब |

तरी सर्व नागरिक बंधू भगिनींनी या वैचारिक प्रबोधनाचा लाभ घ्यावा ही विनंती.
**स्थळ – लायन्स क्लब ऑफ इचलकरंजी, दाते मळा, इचलकरंजी.**
**वेळ – सायंकाळी ७.०० वाजता.**

**श्रीहरी** शुक्रवार, ता.१९/०९/२०२५ पासून दुपारी १.०० वा.
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
**कामाग्नी**
प्रौढांसाठी — सायं.४ व ७ वा.
**गरम सांसे** A

**श्रीदत्त** शुक्रवार, ता.१२ पासून रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
**हार्ट विच क्लब भाग–२**
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

**पंचवटी** DOLBY DIGITAL PLUS 7.1 — शुक्रवार दि.१२ पासून
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज 2 खेळ 12 - 6 | रोज 2 खेळ 3 - 9





**दशावतार** (मराठी) | **मिराई** (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत **भाग्यरेखा** DOLBY DIGITAL
**शुक्रवार ता.१२ पासून**
रोज ४ खेळ *१२-३-६-९ वा.
सस्पेन्स थ्रीलर, अंगाला दरदरून घाम फोडणारा जबरदस्त चित्रपट



**लोकाह** (हिंदी)

**कल्पना** लेजर प्रोजेक्टरसहीत DOLBY DIGITAL QUBE CINEMA NETWORK
शुक्रवार ता.१२ पा. रोज २ खेळ १२ * ३
(हिंदी मध्ये)



**मिराय**
शुक्रवार ता.१२ पा. रोज २ खेळ ६ * ९
(मराठी चित्र)



**दशावतार**

**गुरु** शुक्रवार ता. १२ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३० * ३.३० * ६.३० व ९.३०वा.
केजीएफ, कांतारा, नरसिंहाच्या निर्मात्यांची अतिभव्य भेट



**मिराय**
सुपरयोद्धा (हिंदीमध्ये)
बाहुबलीच्या तोडीचा जबरदस्त साहसपट

**राधाकृष्ण सिनेमा** RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
☎ 7447440070 bookmyshow





"मिराई" (हिंदी) 10:00 AM, 01:30 PM 04:00 PM, 10:30 PM
"डेमन स्लेअर: इन्फिनिटी कॅसल" (हिंदी) 10:45 AM, 05:00 PM 07:45 PM
"दशावतार" (मराठी) 12:45 PM, 03:30 PM 06:45 PM, 09:45 PM
"दी कॉन्ज्युरिंग: लास्ट राइट्स" (हिंदी) 10:30 PM
"बागी 4" (हिंदी) 01:15 PM
"द बंगाल फाइल्स" (हिंदी) 07:00 PM
आता पहा कोणताही शो फक्त 80/-* मध्ये

**फोर्च्युन सिनेफ्लेक्स** इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11
ADVANCE BOOKING OPEN
JOLLY LLB 3 (U/A) (HIN) 10.30am, 01.30, 04.30, 07.30, 10.30pm
दशावतार (MAR) (U/A) 11.15am, 01.30, 04.30, 07.30, 10.30pm
डेमन स्लेअर : इन्फिनिटी कॅसल (HIN) (U/A) 10.45am, 01.45, 10.00pm
मिराई (HIN) (U/A) 04.45pm
द कंज्युरिंग (HIN) (U/A) 10.30pm
बिन लग्नाची गोष्ट (MAR) (U/A) 02.15, 07.15pm
आरपार (MAR) (U/A) 04.45, 08.00pm
कोणताही सिनेमा पहा 80 रु. पासून पुढे



# शासकीय योजनांचा कल्पकतेतून प्रसार करावा

## जिल्हाधिकारी पाटील;सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची बैठक संपन्न

सातारा,ता.१७(प्रतिनिधी)-

**सेवा पंधरवड्याचे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवड्यात शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता यावा यासाठी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स यांनी नवनवीन कल्पकतेमधून शासनाच्या योजनांचा आपल्या प्लॅटफार्मवरुन प्रसार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले.**


सातारा जिल्हाधिकारी कार्यालयातील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी संतोष पाटील व उपस्थित अधिकारी.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात सातारा जिल्ह्यातील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स यांची बैठक जिल्हाधिकारी श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी ते बोलत होते.या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स उपस्थित होते.

नागरिक सोशल मीडियाकडे जास्त आकर्षित झालेले दिसत आहेत. या सोशल मीडियाचा शासनाच्या योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी वापर करण्यात येणार आहे. सोशल मीडियावर प्रसारीत करावयाचा मजकूर प्रशासनाकडून उपलब्ध करुन दिला जाईल, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, दिलेल्या मजकूरवरुन योजनेचा मतीतार्थ न बदलता तुमच्या कल्पनेनुसार कन्टेट तयार करुन नागरिकांना समजेल,अशा भाषेत सोशल मीडिया प्लॅटफार्मवर प्रसारित करावा. तसेच प्रशासनाकडून लोकांच्या हिताच्या दृष्टीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांनाही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आमंत्रित करण्यात येईल.

सेवा पंधरवड्यानिमित्त प्रत्येक स्वस्त धान्य दुकानाच्या दर्शनी भागात क्युआर कोड लावण्यात येणार आहे. हा क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर धान्य वेळेत मिळते का, कोट्याप्रमाणेच धान्य मिळते का यासह विविध प्रश्न विचारले जाणार असून याची उत्तरे ग्राहकांनी द्यावयाची आहेत. याचीही प्रसिद्धी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स यांनी करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केले.

या बैठकीत सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स यांनीही आपले प्रश्न मांडले. मांडलेल्या प्रश्नांवर जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी सविस्तर चर्चा केली.

# ढेबेवाडीत दूषित पाणी रस्त्यावर

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात - उपाययोजना करण्याची गरज

ढेबेवाडी ,ता.१७(प्रतिनिधी)-

**येथील ग्रामपंचायतीने ढेबेवाडी (ता.पाटण) (ढेबआळी) येथे मोरे दुकान ते काळगुडे गुरुजी यांच्या घरापर्यंत नवीन गटार बांधले आहे. या गटारातील पाण्याचा निचरा होण्यासाठी काही दिवसापूर्वी बांधण्यात आलेला शोषखड्डा गटारीतील पाण्याने भरून तुंबला असल्याने या गटारातील दूषित पाणी नाले तुंबून गेल्या काही दिवसांपासून ते रस्त्यावरती येत आहे. यामुळे येथील रहिवासी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.**


ढेबेवाडी येथे नाले तुंबून रस्त्यावर आलेले दूषित पाणी.

या रस्त्यावरून ये-जा करत असताना नागरिकांना व लहान मुलांना या दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ढेबेवाडी व मंद्रुळ या दोन्ही ग्रामपंचायतच्या हद्दीच्या वादामुळे गटारगंगा रस्त्यावर वाहत आहे.यामुळे दोन्ही ग्रामपंचायतीने यावरती तोडगा काढावा, अशी जनतेकडून मागणी होत आहे. गटाराचे पाणी रस्त्यावर येत असल्याने डासांचे प्रमाण देखील या ठिकाणी वाढले आहे. येथून पन्नास फूट अंतरावरच अंगणवाडी आहे. येथे शिकत असलेल्या मुलांचा व या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. ढेबेवाडी येथील हद्दीतील गटाराचे दूषित पाणी मंद्रुळ ग्रामपंचायतच्या हद्दीत येत आहे. या स्वरूपाचे लेखी निवेदन येथील नागरिकांनी मंद्रुळ ग्रामपंचायतीकडे देण्यात आले आहे. लवकरात लवकर या ठिकाणी ठोस उपाययोजना करून नागरिकांना होणाऱ्या या त्रासापासून मुक्त करावे, असे मंद्रुळ कोळे ग्रामपंचायत सदस्य सुभाष ढेब यांनी म्हटले आहे.



# कोयनेतील लाँच चालकांकडून मंत्री मकरंद पाटील यांचा सत्कार

महाबळेश्वर,ता.१७(वार्ताहर)-

**कोयना जलाशयातील दुर्गम व डोंगराळ भागातील जलवाहतुकीसाठी मागील काही काळापासून लाँच व बार्ज यांच्या देखभाल दुरुस्ती व इंधनावरील खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनाची मागणी प्रलंबित होती.**

राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने ७८ लाख ७ हजार २८२ रुपयांचा निधी वितरण करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आली आहे. याबद्दल लाँच चालकांकडून मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी देवेश शेलार, रमेश कदम, प्रकाश कदम व इतर मान्यवर उपस्थित होते.

# मलकापूरच्या मुख्याधिकारीपदी कपिल जगताप यांची नियुक्ती

कराड ,ता.१७(प्रतिनिधी)-

**मलकापूर (ता.कराड) येथील पालिकेचे मुख्याधिकारी प्रताप कोळी यांची बदली झाली असून, त्यांच्या जागेवर कपिल जगताप यांची नियुक्ती झाली आहे. कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची तडकाफडकी बदली झाल्याने चर्चेला उधाण आले आहे.**

मुख्याधिकारी कोळी यांनी ५ एप्रिल २०२४ ला येथील पालिकेचा कार्यभार स्वीकारला होता. दरम्यानच्या कालावधीत नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांचा कार्यकाल संपल्याने मुख्याधिकारी प्रताप कोळी हे प्रशासक म्हणून काम पाहत होते. कार्यकाल संपण्यापूर्वीच त्यांची बदली झाली. कपिल जगताप यांनी यापूर्वी दहिवाडी, सांगली जिल्ह्यातील कडेगाव तसेच वडूज नगरपंचायतीत मुख्याधिकारी म्हणून, तर कोल्हापूर महापालिकेत उपायुक्त म्हणून काम केले आहे. लवकरच ते येथील पदभार स्वीकारणार आहेत.

# आर्थिक फसवणुकीपासून ग्राहकांनी सावध रहावे-मुलाणी

सांगली,ता.१७(प्रतिनिधी)-

**ग्राहकांनी आर्थिक फसवणुकीपासून सावध रहावे. कोणत्याही अमिषाला बळी पडू नये. आपल्या खात्यांची गोपनीयता ठेवावी. कोणालाही पासवर्ड सांगू नये तसेच बनावट लिंक उघडू नये, असे आवाहन साजीद मुलाणी यांनी केले.**

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने बस्तवडे (ता.तासगाव) येथे ग्रामस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.जिल्हा बँकेचे अध्यक्ष मानसिंग नाईक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी वाघ यांच्या संकल्पनेतून प्रत्येक गावामध्ये अशा ग्रामस्तरीय मेळाव्याचे आयोजन करून शेतकरी व नागरिकांना विविध शासकीय व बँकिंग योजना व सुविधांची माहिती पुरवली जात आहे. यावेळी मुख्य कार्यालयाकडील साजीद मुलाणी यांनी उपस्थित ग्राहकांना मार्गदर्शन केले. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष दिनकर पाटील यांच्या हस्ते नवीन एटीएम कार्ड,पासबुक वितरण केले. कार्यक्रमाला फिल्ड ऑफिसर रमेश पाटील, एफएलसीचे अधिकारी दीपक क्षीरसागर, सोसायटीचे अध्यक्ष, शेतकरी व महिला उपस्थित होत्या.

# बोरगाव येथे रविवारपासून पारायण सोहळ्याचे आयोजन

वाळवा,ता.१७(प्रतिनिधी)-

**बोरगाव (ता.वाळवा) येथील श्री सद्गुरू ब्रह्मानंद महाराज मठात श्री सद्गुरु ब्रह्मानंद महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन केले असल्याची माहिती हभप भास्कर सलगर व पंढरीनाथ कोळेकर यांनी दिली.**

ते म्हणाले,रविवार ता.२१ सप्टेंबर ते मंगळवार २३ सप्टेंबर दरम्यान वाचन,हरिपाठ,कीर्तन असे कार्यक्रम होणार आहेत.हभप सुखदेव महाराज गिरीगोसावी, बोरगांव हे व्यासपीठ चालक आहेत. सकाळी आठ ते दुपारी एक पर्यंत ग्रंथवाचन,रात्री कीर्तन असे कार्यक्रम आहेत.यामध्ये दत्तात्रय महाराज फसाले, सुखदेव महाराज गिरी गोसावी यांची कीर्तने होणार आहेत. मंगळवार ता.२३ सप्टेंबर रोजी सकाळी ग्रंथ समाप्ती, त्यानंतर दिंडी व पालखी सोहळा, दुपारी २ ते ४ वेळेत माऊली माने यांचे कीर्तन, पुष्पवृष्टी व महाप्रसादाने या उत्सवाची सांगता होणार आहे. तरी भाविकांनी या पर्वकाळाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# कराड तालुक्यात १३ ठिकाणी आधार अपडेटेशन केंद्र सुरू होणार

कराड ,ता.१७(प्रतिनिधी)-

**आधार कार्ड अपडेटेशन केंद्राच्या अपुऱ्या संख्येमुळे कराड तालुक्यात नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. याची दखल घेऊन भाजपचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुल भोसले यांनी आधार अपडेटेशन केंद्राची संख्या वाढविण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या होत्या.**



याबाबत तत्काळ कार्यवाही करत, येत्या आठवड्याभरात कराड तालुक्यात १३ ठिकाणी नवीन आधार अपडेटेशन केंद्र सुरू करण्याची ग्वाही प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली आहे.अपुऱ्या आधार अपडेटेशन केंद्रामुळे नागरिकांना सध्या प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. केंद्रांची अपुरी संख्या, सर्व्हर डाऊन यासारख्या अडचणींमुळे अशा केंद्रांसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसत आहे. नागरिकांचा वेळ, पैसा वाया जात आहे. नागरिकांचा हा त्रास कमी व्हावा,यासाठी तालुक्यात आधार अपडेटेशन केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत आ. डॉ.भोसले यांनी प्रांत अतुल म्हेत्रे यांना सूचना केल्या होत्या. प्रशासनाने याची दखल घेत, येत्या आठवड्याभरात तालुक्यात १३ ठिकाणी नवीन आधार अपडेटेशन केंद्र सुरू करण्याची ग्वाही प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली आहे.

# ओबीसींच्या लढ्यात माळी महासंघ ताकदीने उतरणार

## -अविनाश ठाकरे;पंढरीत माळी महासंघाचे चिंतन शिबीर

पंढरपूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**राज्यात ओबीसीच्या लढ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील माळी महासंघाचे सर्व पदाधिकारी सक्रिय राहून ताकदीने उतरतील, असे प्रतिपादन माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी केले आहे. पंढरपूर येथे संपन्न झालेल्या माळी महासंघाच्या राज्यस्तरीय चिंतन शिबिरात ते बोलत होते.**


पंढरपूर येथे माळी महासंघाच्या चिंतन शिबिरात बोलताना अविनाश ठाकरे, व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

अध्यक्षस्थानी माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे हे होते. राज्यातील सत्तावीस जिल्ह्यामधून आलेल्या सर्व राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष यांचे स्वागत माळी महासंघ किसान आघाडीचे प्रदेशाध्यक्ष शंकरराव वाघमारे यांनी केले. यावेळी राज्यातील माळी समाजाची सद्यस्थिती, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये माळी समाजाचे प्रतिनिधीत्व, महाराष्ट्र शासनाने काढलेला जीआर रद्द करणे अथवा दुरुस्त करणे याबाबत जनजागृती करणे, राज्यस्तरावर होणाऱ्या ओबीसीच्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे, माळी महासंघाचा अधिक विस्तार करण्यासाठी प्रयत्न करणे आदी विषयांवर सखोल चर्चा व चिंतन करण्यात आले आणि निर्णय घेण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय महासचिव रवींद्र आंबेडकर, नानासाहेब कांडलकर, काळुराम गायकवाड, गायत्री लडकत,प्रभाकर माळी,हरिभाऊ गांवधरे, श्रीकृष्ण गोरडे, चंद्रशेखर दरवडे, मुरलीधर भुजबळ, मुकुंद पोटदुखे, दीपक भाऊ जगताप , राजेश जावरकर, दिनेश टाकरखेडे, रीमाताई लडकत आदी राज्यभरातून आलेले प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माळी महासंघ किसान आघाडीचे प्रदेशाध्यक्ष शंकरराव वाघमारे, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर जांभळे, विश्वस्त भारत माळी यांनी प्रयत्न केले.

# आष्टा पीपल्स बँकेची वार्षिक सभा संपन्न


आष्टा पीपल्स बँकेच्या सभेत बोलताना बबन थोटे, व्यासपीठावर दिलीपराव वग्याणी, माणिकराव पाटील, दिलीप पाटील, कौशिक वग्याणी, जयदीप थोटे व मान्यवर.

आष्टा,ता.१७(प्रतिनिधी)-

**येथील दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभासदांना खात्यावर १४ टक्के लाभांश जमा केला आहे, अशी माहिती चेअरमन तथा राजारामबापू साखर कारखान्याचे संचालक बबन थोटे यांनी दिली.**

सांगली जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिलीपराव पाटील व एमएससी बँकेचे माजी अध्यक्ष माणिकराव पाटील, दिलीपराव वग्याणी, कौशिक वग्याणी, जयदीप थोटे हे प्रमुख उपस्थित होते. श्रध्दांजली ठराव वाचन व्हा. चेअरमन विराज शिंदे यांनी केले. विषय पत्रिकेवरील सर्व विषय वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत सरनाईक यांनी केले.सभासदांनी सर्व विषय एकमताने मंजूर केले.बबन थोटे यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेत बँकेच्या भविष्यकाळातील विविध योजनांची माहिती दिली. ते म्हणाले,बँकेकडे ठेवी ४१७ कोटी, कर्जे वाटप २७८ कोटी, भाग भांडवल १७ कोटी, स्वनिधी ६८ कोटी व खेळते भांडवल ४९९ कोटी आहे. ढोबळ नफा ८ कोटी ३४ लाख झाला आहे. सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यात एकूण २४ शाखाद्वारे बँकेचे कामकाज सुरु आहे.

दिलीपराव पाटील,माणिकराव पाटील, दिलीपराव वग्याणी यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी मारुती मासाळ, संचालक जयदीप थोटे, कौशिक वग्याणी, फंचु हालूंडे, अनिल चौगुले, सुरेश पाटील,राहुल पाटील, सुनिल वाडकर, संदिप आवटी, अनिल पाटील, डॉ. अनिल निर्मळे, रामचंद्र सिध्द, विष्णू वारे, शुभदा चौगुले, सविता आवटी व तज्ञ संचालक संपत देमाण्णा, विनोद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन संदीप तांबवेकर यांनी केले.

# जिल्हा बँकेच्या अपघात विम्यातून १.४० कोटींची मदत

## -मानसिंगराव नाईक

शिराळा,ता.१७(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेने उतरविलेल्या शेतकरी अपघात विम्याचा आतापर्यंत ७० मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना १ कोटी ४० लाख रुपये मिळाले आहेत, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी दिली.**


कापरी येथील मयत शेतकरी सर्जेराव खबाले यांच्या पत्नी उज्वला खबाले यांना विमा लाभाचे पत्र सुपूर्द करताना मानसिंगराव नाईक. शेजारी विराज नाईक व कापरीतील ग्रामस्थ.

चिखली (ता.शिराळा) येथे शिराळा तालुक्यातील कापरी गावचे मयत शेतकरी सर्जेराव मारुती खबाले यांच्या कुटुंबियांना सांगली जिल्हा मध्यवर्ती जिल्हा बँकेमार्फत दोन लाख रुपयांचा विम्याचा लाभाचे पत्र अध्यक्ष नाईक यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी ते बोलत होते.विराज उद्योग समुहाचे अध्यक्ष विराज नाईक प्रमुख उपस्थित होते. यावेळी श्री.नाईक म्हणाले, बँकेने कायम शेतकरी हिताचे निर्णय घेतले आहेत. शेतकरी विकासाचा मुख्य केंद्रबिंदू मानून कामकाज केले आहे. बँकेने जिल्ह्यातील १ लाख ७५ हजार शेतकऱ्यांसाठी इफ्को टोकियो या कंपनीकडून ३ वर्षांसाठी शेतकरी अपघाती विमा घेतला आहे. त्यापोटी शेतकऱ्यांकडून एकही रुपया रक्कम न घेता बँकेने विम्यासाठी लागणारी ३ कोटी १५ लाख रुपयांची रक्कम भरली आहे. घरातील कर्ता माणूस गेल्यावर शेतकरी कुटुंबाची कशी अवस्था होते, हे त्यांना माहीत असते. कुटुंबावर आभाळाएवढं दु:ख कोसळलेले असतेच पण आर्थिक अडचणींनाही सामोरे जावे लागते. त्या परिस्थितीत बँकेमार्फत देण्यात येणारी विम्याची रक्कम आर्थिक हातभार देते.

विमा रकमेच्या लाभाचे पत्र प्रदान प्रसंगी बाबूराव पाटील, मोहन पाटील,अशोक पाटील, बाजीराव पाटील, महादेव खबाले, प्रशांत पाटील, राजाराम पाटील, राहूल खबाले,सारिका खबाले आदी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे अलंकार गाठविण्याचे काम सुरू

## नवरात्र उत्सवाच्या पूर्वतयारीला प्रारंभ

पंढरपूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे अलंकार असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत, असे अलंकार उत्सवाप्रसंगी श्रींस परिधान करण्यात येतात. नवरात्र उत्सवाच्या पूर्वतयारीसाठी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे पुरातन अलंकार गाठविण्याचे काम सध्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू करण्यात आले असल्याचीही माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.**


पंढरपूर: नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे अलंकार गाठविण्याचे सुरु असलेले काम.

शिवकालीन, पेशवेकालीन अनेक अमूल्य दागिने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेस असून, यामध्ये श्री.विठ्ठलास सोन्याचे पैंजण, बाजीराव कंठी, मत्स्य, तोडे, सोवळे (धोतर), हिऱ्यांचा कंबरपट्टा, बाजुबंद, दंडपेट्या, मणिबंध, सोन्याची राखी, तुळशीची सोन्याच्या मण्यांत गुंफलेली माळ, कौस्तुभमणी, हिरे, पाचूंनी गुंफलेली मोत्यांची कंठी, बोरमाळ, मोत्यांच्या माळा, पुतळयांच्या माळा, मोहरांच्या माळा, नवरत्नांचा हार, सोन्याचे मुकुट, हिऱ्यांचा मुकुट, सोन्याची शिंदेशाही पगडी, चांदीची काठी, सोन्याची मकरकुंडले, नील व हिरे बसवलेला नाम- म्हणजे सोन्याचा गंध असे अनेक प्रकारचे अनमोल अलंकार आहेत.

तसेच श्री रुक्मिणी मातेस सोन्याचे वाळे,पैंजण,साडी, कंबरपट्टे, माजपट्टा, रत्नजडित पेट्या,हिरे,माणिक, पाटल्या, मोत्यांच्या व रत्नजडित जडावांच्या बांगड्या, गोठ, तोडे, हातसर आहेत. गळ्यातील अलंकारांमध्ये कारल्याचे मंगळसूत्र, दशावतारी मंगळसूत्र, कोल्हापुरी साज, पाचूची गरसोळी, लहान सरी, मोठी सरी, पुतळ्याची माळ, मोहरांची माळ, एकदाणी,बोरमाळ, ठुशी, तुळशीचा हार, झेला, पोहे हार, चंद्रहार, चपलाहार, पेट्यांचा हार, शिंदेशाही हार, तन्मणी, चिंचपेटी, नवरत्नांचा हार, शिंदे हार,जवाच्या माळा आणि हायकोल सुर्य-चंद्र असे दागिने आहेत. हिऱ्यांचे खोड असलेला तन्मणी, तारामंडल असे अनेक प्रकारचे अनमोल अलंकार आहेत.

सदरचे अलंकार जतन व सुरक्षततेच्या दृष्टीने प्रतिवर्षी गाठविण्यात येतात. सदरचे काम नवरात्र उत्सवापूर्वी करण्यात येते. त्याप्रमाणे यावर्षी सदरचे अलंकार गाठविण्याचे काम सुरू करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# पंढरपूर ते घुमाण सायकल वारीचे आयोजन

फलटण,ता.१७(वार्ताहर)-

**संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या ७५५ व्या जयंती निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या संत नामदेव महाराज रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. ही सायकलवारी कार्तिक शुध्द एकादशी रविवार ता. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता श्री क्षेत्र पंढरपूरहून श्री क्षेत्र घुमाणकडे प्रस्थान ठेवेल, अशी माहिती पालखी सोहळा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सुभाष भांबुरे यांनी दिली.**

भांबुरे म्हणाले, रविवार ता. २ नोव्हेंबर ते ता. ३ डिसेंबर २०२५ या दरम्यान या रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. संत नामदेव महाराज यांची ७५५ वी जयंती, संत ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा व गुरुनानक जयंती याचे औचित्य साधून संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील जन्मस्थानावरुन या यात्रेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या सायकल यात्रेत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयस्तरावर सायकल रायडिंग केलेल्या व ५० पेक्षा अधिक वयोमान असलेल्या सुमारे ११० सायकलपटूनी सहभाग नोंदविला आहे. ही रथ यात्रा व सायकल वारी महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान,हरियाणा व पंजाब राज्यातून मार्गक्रमण करणार असल्याचे सांगितले.

यावेळी भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, संत नामदेव महाराजांचे वंशज ज्ञानेश्वर माऊली नामदास,महाराष्ट्र राज्य समन्वयक बापूसाहेब उंडाळे, पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष शंकर टेमघरे, सचिव ॲड. विलास काटे, खजिनदार मनोज मांढरे, विश्वस्थ राजेंद्रकृष्ण कापसे, राजेंद्र मारणे, सल्लागार डॉ. राजगोपाल खंडेलवाल आदी उपस्थित होते.

# दुरुस्त केलेला रस्ता एका दिवसातच उखडला

## निपाणी-फोंडा मार्गावरील ठेकेदाराचे निकृष्ट काम; खडीमध्ये डांबराचा अभाव; नागरिकांतून संताप

मुरगूड,ता.१७(प्रतिनिधी)-

**निपाणी फोंडा मार्गावर पडलेले खड्डे मुजवण्यासाठी आंदोलनाच्या इशाऱ्या नंतर सार्वजनिक बांधकामचे अधिकारी, ठेकेदार प्रतिनिधींच्या संयुक्त बैठकीत तात्काळ कामाला सुरुवात करण्याचे मान्य झाले. खड्डे मुजवण्याचे काम सुरूही झाले. मात्र मुजवलेले खड्डे त्याच दिवसापासून उखडले आहेत. ठेकेदारांच्या निकृष्ट कामामुळे संतापाची लाट उसळली असून कोणत्याही वेळी नागरिक रस्त्यावर उतरण्याची शक्यता आहे.**




निपाणी-फोंडा रस्त्यावरील एका दिवसात उखडलेले खड्डे,तर मुरगूड जवळील निकृष्ट काम बंद पाडताना नागरिक.

सुरुवातीपासूनच निकृष्ट काम झालेल्या निपाणी-फोंडा मार्गावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. तर अनेक ठिकाणी अर्धवट कामे आहेत. यासाठी लोकांच्यातून सातत्याने संताप व्यक्त होत आहे. सामाजिक संघटनांनी याबाबत मागील आठवड्यात आंदोलनाचा इशारा दिल्यावर सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदारांना जाग आली आणि मुरगूड येथे संयुक्त बैठक होऊन दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात करण्याचे आश्वासन मिळाले आणि खड्डे मुजवण्याचे काम लिंगनूरपासून सुरु झाले पण खड्डे मुजवून एक दिवस होण्याच्या अगोदरच भरलेले खड्डे उखडले आहेत. हे खड्डे मुजवण्यासाठी केवळ खडीचा वापर झाला असून या खडीमध्ये डांबर दिसत नाही त्यामुळेच गडबडीने भरलेले खड्डे गडबडीनेच उखडले आहेत. मार्गावरील अर्धवट कामे सुरु केलीच नाहीत यामुळे वाहनधारकांतून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. ठेकेदारांनी व सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ मलमपट्टीची ही कामे थांबवावीत व दर्जेदार व टिकावू कामे झाली पाहिजेत अन्यथा उग्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

मुरगूड शहरात प्रवेश करणाऱ्या ठिकाणीच सिमेंटचा रस्ता असून देखील मोठे खड्डे होते. पावसाळ्यामध्ये या ठिकाणी पाणी साठल्यामुळे मुरगुडे शहरामध्ये प्रवेश करण्यासाठी या खड्ड्यामधूनच प्रवास करावा लागला होता. आज त्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्याचे काम सुरु करणार होते हे कामही तात्पुरती मलमपट्टी करत असताना मुरगूडच्या जागृत नागरिकांनी ते काम बंद पाडून या ठिकाणी खड्डे न मुजवता पूर्ण ४० फुटाचा रस्ता करण्याची मागणी केली यानंतर ठेकेदार आणि सुपरवायझर यांनी संबंधितांशी चर्चा केल्यानंतर कंपनीच्या वतीने या ठिकाणी पूर्ण ४० फुट रस्ता करून देण्याचे आश्वासन दिले. त्याची पूर्तता करताना पूर्ण रस्ता खोदून घेऊन हा चाळीस फूट रस्ता दोन दिवसांमध्ये तयार करून देण्याचे आश्वासन त्यांनी उपस्थितांना दिले. यावेळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. आता या ठिकाणी पूर्ण चाळीस फुटाचा नव्याने डांबरी रस्ता होणार असल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष सुखदेव येरुडकर, एकनाथ देशमुख, सर्जेराव भाट, ओंकार पोतदार, अमोल देवळे, गोविंद मोरबाळे, प्रकाश देवडकर, पांडुरंग चौगले, भरत देवळे, नामदेव माने, सुनील लोकरे, योगेश चौगले, नितीन माने, महादेव घोडके, अजित चौगले, संदीप परीट, सुहास देवळे, बाजीराव देवळे, विजय देवळे, अभिजीत देवळे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



## रामतीर्थ वन विभागाच्या पर्यटन कर आकारणीस विरोध

आजरा,ता.१७(प्रतिनिधी)-

**रामतीर्थ पर्यटन स्थळी जाणाऱ्या रस्त्यावर वन विभागाच्या हद्दीमध्ये पर्यटन कर वसुली नाका तयार करण्यात आला आहे.**

### स्थानिकांकडून कर न आकारण्याची मागणी

या नाक्यावर स्थानिक नागरिकांसह दुचाकी स्वारांकडूनही कर आकारणी होत असल्याच्या तक्रारी वाढत असून वनविभागाने स्थानिक नागरिकांसह दुचाकीस्वारांना करातून मुक्ती द्यावी अशी मागणी आज अन्याय निवारण समिती व वनविभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत करण्यात आली.

मुळातच रामतीर्थ परिसरात सोयीसुविधा नाहीत. कर आकारणी पावत्यांमध्येही गोंधळ आहे. पावत्यांवर शिक्के व सह्या नाहीत. यावेळी परिक्षेत्र वनअधिकारी सावंत, समितीचे अध्यक्ष परशुराम बामणे, गौरव देशपांडे,पांडुरंग सावरतकर, ज्योतिप्रसाद सावंत, यशवंत चव्हाण, दिनकर जाधव, जोतिबा आजगेकर, जावेद पठाण, मिनीन डिसोझा आदींनी चर्चेत भाग घेतला.

**मागणी**- वाहनांचे चार चाकी, अवजड, प्रवासी असे वर्गीकरण करून प्रति माणसी कर आकारण्यापेक्षा या परिसरात प्रवेश करणाऱ्या वाहनांवर कर आकारणी करावी. रामतीर्थ महादेव मंदिर परिसरासह मुख्य राम मंदिर परिसरामध्ये पिण्याचे पाणी व स्वच्छ स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत.



कोल्हापूर- ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार स्वीकारताना चंदुरच्या सरपंच स्नेहल कांबळे,बाबासो मंगसुळे, महेश पाटील आदी.

# चंदूर ग्रामपंचायतीचा आर.आर.पाटील पुरस्काराने गौरव

## सुंदर गाव स्पर्धेत हातकणंगले तालुक्यात प्रथम क्रमांक

चंदूर,ता.१७(वार्ताहर)-

**चंदूर (ता.हातकणंगले) येथील ग्रामपंचायतला महाराष्ट्र शासनाच्या विकास विभागाच्यावतीने सन २०२२-२३ चा आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.**

सन २०२२-२३ या वर्षात तालुकास्तरावर आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये निर्धारित निकषांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातून सर्वाधिक गुण प्राप्त केले असल्याने चंदुर ग्रामपंचायतला आर.आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. चंदूर ग्रा.प.च्यावतीने स्वच्छतेच्या बाबतीत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचीच दखल घेवून या पुरस्कारासाठी गावाची निवड झाली आहे.

हा पुरस्कार कोल्हापूर येथील कार्यक्रमात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते चंदुरच्या सरपंच स्नेहल कांबळे, उपसरपंच बाबासो मंगसुळे, माजी पंचायत समिती सभापती महेश पाटील यांनी स्वीकारला. याप्रसंगी खास.धनंजय महाडिक, आम.राहुल आवाडे, जिल्हाधिकारी अमोल येडगे या मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण समारंभ झाला. यावेळी चंदुरचे ग्रामपंचायत सदस्य संदीप कांबळे, मारुती पुजारी, भाऊसो रेंदाळे, फिरोज शेख, वैशाली पाटील, ललिता पुजारी, योगिता हळदे, रोहिणी घोरपडे, स्वाती कदम आदी उपस्थित होते.

# मी ज्यांच्यासोबत जातो त्यांचीच सत्ता-रामदास आठवले

## हुपरीत आरपीआयचा मेळावा संपन्न ; सत्तेत पुरेसे प्रतिनिधीत्व देण्याची मागणी

हुपरी,ता.१७(वार्ताहर)-

**मी ज्यांच्यासोबत जातो, त्यांचीच सत्ता येते. महायुतीला मिळालेल्या यशात आरपीआयची भूमिका महत्वाची होती असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले. ते हुपरी येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने (आरपीआय) आयोजित केलेल्या सत्ता संपादन महामेळाव्याप्रसंगी बोलत होते.**

पुढे बोलताना ते म्हणाले, आगामी निवडणुकात आरपीआयला योग्य प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले. आठवले यांनी उपनगराध्यक्ष जयकुमार माळगे यांच्या कार्याचे कौतुक केले आणि पक्षासाठी आयुष्य वेचलेले



हुपरी येथील आरपीआयच्या मेळाव्यात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार करताना माजी आम.प्रकाश आवाडे व इतर मान्यवर.

राज्य सचिव मंगलराव माळगे यांना मोठे पद देण्याचे आश्वासनही दिले.

या मेळाव्यात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरपीआयला पुरेसे आणि योग्य प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली.पक्षाचे राज्य सचिव मंगलराव माळगे यांनी स्वागतपर भाषण केले.त्यांनी हुपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकात बुद्ध विहार उभारण्यासाठी निधी देण्याची व हुपरी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्याची मागणी केली.

माजी मंत्री प्रकाशराव आवाडे यांनी आपल्या भाषणात रामदास आठवले यांच्या नेतृत्वाची प्रशंसा केली. या मेळाव्यात जयसिंगपूरच्या माजी नगराध्यक्ष डॉ.नीता माने, जिल्हाध्यक्ष उत्तमराव कांबळे,बी.के.कांबळे, अशोकराव गायकवाड, प्रा.शहाजी कांबळे, आण्णा वायदंडे यांनीही मार्गदर्शन केले. आभार जयकुमार माळगे यांनी मानले. या मेळाव्याला भाजपाचे मंडल अध्यक्ष सुभाष गोटखिंडे, आण्णासाहेब शेंडूरे, प्रकाशराव रणदिवे, रफिक मुल्ला, शिवाजी जाधव, डॉ. सुभाष मधाळे, दीपक भोसले, अविनाश अंबपकर, सुदर्शन खाडे, अनिल कांबळे, आकाश कांबळे, जितेंद्र बनसोडे तसेच जिल्ह्यातील आरपीआय पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गगनबावडा येथे गणराया ॲवॉर्डचे वितरण उत्साहात

गगनबावडा,ता.१७(प्रतिनिधी)-

**गणराया अवॉर्ड ही केवळ सन्मानाची बाब नसून समाजासाठी सतत कार्य करण्याची प्रेरणादायी शिदोरी आहे, असे प्रतिपादन गगनबावडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव वाघ यांनी केले. गौरी मल्टीपर्पज हॉल खोकुर्ले येथे पार पडलेल्या गणराया ॲवॉर्ड वितरण प्रसंगी ते बोलत होते.**

गणेशोत्सव काळामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या कान्होबा केदारलिंग तरुण मंडळ मांडूकली (प्रथम क्रमांक), जाणता राजा तरुण मंडळ निवडे( द्वितीय क्रमांक), जय शिवराय तरुण मंडळ असळज व ज्योतिर्लिंग तरुण मंडळ निवडे (तृतीय क्रमांक) यांना देण्यात आला. तसेच तालुक्यातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंडळांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.ॲवॉर्ड समिती सदस्य रघुनाथ शिंदे, डॉ.गुरुप्रसाद जाधव, संभाजी पाटील,वृंदा पाध्ये यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गगनबावडा पोलीस ठाण्याचे कर्मचारी व सर्व गावचे पोलीस पाटील यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रशांत पाटील यांनी केले तर आभार कृष्णात पाटील यांनी मानले.

# वाट्याच्या शेतीची पद्धत संपुष्टात येण्याच्या मार्गावर

शिरगाव,ता.१७(वार्ताहर)-

**ग्रामीण भागात गेल्या काही वर्षापासून शेती व्यवसाय अडचणीतून मार्गक्रमण करत आहे. नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चाच्या तुलनेत पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेती व्यवसायाला हळुहळू अवकळा प्राप्त होत आहे. शेती व्यवसायातील अनंत अडचणी कष्टप्रद जीवन पाहून युवा पिढीही या व्यवसायाकडे पाठ फिरवत आहे. शेती कसणारे हात कमी होऊ लागल्याने मोठया शेतकऱ्यांचा शेती वाट्याने देण्याकडे कल होता. मात्र सध्या अल्प भूधारक शेतकरी अथवा शेतमजुराकडून वाट्याने शेती करण्यास नकार दिला जात आहे.**

वाढत्या खर्चामुळे सध्या वाट्याची शेती पद्धत संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. परिणामी शेतकरी अडचणीत आला आहे.शेती कामासाठी जुन्या काळातील पैरा पद्धतीचा पून्हा अवलंब करताना दिसून येत आहेत. शेती मशागती



संग्रहीत

रासायनिक खते, बियाण्यांचे दर गगनाला भिडल्याने उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे.

या तुलनेत शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य बाजार भाव मिळत नाही. त्यातच दरवर्षी अवर्षण, अतिवृष्टी , पूर परिस्थितीमुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी सर्व बाजूंनी अडचणीत सापडला आहे.

### शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ
### पुन्हा पैरा पध्दतीचा अवलंब

अशा या पार्श्वभूमीवर बळीराजा अनंत अडचणींवर मात करून काळ्या माताशी इमान राखून कष्ट घेत आहे. शेतकऱ्यांकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. ते शेतकरी जमिनी दुसऱ्यांना वाट्याने (भाग पध्दतीने) कसावयास देत होते. मात्र येणारा उत्पादन खर्च व मिळणारे उत्पादन यात ताळमेळ बसत नसल्याचे कारण सांगून अन्य शेतकरी जमिनी वाट्याने करण्यास नकार देऊ लागले आहेत. त्यामुळे शेतीकामासाठी मनुष्य मिळण्यासाठी जुन्या काळातील पैरा पद्धतीचा अवलंब करू लागले आहेत. एकंदरीत ही सर्व परिस्थिती शेती व्यवसायासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. शेती व्यवसाय समृद्ध होण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.



ज्येष्ठ नागरिक मंचसाठी जागेच्या मागणीचे निवेदन सरपंच सुलोचना कट्टी यांना देताना सुनील इंगवले,बी.डी.पाटील व इतर.

## ज्येष्ठ नागरिक संघास जागा देण्याची मागणी

कबनूर,ता.१७(वार्ताहर)-

**येथील ज्येष्ठ नागरिक आधार मंच यांच्याकडून कबनूर ग्रामपंचायतकडे ज्येष्ठ नागरिक मंचास जागा मिळण्याबाबत निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, कबनूरमध्ये ज्येष्ठ नागरिक मंचची स्थापना झालेली आहे.**

ज्येष्ठ नागरिकांची कामे, सुविधा सवलती व विरंगुळा मिळण्याच्या उद्देशाने स्थापना केली आहे. संघटनेला ऑफिस कामासाठी व ओपन जिमसाठी जागा हवी आहे.

हे निवेदन मंचचे अध्यक्ष सुनील इंगवले यांनी सरपंच सुलोचना कट्टी, उपसरपंच सुधीर लिगाडे,ग्रामविकास अधिकारी संजय बर्डे यांच्याकडे दिले. यावेळी मंचचे मार्गदर्शक बी. डी.पाटील,उपाध्यक्ष सदाशिव पाटील, मोहन डिंगणे, अल्ताफ जकाते उपस्थित होते.



पोषण माह अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी मा.पं.स.सभापती महेश पाटील व इतर मान्यवर.

## चंदूर येथे पोषण माह राष्ट्रीय अभियानाचे उद्घाटन

चंदुर,ता.१७(वार्ताहर)-

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प २ पट्टणकोडोली बीटच्यावतीने चंदुर येथे 'पोषण माह' राष्ट्रीय अभियानाचे उद्घाटन उत्साहात पार पडले.**

या अभियानाचे उद्घाटन प.स.चे माजी सभापती महेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच स्नेहल कांबळे, उपसरपंच बाबासाहेब मंगसुळे, ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य अधिकारी बारगीर, अंगणवाडी पर्यवेक्षिका स्मृती खांडेकर, विद्यार्थी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, किशोरी मुली, शिक्षक, पालक वर्ग उपस्थित होता. हे अभियान १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर पर्यंत सुरू राहणार असून यामध्ये विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यावेळी विद्या पाटील यांनी गरोदर महिला, स्तनदा माता, मुले,किशोरी यांचा आहार कसा असावा याविषयी मार्गदर्शन केले.

# रत्नाप्पाण्णा कुंभार हे सुराज्याच्या घडणीचे शिल्पकार

## जिल्हाधिकारी अमोल येडगे; जयंतीनिमित्त रत्नाप्पाण्णांना अभिवादन

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**थोर स्वातंत्र्यसेनानी देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार हे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक विश्वातील एक असामान्य लोकनेते होते. सामान्य लोकांशी त्यांची नाळ जोडलेली होती व लोकांसाठी ते सदैव उपलब्ध असत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्वराज्य आणि स्वराज्यासाठी व्यतीत केले. ते सुराज्याच्या घडणीचे शिल्पकार होते. त्यांचे कार्य आणि विचार हे येणाऱ्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहेत असे मत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी व्यक्त केले.**

कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचालित शहाजी लॉ कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, नाइट कॉलेज आणि पार्वतीदेवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्यावतीने आयोजित देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांची ११६ वी जयंती आणि राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा



कौन्सिल ऑफ एज्युकेशन आयोजित देशभक्त रत्नाप्पा कुंभार जयंती समारंभामध्ये बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे,समोर उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

पारितोषिक वितरण समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी येडगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ.विश्वनाथ मगदूम होते. यावेळी मुद्रांक जिल्हाधिकारी बाबासाहेब वाघमोडे, कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा सौ.रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ.प्रसाद मगदूम,संचालक ॲड.वैभव पेडणेकर, ॲड.अमित बाडकर हे उपस्थित होते.

यावेळी डॉ.विश्वनाथ मगदूम यांनी संस्थेच्या वाटचालीचा व विविध उपक्रमांचा आढावा घेतला. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या निमशिरगाव येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य स्मारकाची माहिती त्यांनी दिली. मुद्रांक जिल्हाधिकारी बाबासाहेब वाघमोडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यावेळी डॉ.विश्वास सुतार लिखित कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या संस्थागीताचे जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते अनावरण करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.उत्तम पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ.अरुण शिंदे व आभार प्राचार्या डॉ.वर्षा मैंदर्गी यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.प्रवीण पाटील, प्राचार्य भालचंद्र कुलकर्णी, संचालक ॲड. वैभव पेडणेकर, प्राचार्य डॉ.उत्तम पाटील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## हनुमान दूध संस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

गगनबावडा,ता.१७(प्रतिनिधी)-

**श्री.हनुमान सहकारी दूध संस्था, तिसंगी हिची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन रामचंद्र वाघरे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली.**

यावेळी व्हा.चेअरमन बाबासो भोसले, संचालक मंडळ व सचिव महेश पाटील व्यासपिठावर उपस्थित होते.या सभेला माजी जिल्हा परिषद सदस्य भगवान पाटील, सरपंच सर्जेराव पाटील, सरपंच संजय पाटील, आनंदा पाटील, पांडुरंग खाडे, व्हा.चेअरमन बाबासो भोसले, मधुकर पोतदार,विनायक पाटील, प्रकाश खाडे यांच्यासह सर्व संचालक व मान्यवर सभासद उपस्थित होते. सभेत लहू धोंडी पाटील, महादेव तुकाराम पाटील, विश्वास शिवाजी खाडे, दीपक दगडू पाटील, परशुराम पाटील, हिंदूराव पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# खूनाचा प्रयत्न पाचजणांची निर्दोष मुक्तता

इचलकरंजी,ता.१७–

**अतुल चंद्रकांत पेटकर यास पूर्वीच्या वादातून लोखंडी गज व काठीने ठार मारणेचा प्रयत्न केलेच्या आरोपातील संशयित संदिप यशवंत गवड, नारायण इंगळे, शुभम विलास गळंकी व राहूल वसंत चव्हाण, निलेश बाळासो पाटील या पाचजणांची सबळ पुराव्याअभावी इचलकरंजी येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी निर्दोष मुक्तता केली.**

६ जुलै२०१७ रोजी रात्री पावणे बारा वाजता भोनेमाळ येथे संशयित आरोपी व मयत झालेला विशाल ठाणेकर या सर्वांनी लोखंडी गज व काठीच्या सहाय्याने अतुल चंद्रकांत पेटकर यांचेवर हल्ला चढवून त्याला ठार मारणेचा प्रयत्न केला म्हणून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला. त्यानंतर सदर खटल्याची सुनावणी सत्र न्यायालय इचलकरंजी येथे सुरु झाली . रात्रीचा अंधार आहे, ओळख परेड नाही व फिर्यादी जखमी याच्या जबाबात विसंगती आहे, बहुतांश संशयितांची नावे फिर्यादीमध्ये नमूद नाहीत हा युक्तिवाद संशयीत आरोपींचे ॲड. मेहबूब बाणदार यांनी मांडला. सदर युक्तिवाद ग्राहय मानून न्यायालयाने सर्व संशयितांची निर्दोष मुक्तता केली.

# घरगुती वीज ग्राहकांच्या सुरक्षा ठेव वाढीला विरोध

कोल्हापूर, ता.१७ (प्रतिनिधी)–

**घरगुती ग्राहकांच्या वीज बिलातील सुरक्षा ठेव रकमेतील वाढ तात्काळ रद्द करावी, अशी मागणी अखिल भारत हिंदू महासभेच्या वतीने करण्यात आली. या संदर्भात महासभेचे शिष्टमंडळ महावितरणचे अधीक्षक अभियंता गणपत लटपटे यांना निवेदन देण्यात आले.**

घरगुती वीज बिलामध्ये सुरक्षा ठेव वाढविण्यात आली असून, ही वाढ नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना किंवा स्पष्ट कारण न देता करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप महासभेने केला. सुरक्षा ठेव रकमेतील ही वाढ तातडीने मागे घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या वेळी शिष्टमंडळात अखिल भारत हिंदू महासभेचे जिल्हाध्यक्ष संदीप सासणे, गजानन तोडकर, शिवानंद स्वामी, स्वाती रजपूत, पूजा शिंदे, ज्योती बागडी, सुवर्णा सुतार आदी उपस्थित होते.

# देशिंगेत रक्तदान शिबिराला प्रतिसाद

सांगली,ता.१७ (प्रतिनिधी)–

**संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने संत निरंकारी सत्संग भवन देशिंग या ठिकाणी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून १४० रक्तदात्यांनी रक्तदान केले.**

या शिबिराचा शुभारंभ नंदकुमार झांबरे, यांच्या उपस्थितीमध्ये दीप प्रज्वलनाद्वारे करण्यात आला.याप्रसंगी जालिंदर जाधव, किशोर माने, जगन्नाथ निकाळजे, डॉ.यशवंत शेंडे आदी उपस्थित होते.

# कुरणी येथे विजेचा शॉक लागून महिला ठार

मुरगूड ता.१६ (प्रतिनिधी)–

**कुरणी ता.कागल येथे चारा कुटी मशिनचा शॉक लागून महिला ठार झाली. सुनिता कृष्णात मांगोरे (वय३५) असे मयत महिलेचे नाव आहे याबाबतची नोंद मुरगूड पोलिसात झाली आहे.**



कुरणी (ता.कागल) येथील सुनिता कृष्णात मांगोरे या आपल्या जनावरांच्या शेडमध्ये जनावरांना वैरणीची कुटी करीत असताना चारा कुटी मशिनचा शॉक बसून बेशुध्द अवस्थेत मिळून आल्या. त्यांना ग्रामीण रूग्नालय मुरगूड येथे आणून तेथील डॉक्टर यांनी त्यांना तपासले असता, डॉक्टरांनी उपचारापुर्वीच मयत झालेचे सांगितले.शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.याबाबतची फिर्याद रविंद्र रामचंद्र मांगोरे यांनी मुरगूड पोलिसात दिली असून घटनेची नोंद मुरगूड पोलिसात झाली आहे .अधिक तपास हे.कॉ. पारखे करीत आहेत.

# विट्यात ओबीसी आरक्षणाच्या रक्षणासाठी कार्यकर्ते रस्त्यावर

विटा,ता.१७ (प्रतिनिधी)–

**मराठा समाजाला कुणबी दाखल्याच्या माध्यमातुन सरसकट ओबीसी आरक्षण देण्याचा शासन निर्णय ओबीसी समाजावर अन्यायकारक आहे. त्यामुळे हा शासन निर्णय तातडीने रद्द करावा, अशी मागणी विट्यात ओबीसी समाजाच्या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी केली आहे. प्रांताधिकारी विक्रमसिंह बांदल यांना याबाबत मागणीचे निवेदन देण्यात आले.**



विटा : प्रांताधिकारी विक्रमसिंह बांदल यांना निवेदन देताना किरण तारळेकर, किशोर डोंबे, प्रताप सुतार, उत्तम चोथे, फिरोज तांबोळी व अन्य.

महाराष्ट्र शासनाने २ सप्टेंबर रोजी मराठा आरक्षणाविषयी एक शासन निर्णय जाहीर केला आहे. या आदेशामुळे मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखल्याच्या माध्यमातुन ओबीसी आरक्षण मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासनाच्या या निर्णयाविरोधात विट्यातील ओबीसी समाज बांधव एकवटले असून बुधवारी शेकडो कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते विटा तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढून शासनाच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी बोलताना माजी उपनगराध्यक्ष किरण तारळेकर म्हणाले, ओबीसी आरक्षणाबाबत २ सप्टेंबर रोजी शासनाने आदेश पारीत केला आहे. यामुळे आता मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखल्याच्या माध्यमातुन ओबीसी आरक्षण मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासनाचा हा निर्णय महाराष्ट्रातील ओबीसी समाजाचे आरक्षण संपवणारा आहे. त्यामुळे हा आदेश रद्द करण्यात यावा अथवा त्याला स्थगिती देण्यात यावी. तसेच ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला वेगळे आरक्षण लागू करावे. ही आमची विनंती व मागणी असुन शासकीय नोकरीमधील रिक्त ओबीसी कोटा तात्काळ भरण्यात यावा. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती पुर्वीच्या प्रचलित पद्दतीने देण्यात यावी. ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी असलेल्या सर्व महामंडळाच्या निधीमध्ये भरीव तरतूद करण्यात यावी. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या काळात ओबीसी समाजाच्यावतीने राज्यभर मोठे आंदोलन उभे करण्याचा इशारा यावेळी ओबीसी समाजाच्यावतीने प्रशासनाला देण्यात आला.

यावेळी किशोर डोंबे, प्रताप सुतार, उत्तम चोथे, दत्तात्रय गायकवाड, संदीप मेटकरी, तात्या कोरे, शिवाजी हारगुडे,बाळासाहेब मेटकरी, वैभव म्हेत्रे, सुनील मेटकरी, राजू मुल्ला, फिरोज तांबोळी, माधव रोकडे, विजय नागमल, गजानन सुतार, राजू राठोड यांच्यासह ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केएटीपीच्यावतीने पायाभूत सेवा उपलब्ध करून देवू

## चेअरमन प्रकाश दत्तवाडे

इचलकरंजी,ता.१७–

**संस्थेच्या वतीने येत्या सहा महिन्यात आवश्यक त्या सर्व पायाभूत सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. कल्लाप्पाण्णा आवाडे को–ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट ॲन्ड इंटीग्रेटेड टेक्स्टाईल पार्क हा राज्यातील नव्हे तर देशातील अव्वल स्थानावरील पार्क असेल आणि टेक्स्टाईल पार्क कसा असावा याचे उत्तम उदाहरण असेल, असा विश्वास चेअरमन प्रकाश दत्तवाडे यांनी व्यक्त केला.**



कल्लाप्पाण्णा आवाडे को–ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट ॲन्ड इंटीग्रेटेड टेक्स्टाईल पार्क या संस्थेच्या सभेत बोलताना चेअरमन प्रकाश दत्तवाडे. व्यासपीठावर इतर मान्यवर (छाया –अनंतसिंग)

कल्लाप्पाण्णा आवाडे को–ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट ॲन्ड इंटीग्रेटेड टेक्स्टाईल पार्क या संस्थेची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी पार पडली. त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून चेअरमन प्रकाश दत्तवाडे बोलत होते. याप्रसंगी माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, क. आ. इचलकरंजी जनता बँकेचे चेअरमन स्वप्निल आवाडे, महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा सौ. वैशाली आवाडे, प्रसाद खोबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभेची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात चेअरमन प्रकाश दत्तवाडे यांनी महत्वाकांक्षी टेक्स्टाईल पार्क साकारण्यात आला आहे. सध्या १३३ युनिटचे प्रत्यक्षात उत्पादन सुरु असून २० अतिरिक्त युनिटचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून येत्या सहा महिन्यात प्रत्यक्ष उत्पादनास सुरू होईल. शासनाकडून प्राप्त अनुदानातून पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगितले.

माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांनी, अत्याधुनिक यंत्रणा असलेला हा टेक्स्टाईल पार्क असून याठिकाणी तसेच इचलकरंजी पॉवरलूम मेगा क्लस्टर याठिकाणी उत्पादीत होणाऱ्या सर्वच प्रोडक्टचे दिवाळीनंतर निर्यात प्रदर्शन भरण्याची सूचना करताना आपले उत्पादन जगासमोर आणुया, असे सांगितले.

संस्थेचे कार्यकारी संचालक निशिकांत सावर्डेकर यांनी नोटीस व विषयपत्रिकेचे वाचन केले. सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दर्शवली. आभार संस्थेचे व्हा. चेअरमन बाळासाहेब कलागते यांनी मानले. सूत्रसंचालन अशोक पाटील यांनी केले.

याप्रसंगी सुभाष बेलेकर, सुधाकर खोंद्रे, प्रकाश व्यास, पुरुषोत्तम चितलांग्या, मुरलीमनोहर तोतला, ओंकार मेटे, दादासो पाटील, अहमद मुजावर, बाबासो चौगुले, शेखर शहा, चंद्रकांत पाटील, सपना भिसे, नंदू पाटील,यांच्यासह संचालक मंडळ, सभासद, उद्योजक उपस्थित होते.



# संभापूर औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांनी उद्योग उभारणीस प्राधान्य द्यावे

## माजी आमदार जयश्री जाधव

कोल्हापूर ता. १७ (प्रतिनिधी) –

**संभापूर औद्योगिक वसाहत येथे रस्ते, वीज पाणी आदी प्राथमिक सुविधा उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे उद्योजकांनी येथे उद्योग उभारणीस प्राधान्य द्यावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा व माजी आम. जयश्री चंद्रकांत जाधव यांनी केले. ही एमआयडीसी पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यास सुमारे दहा हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल असा विश्वास आमदार जाधव यांनी व्यक्त केला.**

येथील वाय. पी. पोवारनगरमधील उद्यम सांस्कृतिक सभागृहात कोल्हापूर उद्यम को–ऑपरेटिव्ह सोसायटीची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी माजी आमदार जाधव अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

माजी आम.जाधव म्हणाल्या, कोल्हापूरचा औद्योगिक विकास झाला पाहिजे आणि येथील उद्योजक सक्षम बनला पाहिजे. या उद्देशाने कोल्हापूर उद्यम सोसायटी काम करीत आहे. यानुसारच टोप संभापूर येथे सोसायटीच्या माध्यमातून औद्योगिक वसाहत उभारण्यात येत आहे. येथील विजेचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित होता. यासाठी सातत्याने पाठपुरावा करून, वीज वितरण कंपनीकडून औद्योगिक वसाहतीमध्ये सबस्टेशन उभारणीसाठी सुमारे साडेसात कोटी रुपयांच्या निधी मंजुर करून आणला.

यावेळी उपाध्यक्ष सुधाकर सुतार, संचालक राजन सातपुते, चंद्रकांत चोरगे, हिंदुराव कामते, अशोक जाधव, संजय अंगडी, अतुल आरवाडे, आनंद पेंडसे, संजय थोरवत, अविनाश कांबळे, अमर कारंडे, संगीता नलवडे यांच्यासह संस्थेचे सर्व सभासद व उद्योजक कर्मचारी उपस्थित होते. उपाध्यक्ष सुधाकर सुतार यांनी आभार मानले.

# लक्ष्मी प्रोसेसला ३२ लाखाचा नफा

## चेअरमन मुकुंद फाटक

इचलकरंजी, ता. १७ –

**बाजारातील आर्थिक चढउतार, मंदी, व्यवहारात लागणारी रोकड उपलब्धता तसेच प्रोसेसिंगसाठी लागणाऱ्या कच्या मालाच्या दरात गतवर्षीच्या तुलनेत झालेल्या दरवाढीचा दि लक्ष्मी को.ऑप. प्रोसेसर्स संस्थेच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. तरीही सर्व तरतुदी वजा जाता संस्थेला ३२ लाख ८ हजार ८८१ रुपये निव्वळ नफा झाला आहे. संस्था गेल्या ८ वर्षांपासून नफ्यात असल्याचे संस्थेचे चेअरमन मुकुंद फाटक यांनी सांगितले. संस्थेच्या ६८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.**



लक्ष्मी प्रोसेसच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन मुकुंद फाटक,व्यासपीठावर इतर मान्यवर.(छाया –अनंतसिंग)

चेअरमन फाटक यांनी संस्थेला मागील वर्षाच्या तुलनेत २०२४–२०२५ हे आर्थिक वर्ष व्यवसायाच्या बाबतीत संमिश्र स्वरुपाचे गेले. २०२३–२०२४ या वर्षात १२ कोटी ७७ लाख ५ हजार ८३९ रुपयांचे उत्पादन झाले होते. अहवाल सालात त्यात वाढ होऊन १३ कोटी ३८ लाख १७ हजार ६९८ रुपयांचे उत्पादन झाले आहे. संस्थेचे एकूण भाग भांडवल २ कोटी २० लाख ६५ हजार रुपये झाले असून सभासद संख्या ३ हजार ८६१ आहे. संस्थेस २०२४–२०२५ मध्ये ८६ लाख ९१ हजार १७२ रुपये ढोबळ नफा झाला असून सर्व तरतुदी वजा जाता ३२ लाख ८ हजार ८८१ रुपये निव्वळ नफा झाल्याचे सांगितले. प्रारंभी संस्थेचे व्हा.चेअरमन राजाराम लोकरे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे इंजिनिअरिंग क्षेत्रातील जेष्ठ व्यावसायिक डी.एम.बिरादार आणि राष्ट्रीय प्रोसेसिंग कामगार संघटनेचे नेते शामराव कुलकर्णी यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमुख पाहुणे आणि विशेष कार्य करणाऱ्या संस्थेच्या सभासद, हितचिंतकांचा सत्कार करण्यात आला. संचालक सतीश बुरसे यांनी आभार मानले. सभेस संस्थेचे संचालक उमेश कुलकर्णी, सर्जेराव पाटील, मधुकर पाटील यांच्यासह सर्व संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# वडणगे ग्रामपंचायतीस आयएसओ मानांकन

वडणगे ता. १७ (प्रतिनिधी) –

**कोल्हापूर जिल्हा परिषद व करवीर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन शाहू स्मारक भवन कोल्हापूर येथे करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये वडणगे ग्रामपंचायतीला आय. एस. ओ. मानांकन मिळाल्याबद्दल आमदार चंद्रदीप नरके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.**

हा सत्कार स्विकारणेस लोकनियुक्त सरपंच संगीता शहाजी पाटील, उपसरपंच रुपाली विजय जौंदाळ, शहाजी पाटील , ग्रामपंचायत अधिकारी आर. आर. भगत, ग्रामपंचायत लिपीक सचिन कुंभार, अतुल नांगरे, संगणक केंद्रचालक सुशांत चेचर उपस्थित होते.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद व पंचायत समितीचे विविध अधिकारी व संबंधित विभागाचे कर्मचारी, करवीर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच, ग्रा. पं.सदस्य यांच्यासह कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



वडणगेत गेल्या चार ते पाच वर्षापासून ग्रामपंचायतीने राबवलेल्या विविध योजना, कार्यालयीन कामकाज गतीमान, ग्रामस्थांसाठी तत्पर सेवा, पारदर्शक व्यवहार यामुळे हे मानांकन मिळाले आहे. याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सरपंच व सदस्यांचे कौतूक केले जात आहे.

# कार–दुचाकीच्या अपघातात युवकाचा मृत्यू

इस्लामपूर, ता.१७(प्रतिनिधी)–

**इस्लामपूर एसटी स्टँड परिसरात मंगळवारी रात्री झालेल्या भीषण अपघाताने पेठ परिसर शोकमग्न झाला आहे. भरधाव चारचाकीने दिलेल्या जोरदार धडकेत पेठ (ता. वाळवा) येथील आकाश चंद्रकांत बाबर (वय २७) जागीच ठार झाला. तर त्याचा मित्र हर्षद बापू सकटे (वय–२१) गंभीर जखमी झाला आहे. सध्या त्याच्यावर कराड येथील कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.**



याबाबतची फिर्याद आकाशचा चुलत भाऊ प्रसाद सूर्यकांत बाबर (वय २३) याने इस्लामपूर पोलिस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी अज्ञात वाहनचालकावर गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पो. उपनिरीक्षक ताम्हाणे व पो.हे.कॉ. खोत करत आहेत.

आकाश व हर्षद हे दोघे इस्लामपूर येथे आले होते. त्यानंतर चुलत भाऊ प्रसादला भेटून मोटारसायकल वरून ते पेठकडे परत निघाले. इस्लामपूर बसस्थानकाजवळ रस्ता ओलांडत असताना अचानक भरधाव मारुती अल्टो ने त्यांना जोराची धडक दिली.

# मिरजेत मटका अड्ड्यावर छापा अडीच लाखाचा मुद्देमाल हस्तगत

मिरज,ता.१७(प्रतिनिधी)–

**मिरजेत पोलिसांनी गुरुवार पेठ परिसरात सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून सात जणांवर कारवाई केली. या सर्वांविरुद्ध मिरज शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

पोलिसांनी या ठिकाणावरून रोख रक्कम, मटक्याच्या चिठ्ठ्या, दुचाकी, मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. नूरुल घोडीमार, समीर मोहम्मदखलील घोडीमार, आरिफैन नूरुल घोडीमार (सर्व रा. मिरज), मोहम्मद बाबू चाबुकस्वार (रा. सांगली वेस), सरताज शमशुद्दीन लंगरदार (रा. गुरुवार पेठ), विठ्ठल श्रीपती सुतार (रा.गुरुवार पेठ) अशा सात जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी येथून ३० हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल, दोन लाख रुपये किमतीच्या दोन दुचाकी, १७ हजार ९५० रुपये रोख रक्कम, पेन, मटक्याच्या चिठ्ठ्या असा सुमारे २ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी मिरज शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास करीत आहेत.

Regd. No. KPR/HLE/HSG/TC/446/1998-99

## श्री. जिव्हेश्वर सहकारी मागास व विशेष मागास प्रवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्या. कोरोची.

C/O श्री. स्वकुळ साळी समाज सेवा मंडळ, २०/१९४ भोने माळ, इचलकरंजी. ४१६ ११५ ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

श्री. जिव्हेश्वर सहकारी मागास व विशेष मागास प्रवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्या., कोरोची या संस्थेची **वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. ३०/०९/२०२५ इ. रोजी दुपारी ठिक ०४.०० वाजता २०/१९४ श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक भवन, भोने माळ, इचलकरंजी** येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकामी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, हि विनंती.

**– सभेपुढील विषय –**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे. २. सन २०२४–२०२५ चा वार्षिक अहवाल व जमाखर्च, ताळेबंद, नफा – तोटा पत्रक, तेरीज पत्रक वाचून मंजूर करणे व डेडस्टोक घसारा मंजूर करणे. ३. सन २०२४–२०२५ मध्ये बजेटपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे. ४. सन २०२४–२०२५ चा शासकीय ऑडीट मेमो स्विकारणे व दोष दुरुस्ती मंजूर करणे. ५. सन २०२५–२०२६ या सालाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे. ६. सन २०२५–२०२६ या सालाकरिता वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती व मेहनताना ठरविणे. ७. संस्थेची जागा बिगरशेती करणे कामकाजाचा आढावा घेणे. ८. मे. अध्यक्षसो यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या प्रश्नांचा विचार करणे.

**मे. कळावे, दिनांक :– १४/०९/२०२५**

**ठिकाण :– इचलकरंजी.** **संचालक मंडळाच्या आदेशावरुन**

**श्री. राजेंद्र पांडुरंग ज्वारे** – अध्यक्ष

**श्री. विनायक रामचंद्र माळी** सचिव

**श्री. नामदेव लक्ष्मण कांबळे** खजिनदार

**सूचना :–** १. सभासदांचे वरील विषयासंदर्भात काही माहिती हवी असलेस त्यांनी दि.२४/०९/२०२५ रोजी पर्यंत संस्थेच्या ऑफिस मध्ये संस्थेशी संपर्क साधून लेखी द्यावे.२. सभा कोरम अभावी तहकूब झालेस ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासांनी घेणेत येईल व या नोटीसीप्रमाणे कामकाज चालेल. ३. जमा खर्च व विषयासंबंधी सर्व माहिती संस्थेच्या ऑफिसमध्ये पहावयास मिळेल. ४. सभासदांनी सभासद वार्षिक वर्गणी संस्थेस जमा करून सहकार्य करावे. ५. सभासदांनी पत्ता बदल व वारस नोंद केली नसलेस त्वरित संस्थेशी संपर्क साधून करणेचे आहे.

## निवडणुक निर्णय अधिकारी,

### दि. सोशल को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. इचलकरंजी ता. हातकणंगले जिल्हा कोल्हापूर

निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय – मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले प्रशासकिय इमारत पहीला मजला, हातकणंगले ता. हातकणंगले जिल्हा कोल्हापूर

दिनांक–१६/०९/२०२५

**वाचले –** १. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांचेकडील दि.२०/०८/२०२५ ने मंजुर केलेला निवडणुक कार्यक्रम.

**– जाहीर नोटीस –**

दि.सोशल को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर. या संस्थेच्या सन २०२५–२०२६ ते २०३०–२०३१ या पंचवार्षिक कालावधीकरीता व्यवस्थापन समिती सदस्यांच्या निवडीसाठी निवडणुक कार्यक्रम सुरु आहे. उपरोक्त वाचले निवडणुक कार्यक्रमानुसार दिनांक– २८/०९/२०२५ रोजी **दे. भ. बाबासाहेब भाऊसाहेब खंजिरे शिक्षण संस्था इचलकरंजी, १८/३२४ दि. इचलकरंजी इंडस्ट्रियल को–ऑप. इस्टेट लि. इचलकरंजी** ता. हातकणंगले जिल्हा कोल्हापूर येथे सकाळी – ०८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान व मतदान संपलेनंतर त्याच ठिकाणी पंधरा मिनीटांनी मतमोजणी होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी. असे या नोटीशीने जाहीर करणेत येत आहे.

शिक्का

**सही/–**
**( एफ. डी. जमादार )**
निवडणूक निर्णय अधिकारी

**सर्व सभासद व उमेदवारांचे माहितीसाठी–**

१. निवडणुक कार्यालय नोटीस बोर्डावर
२. संस्था कार्यालय नोटीस बोर्डावर
३. इचलकरंजी महानगर पालीका इचलकरंजी नोटीस बोर्डावर
४. ग्रामपंचायत/तलाठी कार्यालय नोटीस बोर्डावर

**प्रत माहितीसाठी सविनय सादर –**

१. मा. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले
२. मा. पोलीस निरीक्षकसो, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, इचलकरंजी ता. हातकणंगले.

# मिस्ट्री स्पिनर वरुण नंबर १ गोलंदाज

## अभिषेक शर्मा अव्वल फलंदाज; हार्दिक अष्टपैलूंत पहिला

नवी दिल्ली,ता.१७–

**बुधवारी आयसीसीने जाहीर केलेल्या टी–२० साप्ताहिक क्रमवारीत, भारतीय खेळाडू फलंदाज, गोलंदाज आणि अष्टपैलू अशा तिन्ही श्रेणींमध्ये अव्वल स्थानावर आहेत.**

**वरुण चक्रवर्ती पहिल्यांदाच अव्वल गोलंदाज बनला आहे. टी–२० क्रमवारीत नंबर वन गोलंदाज बनणारा तो तिसरा भारतीय खेळाडू आहे. त्याच्या आधी जसप्रीत बुमराह आणि रवी बिश्नोई आहेत.**



फलंदाज अभिषेक शर्मा त्याच्या कारकिर्दीतील सर्वोच्च रेटिंगसह पहिल्या क्रमांकावर आहे. त्याच वेळी, हार्दिक पंड्या अष्टपैलू खेळाडूंमध्ये अव्वल स्थानावर आहे.

३४ वर्षीय फिरकी गोलंदाजाने आशिया कपमध्ये आपला प्रभावी फॉर्म कायम ठेवला, त्याने युएईविरुद्ध दोन षटकांत १/४ आणि पाकिस्तानविरुद्ध चार षटकांत १/२४ बळी घेतले. त्याने न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज जेकब डफीला मागे टाकत क्रमवारीत तीन स्थानांनी झेप घेतली आहे.

**अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर कायम**

१४ सप्टेंबर रोजी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात ३१ धावा काढणाऱ्या अभिषेक शर्माने फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान कायम ठेवले आहे. इंग्लंडचा सलामीवीर फिल साल्ट दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर जोस बटलर तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दक्षिण आफ्रिकेचा डेवाल्ड ब्रेव्हिस दोन स्थानांनी पुढे सरकून ११ व्या स्थानावर पोहोचला आहे आणि एडेन मार्कराम १० स्थानांनी पुढे सरकून ३० व्या स्थानावर पोहोचला आहे.

**अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत पंड्या पहिल्या क्रमांकावर**

भारतीय स्टार हार्दिक पांड्या टी–२० आंतरराष्ट्रीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर कायम आहे, तर पाकिस्तानचा साईम अयुब चार स्थानांनी पुढे सरकून पाचव्या स्थानावर आणि अभिषेक शर्मा चार स्थानांनी पुढे सरकून १४ व्या स्थानावर पोहोचला आहे.

# नीरज व अर्शद वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये भिडतील

## पात्रता फेरीत, चोप्राने ८४.८५ मीटर, नदीमने ८५.२८ मीटर फेकले



टोकियो,ता.१७–

**भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा ऑलिंपिक चॅम्पियन अर्शद नदीम टोकियो येथे होणाऱ्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत आमनेसामने येतील. दोघांनीही पात्रता फेरीत ८४.५० मीटरपेक्षा जास्त भालाफेक करून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले, जी गुरुवारी खेळवली जाईल.**

गट अ मधील नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८४.८५ मीटर भालाफेक केली आणि अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. दरम्यान, गट ब मधील नदीमला त्याचा सर्वोत्तम भालाफेक साध्य करण्यासाठी तिला प्रयत्न करावे लागले. पहिल्या दोन प्रयत्नात तो ८० मीटरचा टप्पाही गाठू शकला नाही, परंतु तिसऱ्या प्रयत्नात त्याने ८५.२८ मीटर भालाफेक करून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

आणखी एक भारतीय, सचिन यादव, थेट पात्रता चिन्ह चुकला परंतु रँकिंगच्या आधारे अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. त्याने पहिल्या प्रयत्नात ८०.१६ मीटर, दुसऱ्या प्रयत्नात ८३.६७ मीटर आणि तिसऱ्या प्रयत्नात ८२.६३ मीटर फेकला. ग्रुप बी मधून, ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स (८९.५३ मीटर), केनियाचा ज्युलियस यिगो (८५.९६ मीटर), अमेरिकेचा कर्टिस थॉम्पसन (८४.७२ मीटर) यांनीही पात्रता फेरी गाठून अंतिम फेरीत प्रवेश केला.

नीरज व्यतिरिक्त, गट अ मधून, जर्मनीचा ज्युलियन वेबर (८७.२१ मीटर), पोलंडचा डेव्हिड वॅग्नर (८५.६७ मीटर) आणि चेक प्रजासत्ताकचा जाकुब वडलेजच (८४.११ मीटर) यांनीही अंतिम फेरीत प्रवेश केला.

**नीरज हा गतविजेता आहे**

पॅरिस ऑलिंपिकनंतर नीरज आणि अर्शद पहिल्यांदाच एका स्पर्धेत एकत्र स्पर्धा करत आहेत. गुरुवारी अंतिम सामना खेळला जाईल. नीरज हा गतविजेता आहे. त्याने हंगेरी येथे झालेल्या २०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत ८८.१७ मीटर थ्रो करून सुवर्णपदक जिंकले. दरम्यान, अर्शद हा गतविजेता आहे. त्याने पॅरिस ऑलिंपिकमध्ये ९२.९७ मीटर थ्रो करून सुवर्णपदक जिंकले. त्यावेळी नीरजने रौप्यपदक जिंकले होते.

**नीरजने ९० मीटरचा अडथळा तोडला आहे**

नीरजने गेल्या वर्षीपर्यंत त्याच्या कारकिर्दीत कधीही ९० मीटर किंवा त्याहून अधिक फेक केली नव्हती. त्याने या वर्षी फेब्रुवारीमध्ये दोहा डायमंड लीगमध्ये पहिल्यांदा ९० मीटर फेकले, जिथे त्याने ९०.२३ मीटर फेकले.

# भारतीय निवड समितीत आर.पी. सिंग आणि प्रज्ञान ओझाची एंट्री ?

नवी दिल्ली,ता.१७–

**भारताचे माजी डावखुरा वेगवान गोलंदाज रुद्र प्रताप सिंग आणि डावखुरा फिरकी गोलंदाज प्रज्ञान ओझा यांचा वरिष्ठ राष्ट्रीय निवड समितीत समावेश होण्याची शक्यता आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील सध्याच्या पॅनेलमधून एस. शरथ आणि सुब्रतो बॅनर्जी बाहेर पडल्यानंतर हा बदल करण्यात आला आहे.**



क्रिकेट सल्लागार समिती बोर्डाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दोन्ही नावांना मान्यता देईल अशी अपेक्षा आहे. या बदलामुळे संघ व्यवस्थापन आणि वरिष्ठ निवड रचनेत एक नवीन अध्याय सुरू होईल. जो वार्षिक सर्वसाधारण सभेत अंतिम केला जाईल.

एस. शरथ यांची ज्युनियर निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती होण्याचीही अपेक्षा आहे. बीसीसीआयने गेल्या महिन्यात दोन्ही राष्ट्रीय निवड पदांसाठी अर्ज मागवले होते. निवड समितीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रमुख नावांनी रस दाखवला नाही.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने या पदासाठी अर्ज केला होता. उत्तर प्रदेशचे माजी वेगवान गोलंदाज आशिष विन्स्टन झैदी आणि हिमाचल प्रदेशचे शक्ती सिंग हे मध्य विभागातून इतर उमेदवार होते. आरपी सिंग हा २००७ च्या टी–२० विश्वचषक विजेत्या भारताच्या संघाचा सदस्य होता. त्याने ८२ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत आणि १२४ विकेट्स घेतल्या आहेत. यामध्ये १४ कसोटी, ५८ एकदिवसीय आणि १० टी–२० सामने समाविष्ट आहेत. तो २०१६–१७ मध्ये पार्थिव पटेलच्या नेतृत्वाखाली गुजरातच्या रणजी करंडक विजेत्या संघाचाही भाग होता.

प्रज्ञान ओझाची दक्षिण विभागाकडून निवड समिती सदस्य म्हणून नियुक्ती होत आहे. ओझाने त्याच्या कारकिर्दीत १४४ आंतरराष्ट्रीय विकेट्स घेतल्या. त्यापैकी ११३ कसोटी क्रिकेटमध्ये घेतल्या आहेत. त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना हा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरचा शेवटचा कसोटी सामना होता. ज्यामध्ये ओझाने १० विकेट्स घेतल्या. ओझाने हैदराबादसाठी देशांतर्गत क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि बंगाल आणि बिहारसाठीही खेळला. तो एस शरथची जागा घेईल.

# भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी वेस्ट इंडिज संघाची घोषणा

बार्बाडोस,ता.१७–

**वेस्ट इंडिज क्रिकेट संघ दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी लवकरच भारत दौऱ्यावर येणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २ ऑक्टोबरपासून अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू होईल. दरम्यान, या दौऱ्यासाठी वेस्ट इंडिजच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे.**



भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांची मालिका पुढील महिन्यापासून सुरू होत आहे. ही मालिका आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. या महत्त्वपूर्ण मालिकेसाठी वेस्ट इंडिजने वेळेआधीच आपला संघ जाहीर केला आहे. संघाचे नेतृत्व रोस्टन चेसकडे देण्यात आले आहे. या संघात काही नवीन आणि युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. विशेषतः भारताच्या संथ खेळपट्ट्यांवर कोण चांगली कामगिरी करू शकतो, याचा विचार करून संघ निवडण्यात आला आहे.

उभय संघांमधील पहिला कसोटी सामना २ ऑक्टोबरपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल. त्यानंतर, १० ऑक्टोबरपासून दुसरा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये होईल. वेस्ट इंडिजने या मालिकेसाठी १५ खेळाडूंचा संघ निवडला आहे. २०१२ नंतर प्रथमच वेस्ट इंडिजचा संघ कसोटी मालिकेसाठी भारतात येत आहे.

विंडिजने नुकतीच ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका खेळली होती, ज्यात त्यांना तीनही सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवानंतर, भारतीय दौऱ्यासाठी संघात तीन बदल करण्यात आले आहेत. विंडिजचे माजी डावखुरे फलंदाज शिवनारायण चंद्रपॉल यांचा मुलगा तेजनारायण चंद्रपॉल आणि एलिक अथानाजे यांच्याव्यतिरिक्त, फिरकीपटू खैरी पियरे यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

**वेस्ट इंडिजचा संघ :** रोस्टन चेस (कर्णधार), जोमेल वारिकन (उप–कर्णधार), केवलन अँडरसन, एलिक अथानाजे, जॉन कॅम्पबेल, तेजनारायण चंद्रपॉल, जस्टिन ग्रीव्स, शाई होप, टेविन इमलाच, अल्झारी जोसेफ, शमर जोसेफ, ब्रँडन किंग, अँडरसन फिलिप, खैरी पियरे, जेडन सील्स.



# टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

चंदिगढ,ता.१७–

**स्मृती मानधनाच्या शतकानंतर गोलंदाजांनी केलेल्या दमदार कामगिरीच्या जोरावर भारताने दुसऱ्या वन डे सामन्यात ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. भारताच्या २९२ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ ४०.५ षटकांत १९० धावांवर ऑल आऊट झाला. यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाचा वन डे क्रिकेटमध्ये एवढ्या मोठ्या फरकाने पराभव झालेला नव्हता.**

प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने २९२ धावांचा डोंगर उभा केला. प्रतिका रावल २५ धावांवर माघारी परतल्यानंतर टीम इंडियाचे विकेट सत्र सुरू राहिले. हर्लीन देओल ( १०), कर्णधार हरमनप्रीत कौर ( १७) झटपट बाद झाले. जेमिमा रॉड्रीग्ज ताप आल्याने या मालिकेतून उर्वरित दोन सामन्यांना मुकणार आहे. त्यामुळे दीप्ती शर्मावर जबाबदारी आली आणि तिने स्मृतीला साथ दिली. स्मृती मानधनाने १३२ चेंडूंत १४ चौकार व ४ षटकारांसह ११७ धावांची खेळी केली. दीप्तीने ५३ चेंडूंत ४० धावा केल्या. रिचा घोष (२९) व स्नेह राणा ( २४) यांनी चांगले योगदान दिले. ऑस्ट्रेलियाच्या डार्सी ब्राऊनने तीन, तर ॲश्लेघ गार्डनरने दोन विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना मात्र ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. कर्णधार एलिसा हिली ( ९) व जॉर्जिया व्हॉल ( ०) हे दोन्ही सलामीच्या फलंदाज झटपट बाद झाल्या.

एलिसा पेरीने ४४ व ॲनाबेल सदरलँडने ४५ धावांची खेळी करून ऑस्ट्रेलियाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण, भारतीय गोलंदाजांनी कमाल केली. क्रांती गौडने ३ विकेट्स घेतल्या, तर दीप्ती शर्मानेही २ बळी टिपले. रेणुका सिंग, स्नेह राणा, अरुंधती रेड्डी व राधा यादव यांनी प्रत्येकी १ विकेट घेतल्या.

ऑस्ट्रेलियाला १०२ धावांनी हार पत्करावी लागली. वन डे क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाला १०० हून अधिक धावांच्या फरकाने पराभूत करणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. १८ वर्षांत प्रथमच भारताने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियावर वनडेत विजय मिळवला आहे.

## स्मृती मानधनाने रचला इतिहास



भारतीय महिला क्रिकेट संघ आणि ऑस्ट्रेलियाचा महिला क्रिकेट संघ यांच्यात एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू आहे. तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना पार पडला. प्रथम फलंदाजी करत असताना भारतीय क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मानधनाने मोठा विक्रम केला आहे. मानधनाने ऑस्ट्रेलियाच्या संघाविरोधात सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला आहे.

स्मृती मंधानाने आजच्या सामन्यात ७७ चेंडूत शतक ठोकण्याची किमया साधली. तर एकूण सामन्यात तिने १३२ चेंडूत ११७ धावा केल्या. या खेळीत १४ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. आजच्या शतकानंतर डावखुऱ्या मानधनाने आपल्या कारकिर्दीतील १२ वे एकदिवसीय शतक पूर्ण केले.

आजच्या शतकामुळे स्मृती मानधनाने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. या वर्षात तिसरे एकदिवसीय सामन्यातील शतक झळकविल्यामुळे लागोपाठ दुसऱ्या वर्षी तीन किंवा त्यापेक्षा अधिक शतक झळकविण्याचा विक्रम मानधनाने आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी २०२४ मध्येही तिने तीन शतक केले होते. महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकविणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आता संयुक्तपणे मानधना तिसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडची फलंदाज टॅमी ब्यूमोंट (१२ शतके) हीची बरोबरी तिने केली आहे. सर्वाधिक शतकांचा विक्रम ऑस्ट्रेलियाची मेग लॅनिंग हिच्या नावावर आहे.

# कागल तालुका शासकीय कुस्ती स्पर्धेला दिमाखदार सुरुवात

## ३५ मल्लांची जिल्हास्तरीय निवड; आज सतरा वर्षाखालील स्पर्धा

मुरगूड ता.१७(प्रतिनिधी)–

**मुरगूड विद्यालय व लाल आखाडा व्यायाम मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने मुरगूड येथे आयोजित केलेल्या शासकीय कुस्ती स्पर्धेला शानदार प्रारंभ झाला.चौदा वर्षाखालील मुले व मुली आणि ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेत ३५ मल्लांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.माजी नगराध्यक्ष प्रवीणसिंह पाटील व नामदेवराव मेंडके यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.**



विद्यालयाचे प्राचार्य एस. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले.यावेळी माजी नगराध्यक्ष प्रवीणसिंह पाटील यांनी आता पर्यंत मुरगूड मध्ये राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा यशस्वीपणे भरविल्या आहेत.पारदर्शक स्पर्धा पार पडणे हे महत्वाचे आहे.नवीन मल्ल निर्माण होताना त्यांना सर्व नियम आणि निकोप स्पर्धा समजणे गरजेचे आहे. त्यामुळे शासकीय कुस्ती स्पर्धाचे आयोजन चांगल्या होण्यासाठी आपल्या पाठीशी राहू असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी प्रवीणसिंह पाटील,नामदेवराव मेंडके व दगडू शेणवी यांच्या हस्ते मॅट पूजन करून कुस्तीला प्रारंभ झाला.नामदेवराव मेंडके, दगडू शेणवी, दिग्विजय पाटील,उपमुख्याद्यापक संजय सूर्यवंशी, पर्यवेक्षक एस. डी. साठे,आनंदराव कल्याणकर, शिवाजी सातवेकर,महेश शेडबाळे,आनंद लोखंडे,मारुती मेंडके,जगन्नाथ पुजारी, संजय मोरबाळे, दादा चौगले, आकाश पाटील, पांडुरंग मगदूम,आदी प्रमुख उपस्थित होते.महादेव खराडे, एस. एस. कळत्रे, शामली डेळेकर,संपत कोळी,पांडुरंग पूजारी,राजू चव्हाण,शिवाजी मोरबाळे, गणेश तोडकर, रोहित मोरबाळे, समाधान बोते,अजित कांबळे आदिनी स्पर्धाचे संयोजन केले.आभार अनिल पाटील यांनी मानले.

**स्पर्धेचे निकाल पुढील प्रमाणे** – १४ वर्षाखालील मुले फ्री स्टाईल – ३५ किलो शिवरुद्र चौगुले, एकोंडी रुद्राक्ष तळेकर, सावर्डे ३८ किलो यश खोंदरे,एकोंडी अमित सातपुते,मुरगुड ४१ किलो अथर्व मोहिते,मुरगुड पृथ्वी शितोळे,करनुर ४४ किलो राजवीर तिळवणे, बानगे कार्तिक गुरव,कागल २५ किलो अनुप कांबळे सिद्धनेर्ली, ५२ किलो वेदांत निकम,कुरुकली नवनाथ मगदूम,बानगे ५७ किलो –नहीम पटेल,बानगे आयुष पवार,शेंडुर. ६८ किलो सार्थक ताटे, बाणगे

१४ वर्षाखालील मुली–३० किलो मधुरा हंडे,(सांगाव), प्राजक्ता पाटील, मुरगुड ३३ किलो सुकन्या मोरबाळे (मुरगुड) आराध्या कोळी,कागल ३६ किलो –अन्विता कांबळे कागल, श्रुती बोडके वाळवे , ३९ किलो आदिती ढेरे,मुरगुड, ४२ किलो ईश्वरी हजारे सिद्धनेर्ली, भक्ती पाटील कागल , ४६ किलो आराध्या पाटील वाळवे, ५० किलो प्रणाली जाधव मुरगुड, ५४ किलो जानवी मोरे मुरगुड, ५८ किलो स्वरांजली फडके कागल, ६२ किलो जानवी पांडव –मुरगुड. १९ वर्षाखालील ग्रीको रोमन मुले–५५ किलो विश्वजीत चौगुले कागल, जय पवार बेलवळे, साठ किलो ऋषिकेश डेळेकर मुरगुड ६३ किलो अमित देसाई बेलवडे, ६७ किलो अथर्वतोरसे बिद्री, बहात्तर किलो हर्षवर्धन पाटील बेलवडे, हर्षवर्धन शितोळे मुरगुड.